समरसता

साहित्य पत्रिका

वर्ष ७, अंक २, ऑक्टोबर २०२६

दिवाळी विशेषांक



समरसता

साहित्य पत्रिका

वर्ष ७, अंक २, ऑक्टोबर २०२६

संपादक
रवींद्र गोळे
संपादक मंडळ
प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे,
डॉ. रमा गर्गे, प्रा. गजानन होडे
प्रकाशक
समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र

अंतरंग

संवाद		३
शेतीसमृद्धीचा फुले मार्ग	विकास पांढरे	४
राष्ट्राराधनेचा मंत्र	अमोल तपासे	११
अग्ने नय सुपथा राये	स्नेहलता स्वामी (बिंदू)	१६
लोकशिक्षक	प्रा. बी. एन. चौधरी	१९
चेहरा : भावनांचे दर्पण!	नागेश सू. शेवाळकर	२३
राधा अंतरंगी जपली	किरण शिवहर डोंगरदिवे	२७
श्रद्धा आणि अंधश्रद्धा	प्रा. प्रतिभा सराफ	३२
संतांची दिवाळी	डॉ. अशोक लिंबेकर	३५
'आणि ती...'	ओंकार दिलीप बागल	३९
'माणूस घडविण्याचा प्रवास...'	प्रा. रविंद्र यशवंतराव भुसारी	४२
आठवण व्यक्तींची, साठवण प्रसंगांची	चन्द्रशेखर टिळक	४४
'वाट माझिया घराची': आश्वासक कविता	प्रा. शिवाजी सरगर	४७
सॅल्युट!	स्मिता सुशांत कवडे	५१
पोतराज – कडक लक्ष्मी	विजयकुमार कलवले	५४
बंदिशाळा	जयेश शत्रुघ्न मेस्त्री	५९
नवकवी कार्यशाळेतून कवितेच्या विविध अंगांचा उलगडा	रमा गर्गे	६५

कविता

सुनील शिनखेडे, अर्चना मुरूमकर, अशोक कांबळे, अशोक सोनावणे,
मानसी चिटणीस, पद्माकर भावे, दिपाली कुलकर्णी (पान ६२ ते ६४)

समरसता साहित्य पत्रिकेचे लेखक, वाचक, हितचिंतक यांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

मुखपृष्ठावरचे चित्र
अंतरजालावरून साभार
मांडणी/अक्षरजुळणी आस्वाद प्रकाशन

संपर्क : संपादक समरसता साहित्य पत्रिका
१/६ जैन इस्टेट, विलेज रोड, भांडूप (प.), मुंबई – ७८
इमेल : samarastaedit@gmail.com

खाजगी वितरणासाठी



भारतीय सण, उत्सव हे केवळ साजरे करण्यासाठी नसतात. तर भारतीय जीवनशैलीशी ते खोलवर जोडलेले असतात. सण– उत्सवाच्या आध्यात्मिक, धार्मिक, पौराणिक कथा आपणास ज्ञात असतात. त्याचप्रमाणे सण उत्सवामागे खोल सामाजिक अर्थ असतात. हे अर्थ आपण कालानुरूपतेच्या कसोटीवर तपासून घेतले पाहिजे. दीपावली हा जसा सांस्कृतिक सण आहे तसा सामाजिक सण आहे. समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेण्याची आणि आनंद द्विगुणित करण्याची क्षमता दीपावळी सणात आहे. आज दुर्मिळ झालेल्या बारा बलुतेदार पासून ते व्यापार उद्यम करणाऱ्या पर्यंत सर्वांना हा सण काही ना काही देत असतो. आर्थिक क्रय विक्रयाला गती देत असतो.

दीपावळी सण हा सांस्कृतिक व वैचारिक ही आहे. महाराष्ट्राला दिवाळी अंकाची थोर परंपरा आहे. देशभरात अशी परंपरा असणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. काही शे दिवाळी अंक या सणाच्या निमित्ताने प्रकाशित होत असतात. संस्कृती, संस्कार, धर्म, शास्त्र, परंपरा इत्यादी बरोबर आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान, नव्या संधी यावर सखोल भाष्य अशा दीपावळी अंकातून होत असते. मराठी साहित्य विश्वात दमदार पदार्पण करण्यासाठी दीपावळी अंक हे एक महत्त्वाचे माध्यम असते. उमेदवारीच्या काळात दीपावळी अंकात लेखन करणारे अनेक नामवंत लेखक कवी मराठी साहित्य विश्व गाजवत आहेत.

समरसता साहित्य परिषदेचा हा दिवाळी अंक याच परंपरेचा भाग आहे. आणि समरसता साहित्य परिषदेच्या ब्रीदवाक्याप्रमाणे सरस ते साहित्य, समरस तो साहित्यिक हा भाव कायम डोळ्यासमोर ठेवून अंकाची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला आहे. समाज निर्दोष, भेदभाव मुक्त, समता युक्त व्हावा ही आपली आंतरिक प्रेरणा आहे. आणि त्यासाठी साहित्य, कला क्षेत्रातून प्रबोधन व समाज जागरण करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करत आहोत. या अंकातील कविता, कथा, पुस्तक परिचय व अन्य लेख यांची साक्ष देतील.

अण्णा भाऊ साठे म्हणत, हा समाज सुखी समाधानी व्हावा, त्याचे दैन्य दूर व्हावे, समाजात ऐकी वाढावी, बंधुभाव वाढावा म्हणून मी लिहितो, हिच प्रेरणा उराशी बाळगून लिहिणाऱ्या कवी, लेखकाच्या साहित्याने हा अंक सजला आहे.

नियमित अंकाप्रमाणे या अंकाचे आपण स्वागत कराल यांची खात्री आहे.

– रवींद्र गोळे



शेतीसमृद्धीचा फुले मार्ग

महात्मा जोतिबा फुले यांच्या जन्माला यंदा दोनशे वर्षे पूर्ण होत आहेत. ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ हा कालखंड त्यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षाचा आहे. या निमित्ताने त्यांच्या विचारांचे स्मरण करणे, ते समाजापर्यंत पोहोचवणे आणि वर्तमानातील प्रश्नांच्या संदर्भात त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे आवश्यक आहे. कारण काळ बदलला असला तरी शेतकऱ्यांचे प्रश्न आणि महत्त्व यांविषयी त्यांनी मांडलेले विचार आजही तितकेच कालसुसंगत आहेत.

विकास पांढरे
९९७०४५२७६७

जोतिबा फुले हे व्यासंगी, चिकित्सक आणि बहुआयामी विचारवंत होते. त्यांचे वाचन चौफेर होते. मराठी, इंग्रजी शिवाय उर्दू, कानडी, मद्रासी, गुजराथी एवढ्या भाषा येत होत्या. संस्कृत भाषेचे शिक्षणही त्यांनी घेतले होते. धर्मशास्त्रे, तत्त्वज्ञान आणि विविध ज्ञानशाखांचा अभ्यास करताना त्यांनी प्रत्येक गोष्टीकडे विवेकनिष्ठ दृष्टिकोनातून पाहिले. रूढी-परंपरांना प्रश्न विचारण्याचे आणि अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठवण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत होते.'तृतीय रत्न' (१८५५), 'गुलामगिरी' (१८७३), 'शेतकऱ्याचा आसुड' (१८८३), 'इशारा' (१८८५) आणि 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' (१८९१) या त्यांच्या लेखनातून सामाजिक विषमता, शोषण, शेतकऱ्यांची दुरवस्था आणि सत्याधिष्ठित समाजरचनेचा विचार पुढे आला. या क्रांतिकारकाच्या हातात लेखणीसोबत शेतीची अवजारेही होती. स्वतः मातीत राबून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे शोधणारे प्रयोगशील शेतकरी होते. त्यांच्या कुटुंबात पिढ्यान्‌पिढ्या कुणबिकीची परंपरा होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कष्टांची, अडचणींची आणि जगण्यातील संघर्षांची त्यांना जवळून जाणीव होती. स्वतःच्या शेतीत नवे प्रयोग करून त्यांनी आधुनिक शेतीचा वस्तुपाठच घालून दिला. याचे ठळक उदाहरण म्हणजे पुण्याजवळील मांजरी येथील त्यांची

शेती. त्या काळात मुळा-मुठा धरणाच्या कालव्यातून शेतीला पाणी घेण्याबाबत शेतकऱ्यांच्या मनात भीती होती. धरणाचे पाणी घेतल्यास इंग्रज सरकार आपली जमीन बळकावेल, अशी त्यांना धास्ती वाटत होती. मात्र, जोतिबांनी या भीतीपोटी नवे तंत्र नाकारले नाही. त्यांनी स्वतःच्या शेतात कालव्याचे पाणी आणले आणि त्या पाण्यावर बाग फुलवली. त्यांच्या या धाडसी प्रयोगामुळे त्या कालव्याला 'फुल्याची नळी' असे नाव पडले.

नव्या प्रयोगाचे स्वागत होण्याऐवजी त्यांच्यावर 'जोतिबा सरकारला फितूर झाले आहेत' असा आरोप झाला. पण जोतिबा आरोपांनी डगमगणारे नव्हते. त्यांनी कालव्याच्या पाण्यामुळे शेतीला होणारे फायदे शेतकऱ्यांना समजावून सांगितले. स्वतः प्रयोग करून त्याचे परिणाम दाखवले.

शेतीत नवनवे प्रयोग करणाऱ्या जोतिबांनी उद्योग आणि कंत्राटी व्यवसायाच्या क्षेत्रातही आपली चमक दाखवली. नव्या संधी शोधणे, व्यवसायात भागीदारी स्वीकारणे आणि मोठी कामे हाती घेणे, या त्यांच्या उद्योजकीय वृत्तीची अनेक उदाहरणे आढळतात.

पुण्यात भाजीपाला खरेदी करून तो मुंबईला पाठविण्याचा व्यवसाय त्यांनी सहकारी तत्त्वावर सुरू केला होता. या व्यवसायात ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांना त्यांनी चौथा हिस्सा भागीदारी दिली होती. मात्र, अपेक्षित नफा मिळत नसल्याने पुढे हा व्यवसाय बंद करावा लागला. व्यवसायात यशापयश येत असते, याचा अनुभवही त्यांना या उपक्रमातून आला.

जोतिबांनी बांधकाम क्षेत्रातील कंत्राटी कामांतही पुढाकार घेतला होता. कात्रजच्या बोगद्याच्या कामाचे कंत्राट त्यांनी घेतले होते. खडकवासला धरणाच्या बांधकामासाठी चुना, दगड आणि खडी पुरविण्याचे कंत्राटही त्यांनी स्वीकारले. या कामात त्यांचे बालमित्र सखाराम यशवंत परांजपे भागीदार होते. याशिवाय, खडकवासला धरणाच्या पाटाच्या कामाचे आणि येरवडा येथील पुलाच्या बांधकामाचे कंत्राटही त्यांनी घेतले होते.

जोतिबांच्या मते, कुणबी, माळी आणि धनगर हे मूळचे एकाच शेतकरी समाजाचे घटक असावेत. शेती करणारे



कुणबी, शेतीसोबत बागायती फुलवणारे माळी आणि शेतीबरोबर मेंढ्या-बकऱ्यांचे कळप राखणारे धनगर, अशी व्यवसायावरून त्यांची ओळख निर्माण झाली असावी. कामे वेगवेगळी, पण मातीशी नाळ एकच मात्र, काळाच्या ओघात व्यवसायाचे भेद जातींच्या भिंती बनले. आज या समाजांत रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही. या वास्तवाच्या आधारे, या तिन्ही समाजांचे मूळ एकाच शेतकरी समाजात असावे, असा विचार ते मांडतात.

दुष्काळ निवारण

१८७७ मध्ये महाराष्ट्रावर दुष्काळाचे भीषण संकट कोसळले होते. भुकेने माणसे तडफडत होती. लहान मुले डोळ्यांदेखत उपासमारीने जीव सोडत होती. अन्नधान्यासाठी लुटालूट होत होती. माणुसकीची कसोटी पाहणारा तो काळ होता. अशा संकटसमयी जोतिबा आणि सावित्रीबाई यांनी समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य कृतीतून बजावले. सत्यशोधक समाजाचे चिटणीस या नात्याने जोतिरावांनी २४ मे १८७७ रोजीच्या 'ज्ञानप्रकाश'मधून दुष्काळग्रस्तांना आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. उपासमारीने हाडांचा सापळा झालेली मुले, अंगावर वस्त्र नसल्याने होणारे हाल आणि मुलांना सोडून जाण्यास विवश झालेले पालक, हे दारुण वास्तव त्यांनी समाजासमोर मांडले. इंदापूर, मिरज आणि तासगाव परिसरातून अनेक अनाथ मुले आपल्या

लेकरांसह मदतीच्या आशेने दाखल झाली होती.

सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी बैठक घेऊन धनकवडी येथे दुष्काळग्रस्तांसाठी मदतछावणी सुरू केली. या छावणीत दररोज एक हजार भाकऱ्यांचे मोफत वाटप केले जात असे. महादू सहादू वाघोले यांच्या आईसह अन्य महिला स्वयंपाकाची जबाबदारी सांभाळत होत्या. रामसेठ उरवणे आणि डॉ. शिवाप्पा यांनी मदतकार्याचा मोठा आर्थिक भार उचलला. सावित्रीबाई फुले यांनी स्वयंपाकापासून ते अन्नवाटप आणि व्यवस्थेच्या देखरेखीपर्यंतची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. दुष्काळाच्या आगीत होरपळणाऱ्या भुकेल्या जिवांना अन्नाचा घास देणे, हेच त्या काळातील खरे समाजकार्य होते. सत्यशोधकांनी महाराष्ट्रात तब्बल ५२ मदत केंद्रे सुरू करून संकटग्रस्तांना आधार दिला. दुःखाच्या काळात केवळ सहानुभूती व्यक्त न करता प्रत्यक्ष मदतीसाठी धावून जाण्याचा हा आदर्श आजही प्रेरणादायी आहे.

शेतकऱ्यांचा आसुड : शेतकरी जीवनाचा जाहीरनामा

महात्मा फुले लिखित 'शेतकऱ्यांचा आसुड' हा १८८३ मध्ये प्रकाशित झालेला महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. यात फुले यांनी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, सावकारशाही, जातिव्यवस्था, सरकारी धोरणे आणि शिक्षणाचा अभाव यांवर परखड भाष्य केले आहे. शेतकऱ्यांच्या शोषणाची कारणे स्पष्ट करून त्यांनी त्यांच्या उन्नतीसाठी शिक्षण, कृषिविकास आणि प्रशासनातील सुधारणांचा आग्रह धरला. हा ग्रंथ आजही शेतकरी प्रश्नांच्या अभ्यासासाठी दिशादर्शक आहे.

पहिल्या प्रकरणात शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणातील अडथळे व धार्मिक स्वार्थ, दुसऱ्या प्रकरणात सरकारी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आणि शेतकऱ्यांची पिळवणूक, तिसऱ्या प्रकरणात आर्यांचे आगमन, करांचा बोजा व शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण, चौथ्या प्रकरणात शेतीची दयनीय अवस्था, तर पाचव्या प्रकरणात शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठीच्या सूचना आणि सरकारने करावयाच्या उपाययोजना यांचे विवेचन महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसुड' या ग्रंथात केले आहे.

शेतकरी संघटनेचे संस्थापक युगात्मा शरद जोशी यांनी 'शेतकऱ्यांचा आसुड' या ग्रंथातील चौथे प्रकरण प्रत्येक शेतकऱ्याने आवर्जून वाचावे, असे सांगितले आहे. या प्रकरणाचे वाचन करतानाचा अनुभव सांगताना ते म्हणतात, माझ्या गावातील पाचपंचवीस शेतकऱ्यांना मी हे प्रकरण वाचून दाखविले. आयाबहिणीसुद्धा सहज ऐकायला येऊन बसल्या. लहान पोरे-पोरीसुद्धा आल्या. सगळे प्रकरण वाचून होईपर्यंत कोणी हालले नाही का बोलले नाही. त्यांच्या दररोजच्या वापरातले शब्द पुस्तकात लिहिले गेलेले त्यांनी ऐकलेच नव्हते. पुस्तकात म्हणजे भटाळलेलीच भाषा असावयाची अशी अनुभवाने खात्री झालेली. हे काय नवल ऐकतो आहो, अशा अचंब्याने डोळे विस्फारून ऐकत होती. वाचणे संपल्यावर एक म्हातारी म्हणाली, 'आजही घरात हीच अवस्था आहे बघा.' (महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, पान १६८.)

जोतिबांनी या ग्रंथात गावखेड्यातील शेतकऱ्याच्या संसाराचे अत्यंत सूक्ष्म आणि वास्तवदर्शी चित्र रेखाटले आहे. त्यांच्या वर्णनात शेतकऱ्याचे घर म्हणजे दोन-चार खणांची कौलारू किंवा छपराची झोपडी. चुलीच्या कोपऱ्यात स्वयंपाकाची मोजकी भांडी, उतरंडीवर डाळी-धान्यांचे थोडेथोडके साठे, तर जमिनीवर सावकाराकडून आणलेले जुने जोंधळे. एका बाजूला फाटक्या गोधड्या, घोंगड्या आणि ठिगळे लावलेली वस्त्रे; दुसरीकडे शेतीची अवजारे, जातं, उखळ-मुसळ आणि गोठ्यात बांधलेली जनावरे. हाच त्याचा संसार आणि हीच त्याची संपत्ती.

घरातील संसाराचा गाडा ओढणारी शेतकरीण दिवसभर शेतात राबायची आणि घरकामही सांभाळायची. अंगावर साधे कपडे आणि गळ्यात मोजके मंगळसूत्र, एवढाच तिचा शृंगार. मुलांच्या अंगावर पुरेसे कपडे नाहीत, पायात चपला नाहीत. तर शेतकऱ्याच्या अंगावर लंगोटी, फाटके पागोटे आणि ठिगळे लावलेले जोडे. थंडी-वारा, ऊन-पाऊस यांची तमा न बाळगता हा संसार शेतीच्या भरवशावर जगत होता. शेतकऱ्याची दारिद्र्यावस्था ही अज्ञान आणि शोषणाच्या चक्रात अडकलेल्या ग्रामीण

जीवनाचे ते विदारक वास्तव होते.

इंग्रजांनी वनखाते आणून जंगलांवर निर्बंध लादले आणि त्याचा घाव इथल्या पारंपरिक व्यवसायांवरही घातला. लोहार, साळी, कोष्टी अशा कारागीर समाजांच्या उपजीविकेवर या धोरणांनी कशी कुऱ्हाड चालवली, याचे भेदक वास्तव महात्मा फुले समोर आणतात. 'दीनदुबळ्या पंगू शेतकऱ्यांचे शेरडाकरडांस या पृथ्वीचे पाठीवर रानचा वारासुद्धा खाण्यापुरती जागा उरली नाही. त्यांनी आता साळी, कोष्टी, सणगर, लोहार, सुतार वगैरे कसबी लोकांना कारखान्यांत त्यांचे हाताखाली कामे करून आपली पोटे भरावीत...'

(महात्मा फुलेः समग्र वाङ्मय,१९६९ पान २०४)

'इंग्लंडातील कारागीर लोकांनी रुचीरुचीच्या दारू वाटल्या, पाव–विस्कुटे, हलवे, लोणची, लहानमोठ्या सुया, दाभण, चाकू, कातऱ्या, शिवणाची यंत्रे, भाते, शेगड्या, रंगीबेरंगी विलोरी सामान, सूत, दोरे, कापड, शाली, हातमोजे, पायमोजे, टोप्या, काठ्या, छत्र्या, पितळ, तांबे, लोखंडी पत्रे, कुलुपे, किल्ल्या, डांवरी कोळसे, हारनिसे, खोगरे, लगाम, शेवटी पायपोस यंत्राद्वारे तेथे तयार करून येथे आणून स्वस्त विकू लागल्यामुळे, येथील एकंदर सर्व मालास मंदी पडल्याकारणाने येथील कोष्टी, साळी, जुलयी, मोमीन इतके कंगाल झाले आहेत.' (पान २०४).

इंग्लंडमधून आयात होणाऱ्या स्वस्त वस्तूंनी भारतीय बाजारपेठ काबीज केली आणि पिढ्यान्पिढ्या कौशल्य जपणाऱ्या भारतीय कारागिरांच्या व्यवसायाला उतरती कळा लागली. स्वस्त आयातीच्या या माऱ्यातूनच देशी कारागिरीच्या उद्ध्वस्तीकरणाची सुरुवात झाली, असे जोतिबा अधोरेखित करतात.

'चालीच्या सभ्य सावकारांनी आपला देवघेवीचा व्यापार बंद केला आहे. तथापि बहुतेक ब्राह्मण व मारवाडी सावकार... अक्षरशून्य शेतकऱ्यांवरोवर देवघेवी करितात. त्या अशा की, प्रथम ते, अडचणीत पडलेल्या शेतकऱ्यांस फुटकी कवडी न देता, त्याजपासून लिहून घेतलेल्या कर्जरोख्यावरून कोर्टात हुकूमनामे करून घेऊन नंतर व्याजमुक्ती कापून घेऊन बाकीच्या रकमा त्यांच्या पदरात टाकतात.' (पान २११).

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जीवन म्हणजे संकटांची अखंड मालिका होती. बागायती जमिनीचे प्रमाण चार–पाच टक्क्यांहूनही कमी होते. त्यामुळे बहुतांश शेती निसर्गाच्या लहरीवर अवलंबून होती. पाऊस पडला तर पीक, अन्यथा दुष्काळ. शेतकऱ्यांच्या या अगतिकतेचा फायदा घेत सावकारांनी त्यांची आर्थिक पिळवणूक सुरू केली. व्याजाचे दर २५ टक्क्यांपासून तब्बल ४० टक्क्यांपर्यंत पोहोचले होते. कर्जासाठी शेतकऱ्यांना घरातील भांडी, सोने, घर आणि जमीन तारण ठेवावी लागे. मुदतीत कर्ज फेडता आले नाही, तर तारणावरचा हक्क गमवावा लागे. सावकार न्यायालयातून जप्तीचे आदेश आणून शेतकऱ्यांची स्थावर–जंगम मालमत्ता ताब्यात घेत. काहींच्या घरांवर गाढवाचा नांगर फिरवला जाई. संसार उद्ध्वस्त होई आणि शेतकरी देशोधडीला लागे.

दुसरीकडे धर्मसत्ता (तत्कालीन पुरोहित वर्ग), अर्थसत्ता (सावकार)आणि राज्यसत्ता (इंग्रज) यांचे साटेलोटे शेतकऱ्यांच्या मुळावर उठले होते. होळी–पोळ्याचे मान, पाटीलकी, मुकादमीचे हक्क, शेतजमिनींचे बांध आणि घरांच्या हद्दी अशा क्षुल्लक वाटणाऱ्या प्रश्नांवरून शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण केले जात. त्यातून आपापसांतील भांडणे वाढत आणि त्याचा फायदा प्रस्थापित व्यवस्थेला होत असे. पोलीस ठाणे आणि न्यायालयांतील प्रभावाच्या जोरावर शेतकऱ्यांना न्याय मिळणेही कठीण होई. भट–सावकारांच्या युतीसमोर सामान्य शेतकरी हतबल झाला होता. सावकारांची दहशत इतकी होती की, कर्जवसुलीसाठी ते थेट शेतकऱ्यांच्या घरात घुसत. चुलीत पाणी ओतणे, पाठीवर दगड ठेवून भर उन्हात उभे करणे, मिरच्यांची धुरी देणे, अपमानास्पद बोलणे असे अमानुष प्रकार केले जात. शेतकऱ्याच्या घरात बसून मिष्टान्न भोजनावर ताव मारायचा आणि त्याच शेतकऱ्याला कर्जफेडीसाठी धमकवायचे, हा त्यांच्या जुलुमाचा नित्यक्रम बनला होता.

अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना अन्यायाची जाणीव करून देणे, संघटित करणे आणि संघर्षासाठी उभे

करणे आवश्यक होते. याच विचारातून जोतिबा आणि सत्यशोधक समाजाच्या सहकाऱ्यांनी १८७५ नंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रचारदौरे आणि संघटनात्मक कामाला वेग दिला.

ग्रामीण भागातील सत्ताकेंद्रांवर विशिष्ट जातिसमूहाचे वर्चस्व होते. होळी-पोळ्याचे मान, पाटीलकी, मुकादमी, जमिनीचे बांध आणि घरांच्या हद्दींवरून शेतकऱ्यांनाच एकमेकांविरुद्ध उभे केले जाई. पोलीस ठाणी आणि कोर्ट-कचेऱ्यांतील प्रभावामुळे अन्यायाविरुद्ध दाद मागणेही कठीण होई. शेटजी-भटजींच्या युतीत शेतकरी मात्र भरडला जात होता. या शोषणव्यवस्थेचे बिंग फोडून शेतकऱ्यांच्या वेदनांना शब्द देण्याचे ऐतिहासिक काम जोतिबांनी केले. त्यांच्या लेखणीचा असूड व्यवस्थेच्या वर्मी बसला.जुन्नरचे शेटे, ओतूरचे भाऊ कोडाजी पाटील आणि डुमरे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी या कामात महत्त्वाची भूमिका बजावली. कृष्णराव भालेकर आणि गणपतराव सखाराम पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा मुंबई, कोकण, अहमदनगर (आताचे अहिल्यानगर), सोलापूर, सातारा आणि जुन्नर परिसरात संपर्क होता. गावोगावी शेतकऱ्यांच्या बैठका भरू लागल्या, सभा होऊ लागल्या आणि मोठ्या संख्येने शेतकरी एकत्र येऊ लागले.

१८७५ मध्ये पुणे जिल्ह्यातील सुपे येथे झालेल्या शेतकरी उठावापासून महाराष्ट्रातील सावकारविरोधी असंतोषाला व्यापक ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. पुढील काळात सत्यशोधक विचारांच्या प्रभावातून शेतकऱ्यांच्या संघटनात्मक प्रयत्नांना बळ मिळाले. १८८५ ते १८८८ या काळातील संप आणि असहकाराच्या संघर्षात शेतकरी, कुळे आणि कार्यकर्त्यांनी विविध भागांतून अन्यायकारक व्यवस्थेला आव्हान दिले.

शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता व्हावी, या ध्येयाने जोतिबांनी ग्यानोबा ससाणे आणि सहकाऱ्यांच्या मदतीने हडपसर येथे सहकारी पतपेढी सुरू केली. अवघ्या १० ते १२ वर्षांत या पतपेढीने ५० हजार रुपयांचा नफा कमावला. या यशाची दखल घेत व्हाईसरॉय आणि मुंबईच्या गव्हर्नरनेही पतपेढीला भेट दिली. पुढे कृ. अ. केळुसकर आणि केशवराव विचारे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या सहकार्याने सहकार चळवळीचा हा विचार अधिक व्यापक केला. सावकारीच्या विळख्यातून शेतकऱ्यांना बाहेर काढणाऱ्या या उपक्रमातूनच सहकार चळवळीच्या विस्ताराची पायाभरणी झाली.

याठिकाणी आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. पुणे नगरपालिकेने भाजीपाल्यासाठी बाजाराची इमारत बांधली. इ.स. १८८५ मध्ये पूर्ण झालेल्या या इमारतीला राज्यपाल लॉर्ड रे यांचे नाव देण्यात आले. मात्र, दुकानांचे भाडे परवडत नसल्याने भाजीविक्रेते तेथे जाण्यास तयार नव्हते. त्यांना सक्तीने तेथे नेण्यात येऊ लागले.

ही बाब महात्मा जोतिबांच्या कानावर गेली. त्यांनी या निर्णयाला विरोध केला. गरीबांच्या करातून जमा झालेला पैसा अनावश्यक इमारतीवर खर्च करण्याऐवजी गरीब मुलांच्या शिक्षणासाठी वापरावा, अशी त्यांची मागणी होती. कर्ज काढून भाजी विकणाऱ्या गरीब विक्रेत्यांवर भाडे आणि कर लादल्यास भाजी महाग होईल आणि सामान्य ग्राहकही भरडले जातील, हे त्यांनी अधिकाऱ्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला.

मात्र, अधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही. तरीही जोतिबांनी माघार घेतली नाही. राज्यपालांच्या नावाचा बाजार असला, तरी गरीबांच्या हितासाठी ते विरोध करणारच, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. पुढे याच 'रे मार्केट'चे नाव 'फुले मार्केट' झाले.

फाटक्या घोंगडीतून मांडली शेतकऱ्यांची व्यथा

शेतकऱ्यांची दुःखे थेट इंग्लंडच्या राणीपर्यंत पोहोचावीत, यासाठी जोतिबा संधीच्या शोधात होते. मार्च १८८८ मध्ये इंग्लंडच्या महाराणी व्हिक्टोरियाचा मुलगा ड्यूक ऑफ कॅनॉट आणि त्याची पत्नी पुण्याच्या दौऱ्यावर आले. मित्र हरी रावजी चिपळूणकर यांनी त्यांच्या सन्मानार्थ भव्य मेजवानी आयोजित केली होती. या सोहळ्याचा उपयोग शेतकऱ्यांचा आवाज सत्तेपर्यंत पोहोचवण्यासाठी करण्याचे जोतिरावांनी ठरवले.

त्यांनी डोक्याला फाटके मुंडासे बांधले, खांद्यावर घोंगडी घेतली, मळके धोतर नेसले, कमरेला विळा खोवला आणि हातात काठी घेतली. अशा वेषात ते मेजवानीला

पोहोचले. त्यांचा अवतार पाहून प्रवेशद्वारावरील सैनिकांनी त्यांना अडवले. मात्र, हरी रावजी यांनी त्यांना ओळखून आत नेले. राजपुत्राच्या शेजारी त्यांच्यासाठी आसन राखून ठेवले होते.

जोतिबा कोण आहेत, हे समजल्यानंतर राजपुत्राला आश्चर्य वाटले. जोतिबांनी इंग्रजीतून भाषण करताना श्रीमंतांचे वैभव पाहून भारतातील जनता सुखी असल्याचा समज करून घेऊ नका, असे स्पष्ट सांगितले.

खरा हिंदुस्थान राजवाड्यांत नसून खेड्यांत आहे. इथली बहुसंख्य जनता शेतीवर अवलंबून असून दारिद्र्य आणि अज्ञानात जगत आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. शेतकऱ्यांची खरी परिस्थिती जाणून घेण्यासाठी खेड्यांना आणि वंचितांच्या वस्त्यांना भेटी द्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याची मागणीही त्यांनी मांडली. इंग्लंडला परतल्यावर महाराणी व्हिक्टोरियाला शेतकऱ्यांच्या दुःस्थितीची माहिती द्यावी, अशी विनंती राजपुत्राला केली.

यानंतर त्यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथातील विचारांचा आशयही समजावून सांगितला. फाटक्या पोशाखातून शेतकऱ्यांचे दुःख जगासमोर मांडणारे जोतिबा हे शेतकरीहिताच्या लढ्याचे अग्रदूत ठरले.

जोतिबांचा शेतीसमृद्धीचा दूरदर्शी आराखडा

स्त्री-शूद्रातिशूद्रांना शोषणाच्या जोखडातून मुक्त करायचे असेल, तर त्यांच्यापर्यंत विद्येचा प्रकाश पोहोचविला पाहिजे, हे जोतिबांनी ओळखले. अविद्येमुळे समाजाची झालेली अधोगती त्यांनी नेमकेपणाने मांडली.

विद्येविना मति गेली। मतिविना नीति गेली ।। नीतिविना गति गेली। गतिविना वित्त गेले ।। वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

या काव्यपंक्तींतून फुले यांनी अज्ञानाचे दुष्परिणाम अधोरेखित केले. सर्वसामान्य स्त्री-पुरुषांच्या दुःखाची चिकित्सा करून त्यांनी या शोषणाचे अचूक निदान केले आणि त्यावर शिक्षणाचा प्रभावी उपाय सुचविला. शिवाय शेतकरी स्वावलंबी व्हावा, शेती उत्पादन वाढावे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था समृद्ध व्हावी, यासाठी त्यांनी अनेक मूलगामी उपाय सुचवले. 'शेतकऱ्यांचा आसुड' या ग्रंथातून त्यांच्या कृषिविकासाच्या दूरदृष्टीचे दर्शन घडते.

शेतकऱ्यांना युरोपातील शेतकऱ्यांप्रमाणे कृषिविज्ञानाचे शिक्षण मिळावे, यासाठी कृषी शाळा, कृषी महाविद्यालये आणि कृषी विद्यापीठे स्थापन करण्याची त्यांनी सूचना केली. हुशार शेतकरीपुत्रांना इंग्लंडमधील कृषिशाळांना भेट देण्याची संधी सरकारी खर्चाने मिळावी, असेही त्यांना वाटत होते. शेतीसोबत लोहारकाम आणि सुतारकामाचे ज्ञान मिळाल्यास शेतीची साधने तयार करणे आणि त्यांची दुरुस्ती करणे सोपे होईल, असा त्यांचा व्यावहारिक दृष्टिकोन होता.

पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी जमिनीत मुरावे, यासाठी डोंगराळ भागात ताली, बंधारे आणि टप्प्याटप्प्याने तलाव बांधावेत, अशी त्यांनी सूचना केली. त्यामुळे विहिरींची पाणीपातळी वाढेल, उन्हाळ्यातही जलस्रोत टिकतील आणि बागायती शेतीला चालना मिळेल. शेतजमिनीची धूप रोखण्यासाठी बांधांची नियमित दुरुस्ती करावी, पाण्याचे स्रोत शोधून त्यांची नोंद गावांच्या नकाशांत करावी आणि विहिरी बांधणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असेही त्यांनी सुचवले. नदी-नाल्यांतील गाळ शेतकऱ्यांना मोफत उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली.

गायी-बैलांचे संरक्षण, सुधारित जातींच्या शेळ्या-मेंढ्यांची पैदास आणि सेंद्रिय खतांचा मुबलक पुरवठा यांवर त्यांनी भर दिला. गावांची गायराने गावकऱ्यांच्या ताब्यात द्यावीत आणि शेतीच्या अवजारांसाठी आवश्यक लाकूड उपलब्ध करून द्यावे, अशी त्यांची भूमिका होती. वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठीही त्यांनी उपाय सुचवले.

शेतमालाची प्रदर्शने भरवावीत, शेतीकौशल्याच्या परीक्षा घ्याव्यात आणि प्रावीण्य मिळवणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी विज्ञानातील पदव्या द्याव्यात, असे त्यांना वाटत होते. शिक्षण, पाणी, पशुधन, तंत्रज्ञान आणि कौशल्याचा सन्मान यांची सांगड घालणारा जोतिरावांचा हा विचार म्हणजे शेतीसमृद्धीचा दूरदर्शी कृती आराखडाच होता.

आजच्या काळातही महात्मा फुले यांच्या कृषिविचारांची

उपयुक्तता तसूभरही कमी झालेली नाही. शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न, शेतीची वाढती अनिश्चितता, पाण्याचे दुर्भिक्ष आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचा अभाव ही आव्हाने आजही कायम आहेत. शेतकरी हा देशाच्या समृद्धीचा आधार आहे, ही जाणीव समाजमनात रुजविण्याची गरज आहे. शेतीला विज्ञानाची जोड, शेतकऱ्यांना ज्ञानाचे बळ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्वावलंबनाची दिशा देण्याचा फुले यांचा विचार आजच्या कृषिविकासासाठीही मार्गदर्शक ठरतो. शेतीच्या प्रश्नांकडे उत्पादन आणि उत्पन्नाच्या चौकटीतून न पाहता, त्यांचा सामाजिक न्याय, शिक्षण, समता आणि मानवी प्रतिष्ठेशी असलेला संबंध समजून घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठविणारे आणि त्यांच्या उन्नतीसाठी शिक्षणाची कास धरणारे महात्मा जोतिबा फुले यांचे विचार म्हणूनच आजही परिवर्तनाची प्रेरणा देतात.

महात्मा जोतिबा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षात त्यांच्या कार्याचे स्मरण करणे महत्त्वाचे आहेच, परंतु त्यापेक्षाही महत्त्वाचे आहे, त्यांच्या विचारांचा वर्तमानाशी अन्वयार्थ जोडणे. त्यांच्या कृषिविचारांचे नव्या पिढीपर्यंत संक्रमण करणे, शेतीविषयक धोरणांत शेतकरीहिताला प्राधान्य देणे आणि सामाजिक समतेचा विचार कृतीत आणणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. जोतिबांचे विचार केवळ इतिहासाच्या पानांवर न राहता शेताच्या बांधावर आणि समाजाच्या व्यवहारात उतरले, तरच जन्मद्विशताब्दी वर्षाचे खरे सार्थक होईल. त्यांच्या विचारांची हीच ज्योत शेतीसमृद्धी आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग उजळत राहो.





राष्ट्राराधनेचा मंत्र

छत्रपती शिवराय आणि प्रभू श्रीरामांचे विचार केवळ इतिहासाच्या पानांवर किंवा भाषणांपुरते मर्यादित न राहता, आजच्या पिढीच्या आचरणात उतरले पाहिजेत. आजच्या काळातील 'वीरव्रत' म्हणजे सीमेवरील सुरक्षेबरोबरच भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा, सामाजिक न्यायाची जपणूक आणि राष्ट्रहितासाठी स्वतःचे सर्वस्व पणाला लावणे होय. आपले हे दिव्य विचार आणि चारित्र्याची परंपरा संपूर्ण जगात पुन्हा एकदा आदराने स्वीकारली जावी, यासाठी देशातील तरुणांना संस्कारक्षम आणि अनुशासित बनवणाऱ्या संघटित राष्ट्रकार्याची आज नितांत आवश्यकता आहे.

अमोल तपासे

९९६०६७३७८९

संस्कृती, परंपरा आणि शौर्याचा महान वारसा लाभलेला भारत देश आज एका नव्या जागतिक टप्प्यावर उभा आहे. कोणत्याही राष्ट्राची खरी ताकद ही केवळ त्याच्या भौगोलिक सीमा किंवा संपत्तीमध्ये नसून, तिथल्या नागरिकांच्या राष्ट्रनिष्ठा, एकोपा आणि संघटित सामर्थ्यामध्ये सामावलेली असते. 'संघशक्ती' हाच राष्ट्रउभारणीचा पाया आहे, ज्यावर एका समर्थ आणि वैभवशाली राष्ट्राची इमारत उभी राहते.

राष्ट्र हे केवळ मातीचा तुकडा किंवा भौगोलिक सीमांनी आखालेला भूभाग नसून, तो करोडो बांधवांच्या स्पंदनांनी धडधडणारा एक जिवंत, चैतन्यमयी देह आहे. ज्या राष्ट्रात स्वार्थ, जातीय भेद आणि विघटनाची कीड लागते, ते राष्ट्र जागतिक पटलावर आपला स्वाभिमान गमावून बसते. आज भारत एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे–एकीकडे महासत्ता बनण्याचे भव्य स्वप्न आहे, तर दुसरीकडे अंतर्गत दुफळी आणि पाश्चात्य वैचारिक आक्रमणांचे आव्हान आहे.

अशा काळात आपल्या सुप्त राष्ट्रीय जाणिवांना जागे करून, सर्व भेद विसरून भारताला 'विश्वगुरू'च्या पदावर विराजमान करण्यासाठी आपल्याला 'संघटित राष्ट्रशक्ती'ची नितांत गरज आहे. राष्ट्रीय बाणा मनात रुजवण्यासाठी आणि आजच्या तरुण पिढीमध्ये राष्ट्रभक्तीचा प्रखर स्फुल्लिंग पेटवण्यासाठी आपल्याला राष्ट्राराधनेचा संकल्प

केला पाहिजे.

जगी राष्ट्र जे संघशक्तीविहीन,
तयाला कदापि प्रतिष्ठा न मान
असा सत्य सिध्दांत जाणून भावे,
सदा संघकार्य प्रभावी करावे।

जागतिक पटलावर ज्या राष्ट्राकडे स्वतःची संघटित ताकद आणि एकजूट नसते, त्याला जगभरात कधीही मान-सन्मान किंवा प्रतिष्ठा मिळत नाही, हा इतिहासाचा आणि वर्तमानाचा कटू सत्य सिद्धांत आहे. आजच्या २४ व्या शतकातील तीव्र जागतिक स्पर्धा आणि भू-राजकीय उलथापालथीच्या युगात विकेंद्रित, दुभंगलेला किंवा आपापसात भांडणारा समाज कधीही प्रगती करू शकत नाही. राष्ट्राला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आदराचे स्थान मिळवून देण्यासाठी अंतर्गत एकता आणि संघटित समाजशक्ती हीच सर्वांत मोठी गरज आहे. हा सत्य सिद्धांत मनात बाळगून प्रत्येक नागरिकाने राष्ट्रसंघटनाच्या कार्यात मनापासून योगदान दिले पाहिजे.

आजचे २१ वे शतक हे अत्यंत तीव्र जागतिक स्पर्धा, आर्थिक उलथापालथ आणि भू-राजकीय संघर्षांचे शतक आहे. जागतिक सत्तासंतुलन वेगाने बदलत असताना, रशिया-युक्रेन संघर्ष असो वा इस्त्रायल-मध्य पूर्व आशियातील तणाव; अशा काळात जगाच्या पाठीवर त्याच राष्ट्राचा आवाज गांभीर्याने ऐकला जातो, ज्याच्याकडे स्वयंपूर्ण ताकद, अंतर्गत स्थैर्य आणि अखंड संघटित समाजशक्ती असते. इतिहास आणि वर्तमान साक्षी आहे-ज्या देशांमध्ये अंतर्गत दुफळी, गृहकलह आणि सामाजिक विखुरलेपण आले, ती राष्ट्रे जागतिक पटलावर महासत्तांच्या खेळण्यातील बाहुली बनली.

आज भारत जगभरात एक नवी आशा म्हणून उदयास येत आहे. मग ती जगातील वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असो, चांद्रयान आणि डिजिटल क्रांतीतील ऐतिहासिक यश असो, की आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची ठाम आणि स्वाभिमानी भूमिका असो-भारताचे हे वाढते वजन एकाच गोष्टी सिद्ध करते: संघटित राष्ट्रच जगाला झुकवू शकते! परंतु, ही जागतिक प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी आणि भारताला 'विश्वगुरू'च्या पदावर प्रस्थापित करण्यासाठी सर्वात मोठे आव्हान अंतर्गत एकात्मतेचे आहे. आज जेव्हा भारत महासत्ता बनण्याच्या दिशेने पावले टाकत आहे, तेव्हा जातीयता, प्रांतीयता, भाषावाद आणि वैचारिक आधारावर समाजाला विभाजित करण्याचे अदृश्य षड्यंत्र उभे राहात आहे.

दुभंगलेला आणि आपापसात भांडणारा समाज कितीही समृद्ध असला, तरी तो बाहेरील आक्रमणांपुढे क्षणात उद्ध्वस्त होतो, हा मानवी इतिहासाचा कटू सिद्धांत आहे. त्यामुळे राष्ट्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळवून द्यायचे असेल, तर 'राष्ट्र प्रथम' ही भावना प्रत्येक नागरिकाच्या श्वासात भिनणे आवश्यक आहे. संघशक्ती ही केवळ एका संघटनेची ताकद नसून, ती करोडो भारतपुत्रांच्या मनातील अखंड देशभक्तीची एकवटलेली शक्ती आहे. जेव्हा देशातील प्रत्येक नागरिक-शेतकरी, सैनिक, तरुण, वैज्ञानिक आणि उद्योगजक-आपल्या वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन राष्ट्राच्या प्रगतीचा विचार करतो, तेव्हा ती खरी 'संघशक्ती' बनते.

जागतिक पटलावर भारताची मान सदैव उंच राहण्यासाठी, प्रत्येक भारतीयाने अंतर्गत दुफळी नष्ट करून एकसंध समाजाची निर्मिती केली पाहिजे. 'संघशक्ती हीच राष्ट्रशक्ती' हा सार्वकालिक सत्य सिद्धांत मनात बाळगून, निष्ठेने आणि समर्पणाने राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी स्वतःला वाहून घेणे हीच आजच्या काळातील खरी राष्ट्रपूजा ठरेल!

किती भव्य आदर्श या भारताचे,
किती दिव्य चारित्रय वीरव्रताचे
जगी तेच सर्वत्र सन्मान्य व्हावे,
सदा संघकार्य प्रभावी करावे।

भारताचा इतिहास हा त्याग, समर्पण, चारित्र्य आणि शौर्याच्या भव्य आदर्शांनी नटलेला आहे. प्रभू श्रीरामांचे धर्मपालन, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि जनहित, महाराणा प्रतापांचा स्वाभिमान, स्वामी विवेकानंदांचे तेज आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचे प्रखर राष्ट्रार्पण-हा आपला अमर सांस्कृतिक वारसा आहे. आपले पूर्वज केवळ पराक्रमी नव्हते, तर ते दिव्य चारित्र्याचे धनी होते. पराक्रमाला जेव्हा नैतिक मूल्यांचे अधिष्ठान लाभते,

तेव्हाच त्याचे रूपांतर महान 'वीरव्रता'त होते.

आजचा भारत आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने प्रगती करत असला, तरी या डिजिटल आणि आधुनिक युगात आपल्या समाजापुढे, विशेषतः तरुण पिढीपुढे नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाचे मोठे संकट उभे ठाकले आहे. पाश्चात्य संस्कृतीचे आंधळे अनुकरण, आभासी जगातील लोकप्रियता आणि भौतिक सुखाच्या मागे धावताना आपले अस्सल संस्कार मागे पडत आहेत. चारित्र्याशिवाय केलेली कोणतीही प्रगती ही राष्ट्राला आतून पोकळ बनवते. आज जगाला युद्धाच्या आणि विनाशाच्या छायेतून बाहेर काढण्यासाठी केवळ अस्त्रांची नव्हे, तर भारतीय संस्कृतीतील चारित्र्यसंपन्न विचारांची गरज आहे.

म्हणूनच, छत्रपती शिवराय आणि प्रभू श्रीरामांचे विचार केवळ इतिहासाच्या पानांवर किंवा भाषणांपुरते मर्यादित न राहता, आजच्या पिढीच्या आचरणात उतरले पाहिजेत. आजच्या काळातील 'वीरव्रत' म्हणजे सीमेवरील सुरक्षेबरोबरच भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा, सामाजिक न्यायाची जपणूक आणि राष्ट्रहितासाठी स्वतःचे सर्वस्व पणाला लावणे होय. आपले हे दिव्य विचार आणि चारित्र्याची परंपरा संपूर्ण जगात पुन्हा एकदा आदराने स्वीकारली जावी, यासाठी देशातील तरुणांना संस्कारक्षम आणि अनुशासित बनवणाऱ्या संघटित राष्ट्रकार्याची आज नितांत आवश्यकता आहे. जेव्हा कोट्यवधी राष्ट्रप्रेमी एकसंध होऊन या आदर्शांच्या मार्गावर चालतील, तेव्हा भारत केवळ बलशालीच नव्हे, तर संपूर्ण जगाचा खरा मार्गदर्शक बनेल.

अविच्छिन्न एकात्म हे राष्ट्र व्हावे,
सुसंपन्न सामर्थ्यशाली असावे
जगाचे गुरुस्थान या प्राप्त व्हावे,
सदा संघकार्य प्रभावी करावे।

अविच्छिन्न आणि एकात्म भारताची संकल्पना ही केवळ एका भूभागाची मर्यादा नसून, ती कोट्यवधी हृदयांचे एकत्रीकरण आहे. आजच्या आधुनिक युगात, जेव्हा प्रांतीयता, भाषावाद, जात आणि पंथांच्या भिंती



उभ्या करून देशाला विखंडित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत, तेव्हा 'अविच्छिन्न एकात्मता' हाच आपल्या अस्तित्वाचा एकमेव प्राणवायू ठरतो. केवळ राजकीय किंवा भौगोलिक सीमांवरून नव्हे, तर विचारांच्या आणि भावनांच्या पातळीवर हा देश अखंड राहिला पाहिजे. आजची जागतिक परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची, स्पर्धात्मक आणि अस्थिर आहे. अशा काळात भारताची प्रगती ही केवळ संख्यात्मक किंवा आर्थिक विकासापुरती मर्यादित असू शकत नाही, तर देश आर्थिक, सामरिक, बौद्धिक आणि तंत्रज्ञानाच्या प्रत्येक अंगाने 'सुसंपन्न आणि सामर्थ्यशाली' असणे काळाची सर्वात मोठी गरज आहे.

आजचे जग अशांतता, महायुद्धांच्या छटा, पर्यावरणीय ऱ्हास, मानसिक ताणतणाव आणि नैतिक मूल्यांच्या खच्चीकरणाने होरपळत आहे. अशा या हसऱ्या, पण उद्ध्वस्त होत जाणाऱ्या जगाला मानवकल्याण, शांतता, वसुधैव कुटुंबकम् आणि शाश्वत विकासाचा मार्ग दाखवण्याची क्षमता केवळ आणि केवळ भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञानातच आहे. आपली ही प्राचीन ओळख

पुन्हा प्रस्थापित करून भारताला जगाचे 'विश्वगुरू' स्थान मिळवून देणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. परंतु, हे ध्येय केवळ घोषणाबाजीने साध्य होणार नाही; त्यासाठी तळागाळातील समाजात अखंड राष्ट्रभावनेचे सातत्यपूर्ण जागरण करावे लागेल. जेव्हा देशातील प्रत्येक नागरिक स्वतःचा स्वार्थ बाजूला सारून एकात्म राष्ट्रशक्तीसाठी आपले योगदान देईल, तेव्हाच हा देश खऱ्या अर्थाने सामर्थ्यशाली होईल आणि संपूर्ण जग आदराने भारताकडे मार्गदर्शक म्हणून पाहील.

सदा राष्ट्रकार्यार्थ देहे झिजावे,
यथाशक्ति ते दान द्यावे
स्वदेशी व्रता सर्वथा आचरावे,
सदा संघकार्य प्रभावी करावे।

राष्ट्र ही केवळ नकाशावर आखलेली मातीची सीमा किंवा निर्जीव भूभाग नसून, तिथल्या करोडो बांधवांच्या स्पंदनांनी धडधडणारा एक जिवंत, चैतन्यमयी समाज आहे. त्यामुळे वैयक्तिक स्वार्थ, आराम आणि अहंकाराच्या पलीकडे जाऊन 'राष्ट्रहित प्रथम' हाच प्रत्येक नागरिकाचा जीवनमंत्र असला पाहिजे. आजच्या आधुनिक आणि भौतिकवादी युगात, जेव्हा समाज स्वतःच्या सुखात मग्न होत चालला आहे, तेव्हा आपल्या शरीराचा, वेळेचा, ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग देशाच्या पुनरुत्थानासाठी करणे हे आपले परमकर्तव्य ठरते. स्वतःचा देह राष्ट्रकार्यासाठी झिजवणे म्हणजे केवळ सीमेवर जाऊन अहोरात्र लढणे नव्हे, तर आपल्या दैनंदिन कामात प्रामाणिकपणा जपून, सामाजिक जबाबदारी स्वीकारून समाजातील शेवटच्या घटकाची सेवा करणे होय.

आजचे २१ वे शतक हे जागतिक आर्थिक वर्चस्वाचे आणि प्रचंड औद्योगिक स्पर्धेचे शतक आहे. अशा काळात कोणत्याही देशाला जर जागतिक स्तरावर स्वाभिमानाने जगायचे असेल, तर त्याला आर्थिक आणि औद्योगिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावेच लागेल. याच भूमिकेतून 'आत्मनिर्भर भारत' घडवण्यासाठी 'स्वदेशी व्रता'चे आचरण आज अत्यंत अनिवार्य बनले आहे. स्वदेशी स्वीकारणे म्हणजे केवळ भारतीय वस्तू खरेदी करणे नव्हे, तर आपल्या देशातील कारागीर, शेतकरी, स्थानिक उद्योग आणि भारतीय विचारांवर दृढ विश्वास ठेवणे होय. परकीय ब्रँड्सच्या आंधळ्या आकर्षणातून बाहेर पडून स्थानिक उत्पादनांना पाठबळ देणे हीच आजच्या युगातील प्रखर देशसेवा आहे.

राष्ट्रउभारणीची ही भगीरथ नौका केवळ सरकार किंवा काही ठराविक लोकांच्या भरवशावर पार पडू शकत नाही. त्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने आपापल्या क्षमतेनुसार (यथाशक्ती) स्वतःच्या वेळेचे, धनाचे, बुद्धीचे आणि कौशल्याचे दान राष्ट्रकार्यात समर्पित केले पाहिजे. ज्ञानी माणसाने आपले ज्ञान, श्रीमंताने आपले धन, तर तरुणांनी आपली ताकद आणि वेळ समाजाच्या सक्षमीकरणासाठी दिली पाहिजे. जेव्हा समर्पण आणि स्वदेशीचे हे राष्ट्रीय व्रत घराघरांत आणि मनामनांत रुजेल, तेव्हाच भारत आर्थिक व सामाजिकदृष्ट्या खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण आणि महासत्ता बनेल.

सदा शुध्द हिंदुत्व चित्ती धरावे,
अनेकांत एकत्व ते ओळखावे
स्वये संघशाखेत नेमिचि जावे,
असे संघकार्य प्रभावी करावे।

'हिंदुत्व' हा शब्द आजच्या काळात अनेकदा संकुचित अर्थाने किंवा वादग्रस्त ठरवण्याचा प्रयत्न केला जातो, परंतु वास्तव पाहता हिंदुत्व ही कोणतीही एकाच पूजापद्धतीची चौकट नसून ती एक अत्यंत उदार, सर्वसमावेशक आणि शाश्वत जीवनमूल्ये जपणारी जीवनशैली आहे. भारतीय संस्कृतीचा पायाच 'वसुधैव कुटुंबकम्' (संपूर्ण जग हे एकच कुटुंब आहे) आणि 'अनेकांत एकत्व' (विविधतेतील एकता) या तत्त्वांवर उभारलेला आहे. आज जेव्हा समाजाला जाती, प्रांत आणि वैचारिक भिंती उभे करून तोडण्याचे किंवा आपापसात भांडविण्याची अनेक आंतरराष्ट्रीय व अंतर्गत षड्यंत्रे रचली जात आहेत, तेव्हा या विघटनाच्या राजकारणाला चोख उत्तर देण्यासाठी शुद्ध हिंदुत्वाची ही सर्वसमावेशक, व्यापक आणि समरसतेची भावना मनात जोपासणे काळाची गरज आहे. समाजात दरी निर्माण करणाऱ्या घटकांना बाजूला सारून प्रत्येक

भेदामागील मूळ मानवी एकत्व ओळखणे आणि जपणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे.

परंतु, हे वैचारिक ऐक्य प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि समाजाला शिस्तबद्ध बनवण्यासाठी केवळ विचारांचे सोने करून चालत नाही, तर त्यासाठी एकात्मिक विचारांचे सातत्यपूर्ण संस्कार देणाऱ्या केंद्रांची आवश्यकता असते. शारीरिक, मानसिक शिस्त, चारित्र्य आणि देशभक्तीचे संस्कार देणारी 'संघ शाखा' हे अशा राष्ट्रव्यापी जागृतीचे सर्वात मोठे आणि प्रभावी केंद्र आहे. जिथे जात-पात, श्रीमंत-गरीब असा कोणताही भेद न बाळगता सर्वजण एकाच गणवेशात मातृभूमीच्या चरणी नतमस्तक होतात, ती शाखा म्हणजे राष्ट्रउभारणीची खरी प्रयोगशाळा आहे. नित्यनियमाने या संघशाखेत जाऊन स्वतःला त्या पवित्र प्रवाहाचा एक भाग बनवणे आणि विखुरलेल्या समाजाला एका संघटित व शक्तिशाली राष्ट्रशक्तीमध्ये रूपांतरित करणे, हीच आजच्या प्रत्येक जागरूक भारतीयाची सर्वोच्च राष्ट्रीय जबाबदारी आहे!

भारत हे हिंदुराष्ट्र तत्त्व नीट समजावे,
हिंदुत्वचि भारतात राष्ट्रीयत्व उमजावे
निष्ठेने तनमनधन त्यासाठी अर्पावे,
विघटित या समाजास संघमय करावे।

भारत हे अनादी काळापासून चालत आलेले, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि सनातन परंपरेने नटलेले एक जिवंत हिंदुराष्ट्र आहे. येथे 'हिंदुत्व' म्हणजे कोणतीही संकुचित धार्मिक चौकट किंवा पूजापद्धती नसून, या भूमीचा आत्मा, तिची जीवनशैली आणि तिची मूळ राष्ट्रीय ओळख आहे. या देशाची संस्कृती, सर्वसमावेशकता आणि जीवनमूल्ये हीच भारताच्या राष्ट्रीयत्वाचा मूळ आधार आहेत. हिंदुत्वाची ही व्यापक आणि सनातन संकल्पना समजून घेणे हीच खऱ्या अर्थाने या भूमीप्रतीची खरी निष्ठा आहे.

आजच्या २१ व्या शतकातील भारताकडे पाहताना एकीकडे आर्थिक व तांत्रिक प्रगतीचे चित्र दिसत असले, तरी दुसरीकडे समाजातील वाढती दुफळी चिंताजनक आहे. आज जाती-पातीचे राजकारण, प्रांतीय अस्मिता, भाषावाद आणि वैयक्तिक स्वार्थापोटी आपला समाज अंतर्गत पातळीवर विखुरला आणि दुभंगला जात आहे. या अंतर्गत विघटनामुळे देशाच्या अखंडतेला आणि जागतिक स्थिरतेला मोठा धोका निर्माण होत आहे. अशा या आव्हानात्मक परिस्थितीत, या छिन्नभिन्न आणि विघटित समाजाला एकत्र आणून त्याला 'संघमय' करणे ही काळाची सर्वांत मोठी गरज बनली आहे. समाजाला संघमय करणे म्हणजे प्रत्येकाच्या मनात अनुशासित कार्यसंस्कृती, कर्तव्यदक्षता, सामाजिक समरसता आणि प्रखर देशप्रेमाची चेतना पेटवणे होय.

हा महान राष्ट्रीय संकल्प पूर्ण करणे ही केवळ एका विशिष्ट संघटनेची किंवा संस्थेची जबाबदारी नसून, या भूमीवर जन्म घेतलेल्या प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकाचे परमकर्तव्य आहे. जेव्हा आपण वैयक्तिक स्वार्थ आणि संकुचित भेद बाजूला सारून आपले तन, मन आणि धन पूर्ण निष्ठेने राष्ट्रकार्यार्थ समर्पित करतो, तेव्हाच एक अखंड आणि सामर्थ्यशाली समाज निर्माण होतो. दैनंदिन जीवनात 'राष्ट्र प्रथम' हा भाव ठेवून समाजातील शेवटच्या घटकाला आपल्यासोबत जोडणे हीच आजच्या युगातील खरी राष्ट्रपूजा आहे. चला, या विघटित समाजाला एकात्मतेच्या आणि शिस्तीच्या धाग्यात विणून, अंतःकरणापासून 'भारत माता की जय' हा जयघोष केवळ उच्चारूयाच नाही, तर तो आपल्या आचरणातून सार्थ आणि प्रत्यक्ष साकार करूया!

सरसरता साहित्य पत्रिकेसाठी लिहिते व्हा...
आपल्या कथा, कविता, ललित निबंध, प्रवास वर्णन इ. साहित्य समरसता साहित्य पत्रिकेत प्रकाशित करू शकता. आपले साहित्य संपादक समरसता साहित्य पत्रिका १/६ जैन इस्टेट, विलेज रोड, भांडूप (प.), मुंबई - ७८ या पत्त्यावर पाठवावे.



अग्ने नय सुपथा राये

प्रार्थनेकडे पाहिले तर प्रार्थना ही निव्वळ दुर्बलपणातून केलेले मागणी नसते किंवा ती काही भीक नाही, तर आपल्या शरीर, मन, वाणीच्या केंद्रीकरणातून मनाच्या गाभाऱ्यातील इच्छापूर्तीसाठी केलेली एक वैज्ञानिक, एक यौगिक क्रिया आहे. आपल्याच शक्तीला जागे करणारा किंवा आपल्याला आपल्या शक्तीपर्यंत घेऊन जाणारे ते एक माध्यम ठरते. त्यामुळे कोणत्याही धर्मात, पंथात प्रार्थनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. जेव्हा आपण एखाद्या मंदिरात जाऊन सगुण रूपातील मूर्तीकडे पाहतो तेव्हा तत्काळ आपला अहंकार गळून जाऊन आपण आपल्यातील शक्तीशी एकरूप होतो व हात जोडतो.

स्नेहलता स्वामी (बिंदू)
७७२१८२९७८०

'प्रार्थना' शब्द कधी कानावर कळत नकळत पडला व क्षणभर डोळे बंद केले तर ज्ञानेश्वर माऊलींच्या 'जे खळांची व्यंकटी सांडो तया सत्कर्मी रती वाढो' या परम पवित्र प्रार्थनेचे स्मरण होत राहते इतकी उत्फुल्ल ही प्रार्थना. ज्ञानेश्वरीच्या वाक्यज्ञानंतर माऊलींचे हृदय करुणेने ओतप्रोत भरून गेले, एक परिपूर्णतेचा भाव रोमारोमात भिनला गेला व विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान त्यांच्या ओठांवर आले. दुरितांचे तिमिर नष्ट होऊन जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात ही प्रार्थना म्हणजे निर्मोही निखळ, निरागस मनाचे, निस्सीम स्नेहाचे, उच्च पातळीच्या विनम्रतेचे, लीनतेचे प्रतिकच! अहंकार नाही, माझेपण नाही, माझेसाठी नाही. अपार करुणा हृदयात साठवून विश्वात्मक देवासमोर मन गाभाऱ्याभर प्रकाश प्रकाश भरलेला असताना केलेले हे मागणे. 'प्रकर्षेण अर्धयते यस्यां सा प्रार्थना' अर्थात प्रकर्षाने केलेली याचना (प्र+अर्थना) होय. शरीर-मन-वाणीचा अतूट संगम होत एकाग्र भावातून रोम रोम पुलकित करणारी प्रार्थना! खरे तर प्रार्थना ही माणसांची सहज प्रवृत्ती! आपणास आपल्याही आत घेऊन जाणारी ही प्रार्थना मनाच्या गाभाऱ्यात खोल खोल घेऊन जाणारी असते.



जिथे संपूर्ण शक्तीसह श्वासांच्या संपूर्ण केंद्रीकरणातून नवीन द्वार उघडले जाते जे की दिव्य तेजाकडे घेऊन जाणारा जणू एक भुयारी मार्गच. हा मार्ग काळोखातून दिव्य तेजाकडे जाणारा आपल्यात असल्याचे दर्शन घडविणारा. हा मार्ग प्रार्थनेतून साकार होतो. हृदयाचे ठोके ही क्षणभर एक विस्मयकारक क्षण अनुभव करतात तो प्रार्थनेचा क्षण. संपूर्ण विलय... अहंकार शून्य होण्याचा... विनम्र होण्याचा... मीपण संपल्याचा... शरण जाण्याचा क्षण. आपल्या श्रद्धास्थानास मनापासून आळविण्याचा क्षण. आपण समर्थ नसून आपल्याला तारणारी एक परम शक्ती असल्याचे मानणारा. एक संपूर्ण विश्वासाने संपूर्ण समर्पणाचा क्षण म्हणजे प्रार्थना! खरे तर प्रार्थना दिव्यत्वाकडे घेऊन जाणारे एक साधनच. जेवढे आपण त्या क्षणात एकरूप होऊ तेवढी ती प्रार्थना समर्थ होते, प्रभावी होते व आपणास एक बळ देऊन जाते. एक ऊर्जा आपणांस अंतकरणातून केलेल्या प्रार्थनेच्या मार्गावर घेऊन जाणारी ठरते. रंध्रातून शरीरभर पसरून जाते. किती सहज एक प्रार्थना आपणास विश्वातील त्या परमोच्च शक्तीशी एकरूप करते. शरीर, मन, वाणी एकत्र बांधली जाते व ईप्सित साध्य होण्याच्या दिशेने आपली पावले पडतात. ऑर्थर एडिंग्टन या ब्रिटिश वैज्ञानिकाने 'द नेचर ऑफ फिजिकल वर्ल्ड' या पुस्तकात 'द स्टफ ऑफ द वर्ल्ड इज माईंड स्टफ' असे तत्त्व सांगितले आहे. अर्थात विश्वात ज्या काही वस्तू, पदार्थ, गोष्टी घडत असतात त्या सर्व आपल्या डोक्यातील मनातील विचारांचे दर्शन आहे. आधी विचार येतो व पुन्हा तोच वस्तूरूपाने दृश्यमान होऊन घटना होऊन पुढे येतो. ती तेवढ्याच तत्काळ समोर येते जेवढा तो विचार बलवान असेल.

याच तत्त्वाच्या आधारे आपण प्रार्थनेकडे पाहिले तर प्रार्थना ही निव्वळ दुर्बलपणातून केलेले मागणी नसते किंवा ती काही भीक नाही, तर आपल्या शरीर, मन, वाणीच्या केंद्रीकरणातून मनाच्या गाभाऱ्यातील इच्छापूर्तीसाठी केलेली एक वैज्ञानिक, एक यौगिक क्रिया आहे. आपल्याच शक्तीला जागे करणारा किंवा आपल्याला आपल्या शक्तीपर्यंत घेऊन जाणारे ते एक माध्यम ठरते. त्यामुळे कोणत्याही धर्मात, पंथात प्रार्थनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. जेव्हा आपण एखाद्या मंदिरात जाऊन सगुण रूपातील मूर्तीकडे पाहतो तेव्हा तत्काळ आपला अहंकार गळून जाऊन आपण आपल्यातील शक्तीशी एकरूप होतो व हात जोडतो. मनोमन प्रार्थना करतो. हा क्षणभराचा क्षण आपल्या रोमरोमातून आपल्या बुद्धीकडे या विश्वातील ऊर्जेला आकर्षित करतो आणि ते वांछित तो विचार प्रार्थना होतो. फक्त एवढेच पाळता यावे की, प्रार्थना यांत्रिक होता कामा नये, ती कर्मकांड म्हणून करायला सुरुवात झाली की त्यातील एकरूपता तत्त्व विसरून जाते व उद्देश सफल होण्यास विलंब होतो. तसेही तेच तेच शब्द आदळून वांछित पूर्ण होते, परंतु जसे एखाद्या दगडावर पाण्याच्या लाटा आदळून आदळून

तो झिजतो तसे होईलही कदाचित, परंतु संपूर्ण वाणी, शरीर, मन एकाग्र करून केलेली प्रार्थना फलदायी ठरते. पवित्र निखळ मनाने निराकार साकार रूपाचे स्मरण करत विनम्र भावनेतून केलेली प्रार्थना आपणांस वांछित सफल करण्याचे बळ आपल्याही नकळत देते. त्यामुळेच हिंदू धर्मातील वेदांमधून, ऋचांमधून अनेक परमेश्वरी प्रार्थना असल्याचे दिसून येतात. या माध्यमातून एडिंट्न तत्त्वाचे प्रयोजनच कितीतरी वर्षांपासून आपण प्रत्यक्षात आणत होतो. ईशावास्य उपनिषदातील अठराव्या मंत्रात ही अशीच एक सुंदर प्रार्थना आहे.

अग्ने नय सुपथा राये अस्मान
विश्वानीदेव वयुनानी विद्वान
युयोध्यस्मिनजुह्वराणमेनो भुयिष्ठां
ते नम उक्तिं विधेम

तसे वरकरणी पाहता ही प्रार्थना वैश्विक कल्याणाची नसली तरी यष्टीकडून समष्टीकडे जाणारीच आहे. ही प्रार्थना अग्नि ला साक्षी ठेवून केलेली आहे. हा अग्नि यज्ञातील असेल व ज्योतिर्मय असेल किंवा सूर्यरूपातील भासमान अग्नि असेल वा मनुष्यातील अंतःकरणात निवास करणारा प्रकाश स्वरूप अग्नि असेल. मुळात अग्नि हे पवित्र, तेजाचे व चैतन्याचे दिव्यत्वाचे प्रतिक. अशुद्धी जाळणारे, अंधकार नष्ट करणारे, दिव्यत्वाचे स्मरण देणारे...! दिव्यत्वाचे दर्शन घडविणाऱ्या, दिव्यत्वाकडे नेणाऱ्या प्रतिकांना पाहूनच देव ही संकल्पना सुचली असावी याची प्रचिती ऋग्वेदकालीन वायू, अग्नि, वरुण, मरुत, पृथ्वी या देवतांना पाहून येते. ज्यांच्या जन्म-अंताबद्दल भाष्य करता आले नाही, जी रहस्यमय वाटूनही मनुष्य जीवन सुकर सफल करणारी वाटली, जी अखंड अव्याहतपणे प्रसन्नतेचे आल्हाददायकतेचे, दिव्यत्वाचे दर्शन घडवितात ती प्रतिके देवता बनल्याचे दिसते. ही दिव्य शक्ती, हे तेज माणसांचे सर्व कर्म जाणणारे असून सर्व ज्ञानाची परिचायक मानली गेली.

या प्रार्थनेत राये म्हणजे धन, संपत्ती, वैभव, ऐश्वर्य, सुखाची, समाधानाची अपेक्षा केली आहे. मुळात ही मानवी प्रवृत्ती आहे. मनुष्य मृत्यूपर्यंतही हे सर्व मिळविण्यासाठी धडपडत राहतो. मुळात हे सर्वकाही सोबत येत नसतेच, याची जाणीवही त्याला असते. तरीही मनुष्याची कामना वैभवाची असते. वैभव असावे, सुख, संपत्ती, ऐश्वर्य असावे. उपनिषद मार्गही त्यापासून मनुष्याला रोखत नाहीत, परंतु यातील खरे गमक आहे ते म्हणजे सुपथा राये या शब्दात. मुळात मनाची प्रवृत्ती सहज अधोगामी झुकणारी आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या विकारांना ती लवकर वश होते व मनुष्य कुकर्माकडे झुकतो. आणि या विकारांवर विजय मिळविणेही सोपे नाही. ती पुनः पुन्हा माणसाला सन्मार्गापासून परावृत्त करतात. जसे नदीच्या प्रवाहात वा वाऱ्यासोबत अनुकूल वाहने सोपे होते व प्रतिकुल वाहने कठीण असते, तसे या जीवनप्रवाहाचेही! त्यामुळे या पापकृत्यांना, विकारांना, कपट, घृणा उत्पन्न करणाऱ्या वृत्तींना दूर ठेवत, छळ कपट, लबाडी, फसवणूक, हिंसा, अत्याचार यांचे वळण वैभवाच्या लालसेने माणसांच्या कृत्यांना लागू नये, म्हणून ही प्रार्थना केली आहे. आधुनिक युगात तर उपभोगवादामुळे, चंगळवादामुळे मनुष्याची हाव वाढली व कुठूनही कोणत्याही मार्गाने यावे, पण धन यावे, अशी प्रवृत्ती वाढत आहे. वाढता भ्रष्टाचार त्याचेच तर प्रतिबिंब. महात्मा गांधी म्हणतात, साध्याकडे नेणारे साधनही तेवढेच पवित्र असावे, जेवढे साध्य पवित्र आहे. त्यालाच आपण साधनशुचिता म्हणतो. आपण वैभवाची अपेक्षा करत असू तर त्यासाठीचे साधनही तेवढेच पवित्र असावे. अनीती, अन्याय, अत्याचारातून, इतरांचे हिस्काटून घेणारी, शोषण करून कुमार्गाने मिळविलेले वैभव उपनिषदकर्त्यांना अपेक्षित नाही. त्यामुळे ते परमवैभवाची, सौख्याची तर अपेक्षा करतात परंतु त्याहीपेक्षा तिथे घेऊन जाणाऱ्या सुपथाची अपेक्षा करतात. कदाचित सत्मार्ग ही दुष्कर उर्ध्वगामी असल्यामुळे उर्ध्वगामी वृत्ती असलेल्या अग्निला साक्षी ठेवून ही प्रार्थना केली असावी. आज जो तो कमीत कमी वेळात, कमीत कमी श्रमात अधिक अधिक श्रीमंत होऊ इच्छित असताना ही ईशावास्य उपनिषदांतील वरील प्रार्थना ज्ञानेश्वर माऊलींच्या सत्कर्मी रती वाढोंचेच स्मरण करून देणारी असल्याची प्रचिती येते.



लोकशिक्षक

सत्कार समारंभात जानराव आणि खुशालराव मास्तरांची उच्च शैक्षणिक पात्रता, गुणवत्ता आणि सेवाज्येष्ठता या निकषांवर सत्कारासाठी निवड करण्यात आली होती. सर्व प्रमुख अतिथी आल्यावर कार्यक्रमाला सुरुवात झाली. जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि शिक्षण विभागाचे अधिकारी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर विराजमान झाले. सर्वात ज्येष्ठ, आदरणीय म्हणून कौतिकराव पाटलांना अध्यक्षपद देण्यात आलं. ईशस्तवन, स्वागत गीत होऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली. मुख्याध्यापक रामचंद्र धनगर यांनी प्रस्तावना मांडली. शाळेचा इतिहास, परंपरा, लौकिक, विद्यार्थ्यांच्या यशापयशाचा लेखाजोखा त्यांनी मांडला. जानराव आणि खुशालरावांचा परिचय करून दिला.

प्रा. बी. एन. चौधरी
९४२३४९२५९३

विद्यानगरमध्ये आज सकाळपासूनच वर्दळ सुरू झाली होती. गावकऱ्यांनी गावात एका समारंभाचे आयोजन केले होते. गावातील ग्रामपंचायत चौकात भव्य शामियाना उभारण्यात आला होता. ध्वनिक्षेपकावर गाणी सुरू होती. गावकरी कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून आपापली नेमून दिलेली कामं करण्यात गुंतले होते. समारंभाचं कारणही तसंच होतं. गावातील दोन शिक्षकांचा जाहीर सत्कार आयोजित करण्यात आला होता. सर्वत्र आनंदी आनंद होता.

बघता बघता वेळ पुढे सरकत होती. सकाळचे दहा वाजले. पाहुण्यांची लगबग सुरू झाली. आलेले पाहुणे पंचायतीत बसून चर्चा करत होते. आदर्श गाव विद्यानगरीचा लौकिक पंचक्रोशीत पसरलेला होता. गावचे सरपंच कौतिकराव पाटील यांच्या नेतृत्वात गाव प्रगतीची घोडदौड करत होतं. त्यांनी गावाच्या प्रगतीबरोबरच शिक्षणातही लक्ष घातलं होतं. विद्यार्थी–शिक्षक–समाज यांची सांगड घातली होती. समाजाला शाळेपर्यंत आणलं होतं आणि शिक्षकाला समाजापर्यंत नेण्याची त्यांची धडपड होती. शिक्षक हा समाज घडवतो, समाजाला दिशा देऊ शकतो. समाज बदलवू शकतो या विचारांवर त्यांची ठाम निष्ठा होती. कौतिकराव म्हणजे, 'बोले तैसा चाले' या प्रवृत्तीचा माणूस. गुणवत्ता जोखणारा आणि

माणुसपण जपणारा. त्यांच्याच कल्पनेतून हा कार्यक्रम उभा राहिला होता.

सत्कार समारंभात जानराव आणि खुशालराव मास्तरांची उच्च शैक्षणिक पात्रता, गुणवत्ता आणि सेवाज्येष्ठता या निकषांवर सत्कारासाठी निवड करण्यात आली होती. सर्व प्रमुख अतिथी आल्यावर कार्यक्रमाला सुरुवात झाली. जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि शिक्षण विभागाचे अधिकारी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर विराजमान झाले. सर्वात ज्येष्ठ, आदरणीय म्हणून कौतिकराव पाटलांना अध्यक्षपद देण्यात आलं. ईशस्तवन, स्वागत गीत होऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली. मुख्याध्यापक रामचंद्र धनगर यांनी प्रस्तावना मांडली. शाळेचा इतिहास, परंपरा, लौकिक, विद्यार्थ्यांच्या यशापयशाचा लेखाजोखा त्यांनी मांडला. जानराव आणि खुशालरावांचा परिचय करून दिला.

जानराव आणि खुशालराव एकाच वेळी शाळेत लागले. दोघांनी नोकरीला लागल्यानंतरही आपलं शिक्षण चालूच ठेवले. आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढविली. जानराव सामान्य घरातून आलेले. तर, खुशालराव सुखवस्तू श्रीमंत घरातले. जानराव वाड्यावस्तीत रमलेले, तर खुशालराव समाजाच्या उच्चभ्रू लोकांत वावरणारे. दोघांनी शिक्षणाची सर्वोच्च पदवी गाठलेली. डी.एड. होऊन नोकरीला लागलेल्या दोघांनी नंतर बी.ए, बी.एड, एम.ए, पीएच.डी. केलं. शाळेचं, गावाचं नाव वाढविलं. त्यांची गुणवत्ता पाहून शाळेला गौरव वाटायचा. मुख्याध्यापक धनगर यांना त्यांचा अभिमान वाटायचा. असं करत करत दोघांनी सेवेची तीस वर्षं पूर्ण केली होती. त्यांचा आदर्श इतरांना दिसावा, इतरांनी त्यांची प्रेरणा घ्यावी यासाठीच कौतिकरावांनी हा उपक्रम आयोजित केला होता. कार्यक्रम पुढे सरकत सत्कारापर्यंत आला.

सर्व मान्यवरांच्या हस्ते सत्कारार्थी शिक्षकांचा गुणगौरव करण्यात आला. सर्वप्रथम खुशालरावांना निमंत्रित करण्यात आले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ आणि चांदीचे पदक देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर जानरावांना निमंत्रित करण्यात आलं. त्यांचा सत्कार करताना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले. उपस्थितांनी दोघांच्या कार्याचं मनःपूर्वक कौतुक, अभिनंदन केलं. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली. उपस्थित जानराव आणि खुशालरावांचं कौतुक करत घरोघरी परतले.

घरी परतताना खुशालरावांच्या मनात एक शल्य बोचत होतं. सत्कार झाला. गुणगौरव झाला. मात्र, जानरावांना मिळालेलं सुवर्ण पदक त्यांच्या मनाला बोचत होतं. मनातली तगमग चेहऱ्यावर न दाखविता ते कुटुंबियांसह घरी पोहचले. थोडं निवांत झाल्यावर ते बैठकीतल्या सोफ्यावर सुस्तावले. थोड्या वेळात त्यांच्या पत्नी हातात पाण्याचा तांब्या आणि फुलपात्र घेऊन तेथे प्रकटल्या. फुलपात्र पाण्याने भरून त्यांनी ते खुशालरावांसमोर धरलं.

'अहो, पाणी घेतायं नां?'

'हो, दे. बरं झालं! घशाला कोरड पडली होती. हे जेवणच असं असतं.. दाल–बाटीचं.' असं म्हणत त्यांनी एका दमात फुलपात्रातलं पाणी संपवलं.

त्यांब्या व फुलपात्र जवळच्या टेबलावर ठेवत सुमित्राबाई जवळच्या खुर्चीवर बसल्या. खुशालरावांना मिळालेल्या सन्मानाने त्या खूप आनंदित होत्या. त्यांना मिळालेला भलामोठा पुष्पगुच्छ, शाल आणि चांदीच्या थोरल्या पदकाकडे बघत त्या म्हणाल्या.

'खूप छान झाला हो कार्यक्रम. गावानं योग्य दखल घेतली. आयुष्यभर केलेली नोकरी सत्कारणी लागली. चीज झालं तुमच्या सेवेचं.'

'हं म्हणत खुशालराव वर्तमानपत्र चाळू लागले.

'अहो, कार्यक्रम छान झाला. पण एक कोडं मला काही सुटत नाहीये.'

'कसलं कोडं?' खुशालराव सजग झाले.

'अहो, जानराव भाऊजी आणि तुम्ही दोघं एकाच वेळी शाळेत लागले. दोघांनी शिक्षणात सारखी प्रगती केली. सारखी तीस वर्षं सेवा केली. मग तुम्हाला चांदीचं पदक आणि त्यांना मात्र सोन्याचं पदक हा भेदभाव का केला गेला?'

सुमित्राबाईंच्या या प्रश्नाने खुशालरावांच्या दुखऱ्या

नसेवरच हात ठेवल्यागत झालं. त्यांच्या मनातही हाच प्रश्न फेर धरून नाचत होता. परंतु बायकोला समजुतीच्या चार गोष्टी सांगून त्यांनी वेळ मारून नेली.

'तसं नसतं गं ते...चांदी-सोन्याने आपल्याला काय फरक पडतो? रग्गड दिलंय देवाने आपल्याला. काही कमी केलं नाही. तसं कमी पडणार नाही इतकं कमवलंय आपण.'

'अहो, ते सारं खरंय, परंतु चारचौघात असा भेदभाव मला बाई पटला नाही. तुमचं वजन किती आहे गावात. मोठ्या लोकांत ऊठबस आहे तुमची... आणि तरीही...'

'चालायचंच गं, त्यात काय एवढं. तू नको विचार करू.'

खुशालराव पुन्हा वाचनात गढून गेले. त्यांच्या मनातलं विचारचक्र मात्र या चर्चेनं गतीमान झालं होतं.

संध्याकाळ झाली तरी खुशालरावांच्या मनातून पदकाची खंत काही केल्या जात नव्हती. त्यांनी फिरायला जायचे कपडे अंगावर घातले. पायात चपला घातल्या आणि ते फिरायला निघाले. जाताना त्यांनी जानरावांच्या घराकडून चक्कर टाकली. त्यांनाही सोबत घेऊन ते फिरायला गेले. नेहमीच्या ठिकाणी अगोदरच सर्व मंडळी जमली होती. सर्वांनी दोघांचं अभिनंदन करून कार्यक्रमाचं तोंडभरून कौतुक केलं. बराच वेळ गप्पा रंगल्या. अंधार वाढू लागला तसे ते उठले व घराकडे चालू लागले. घराकडे परतताना खुशालराव जानरावांना म्हणाले...

'जानराव, घरी जाताना आपण पाटलांकडे जाऊन यायचं का? आभार मानूया त्यांचे. त्यांनी आपला सत्कार केला. जाहीर कौतुक केलं.'

'वा! खुशालराव, माझ्याही मनात हेच होतं. कौतिकरावांचे आभार मानायलाच हवेत. मोठ्या मनाचे आहेत ते. जाऊया आपण त्यांच्याकडे..' असं म्हणत जानरावांनी होकार भरला. दोघांची पावलं पाटलांच्या घराकडे वळली. चालत चालत ते पाटलांच्या वाड्यावर पोहचले. पायऱ्या चढून दोघं वाड्यात आले. समोर देवडीवर लावलेल्या बंगईवर पाटील बसले होते. भारदस्त शरीर. कमरेला धोतर, अंगावर कोपरी, झुपकेबाज मिशांमधून पाटलांचा खानदानी रुबाब झळकत होता. दोन्ही सत्कारमूर्ती वाड्यावर आल्याचे पाहून पाटील बंगईवरून उठले.

'या, या मास्तर...बसा, बाकावर!' म्हणत त्यांनी दोघांचं स्वागत केलं.

दोघांनी पाटलांना नमस्कार केला आणि समोरच्या बाकड्यावर बसले.

'काय मास्तर, झ्याक झाला न्हवं कार्यक्रम?' म्हणत ते पुन्हा बंगईवर बसले आणि झोके घेऊ लागले.

'पाटील दादा, खूप छान झाला कार्यक्रम. आम्ही धन्य झालो. तुम्ही आमच्या कामाला न्याय दिला. आता थोडे दिवस राहिलेत. समाधानानं शाळेचा निरोप घेता येईल आता.' जानराव बोलले.

'मास्तर, ही उपकाराची आणि निर्वाणाची भाषा कशाला. आम्ही काय मोठं काम कलंय. आमचं कर्तव्यच हाय ते. तुम्ही आम्हाला ही संधी दिली बघा.' पाटील समाधानाने बोलले. त्यांची अनुभवी नजर खुशालरावांचा चेहरा वाचत होती. खुशालराव उगीच नजर टाळत होते. पाटील म्हणाले-

'खुशालराव, तुम्हाला कसा वाटला कार्यक्रम... मनमोकळेपणानं बोला.'

'पाटील दादा, कार्यक्रम देखणाच झाला. पण...?'

'पण... पण काय? निसंकोच बोला खुशालराव... तुम्ही तर गावचेच स्थानिक आहात.' पाटील बोलले.

'पाटील दादा, सारं छान झालं. मात्र एक कोडं काही सुटलं नाही.'

'ते कोणतं?'

'पाटील दादा, आम्ही एकाच दिवशी शाळेत लागलो. सारखं शिकलो. सारखी सेवा केली. मग, मला चांदीचं पदक आणि जानरावांना सोन्याचं पदक असं का केलं गेलं?'

खुशालरावांच्या या प्रश्नाने जानराव व पाटील चपापले. बंगईवर सावरून बसत पाटील म्हणाले-

'खुशालराव, मला तुमचा निर्भीडपणा व स्पष्टवक्तेपणा आवडला. मी तुम्हाला काही प्रश्न विचारतो. त्याची उत्तरंही अशीच स्पष्टपणे द्या.'

'पाटीलदादा, विचारा तुमचे प्रश्न. मी देतो खरी

उत्तरं.'

'प्रश्न तुम्हाला एकट्यालाच नाहीत, दोघांना आहेत... मला सांगा, गेल्या दोनचार वर्षांत तुम्ही किती आवांतर पुस्तकं वाचली? किती मुलांच्या पालकांशी संपर्क साधला? किती गरीब मुलांना मदत केली? किती नवोपक्रम शाळेत राबविले? किती विद्यार्थी घडविले? किती माजी विद्यार्थ्यांच्या तुम्ही संपर्कात आहात? किती विषयांवर लेखन केलं? विविध समाज-संतांवर गावात-परिसरात भाषणं केली? समाज प्रबोधन केलं? समाजाच्या सुखदु:खात सहभागी झालात? गावाच्या विकासात योगदान दिलं?'

पाटलांच्या प्रश्नांची जानरावांनी धाडधाड उत्तरं दिली. खुशालरावांना मात्र, आठवून आठवूनही काही आठवेना, पाटलांच्या प्रश्नांची धड उत्तरं देता येईनात. ते खजिल झाले. त्यांचे न्यून त्यांना उमगले होते. ते म्हणाले-

'पाटील, मला माफ करा. माझं समाधान झालं. या प्रश्नांची उत्तरं मी तुम्हाला पुढच्या वर्षी देईन. खूप शिकणं, भरपूर सेवा करणंच पुरेसं नाही. आपलं ज्ञान मुलांना त्यांच्या पातळीवर जाऊन वाटून देता आलं पाहिजे. त्याचा समाजाला उपयोग झाला पाहिजे. तरच ते ज्ञान, ती सेवा उपयोगाची. मी ज्ञानाला फक्त साठवलं. त्याला मुक्त केलं नाही. माठ पाण्याने भरून राहण्यात त्याची धन्यता नाही. त्यातलं पाणी पिऊन तहानलेल्याची तहान भागली तरच त्याचा उपयोग. खरंच अजून मला खूप शिकायचं आहे... मी शिक्षक तर झालोय, आता लोकशिक्षक व्हायचंय. माझे डोळेच उघडले तुम्ही!'

पाटलांना नमस्कार करून ते जायला उठले. पाटील म्हणाले-

'मास्तर, मला आनंद वाटला. तुम्ही समोरासमोर सोक्षमोक्ष लावला. तुमच्या प्रश्नाचं तुम्हीच उत्तर शोधलं!'

जानराव, खुशालराव वाड्याबाहेर पडले. चालू लागले. पुढे एका चौकात दोघांच्या वाटा वेगळ्या झाल्या. जानरावांनी खुशालरावांचा निरोप घेतला. खुशालरावांच्या मनाची बोच योग्य निदान झाल्याने हलकी झाली होती.



विवेक पुस्तक प्रकाशन

संघ जगणारा माणूस

लेखक - रवींद्र गोळे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेल्या शंभर वर्षांत असंख्य कार्येकर्ते तयार केले . ज्यांनी आपल्या जीवनाला संघस्पर्श करून घेतला आणि जगण्याचा ध्यास आणि श्वास संघ झाला अशापैकी एक पद्मश्री रमेश पतंगे. लेखक, विचारवंत, पत्रकार, समाजचिंतक अशा विविध भूमिका पार पाडताना संघाचा विचार प्रकट करणाऱ्या रमेश पतंगेचे शब्दचित्र म्हणजे संघ जगणारा माणूस

मूळ किंमत २२५/-, सवलत मूल्य २००/-

संपर्क : कार्यालय -७५०६७३२९०५
आणि स्थानिक प्रतिनिधी

Bank Details - Hindustan Prakashan Sanstha
Bank Of Maharashtra, Prabhdevi Branch
IFSC Code - MAHB0000318
A/C No. 20109800154



चेहरा : भावनांचे दर्पण!

चेहरा सातत्याने भाव, रंग बदलतो. म्हणून 'सरड्याप्रमाणे रंग बदलणे' अशी एक धारणा समाजात सर्वत्र आढळते. चेहऱ्याचा रंग गोरा असतो, निमगोरा असतो, काळा असतो. गव्हाळ रंगही चेहऱ्याचे सौंदर्य वाढवत असला तरीही अनेकांना आवडतो, भावतो, पसंत पडतो तो म्हणजे गोरा रंग! अशा सौंदर्यातील गोडवा, आकर्षण तसूभरही कमी होत नाही. अशा सुंदरतेचे आकंठपान करीत असताना ओठ एक लोकप्रिय गीत गुणगुणतात...

नागेश सू. शेवाळकर
९४२३१३९०७१

मानवी शरीरात एक आत्मा असतो असे म्हणतात, मानतात. हा आत्मा कधीच कुणाला दिसला नाही, पण त्याचे अस्तित्व आहे म्हणून सजीव सचेतन आहे, जिवंत आहे. एकदा का या आत्म्याने शरीराची साथ सोडली की, शरीर निर्जीव होते.

मला वाटते शरीराच्या आत जसा एक आत्मा असतो तसाच शरीराच्या बाह्य भागातही एक आत्मा असतो, कारण आपली पाच ज्ञानेंद्रिये हा बाह्य आत्मा मोठ्या अभिमानाने मिरवतो. हा बाह्य आत्मा म्हणजेच चेहरा! नाक, कान, डोळा, त्वचा आणि जीभ हीच ती पाच ज्ञानेंद्रिये! जी चेहऱ्याचे सौंदर्य खुलवितात आणि विविध विषयाची माहिती, ज्ञान मानवाला देतात. नाक हे मानवी सौंदर्याचा एक महत्त्वाचा अवयव! अगदी चाफेकळी नाक म्हटलं की, सौंदर्याची एक वेगळीच आकर्षक अशी अनुभुती आपल्यासमोर येते. कोणत्याही पदार्थाचा वास नाकाद्वारे आपण घेतो. नाकाने कांदे सोलणे, नाक मुरडणे अशा गोष्टी बोलल्या जातात. कान या इंद्रियाच्या माध्यमातून आपणास आवाजाची माहिती मिळते. आवाजाच्या विविध प्रकारचे वर्गीकरण आपणास मिळते. हलक्या कानाचा, कान तिखट आहेत, कान फुंकणे, कान भरणे अशी अनेक

विशेषणं या महत्त्वाच्या अवयवाला आपण दिली आहेत. ओठ आणि दात यांच्या आतमध्ये एक अत्यंत महत्त्वाचा अवयव दडला आहे. बत्तीस कोट जिचे संरक्षण करतात अशी ही आपली जीभ, रसना! एखाद्या मोठ्या इमारतीत, कार्यालयात प्रवेश करताना चौकशी करण्यासाठी सुरक्षा रक्षक नेमलेला असतो. त्याच्या करड्या नजरेतून सहसा कुणी सुटत नाही तसेच कार्य जीभ आपल्या शरीरासाठी करते. कोणताही पदार्थ जिभेच्या पसंतीला उतरला तरच तो दाढेखाली जातो, अन्यथा त्याची हकालपट्टी केली जाते.

म्हणूनच जिभेचा पट्टा चालणे, चुरुचुरु बोलणे इत्यादी विशेषणं जिभेला दिली जातात. 'एक नार जिचे जिव्हारी लागती वार!' असेही बोलले जाते. बत्तीस दातांच्या मध्ये जीभ विहार करते किंवा बत्तीस दातांना एकाचवेळी कामाला लावते म्हणून असे म्हणतात की, 'एक नार, बत्तीस यार!'

त्वचा शरीरावरील एक पातळ आवरण, पण तितकेच महत्त्वाचे! स्पर्शाचे ज्ञान आणि संवेदना देणारी ही त्वचा रुक्ष, ओलसर, संवेदनशील असते. इतर चार ज्ञानेंद्रिये जसे चेहऱ्याचे सौंदर्य, आकर्षकता वाढवितात त्याहीपेक्षा जास्त संवेदनशील, आकर्षक आणि अनेकानेक भावनांचे उगमस्थान म्हणजे डोळे! म्हणून चेहऱ्याच्या आणि मानवाच्या सुंदरतेमध्ये अधिकाधिक भर घालण्याचे काम डोळे करतात. म्हणून एक कवी डोळ्याच्या बाबतीत म्हणतो,

'ये झील सी आँखे, कोई राज़ है इनमे गहरा' असे सहज म्हणून जातो. तर दुसरीकडे कुणाला डोळे हे समुद्राप्रमाणे भासतात. कुणी डोळे बंद करताच त्याच्या डोळ्यासमोर विविध आवडत्या आकृत्या तरळून जातात. एक कवी म्हणतो,

'आँखे बंद कर के जो एक चेहरा नज़र आया,
वो तुम्ही हो ऐ सनम, वो तुम्ही हो ऐ सनम।'

डोळा लवलवणे, डोळा फडफडणे अशा काही गोष्टी डोळ्याचे महत्त्व स्पष्ट करतात. ही पाच इंद्रिये त्यांच्या कार्याने, त्यांच्या ठेवणीने, त्यांच्या हालचालीतून चेहऱ्याचे सौंदर्य खुलवतात, व्यक्तिमत्त्वाला चार चाँद लावतात. या इंद्रियांमुळे समोरची व्यक्ती आकर्षित होते. या पाचपैकी एखादा अवयव त्याच्या कार्यापासून जराही विचलित झाला, योग्य काम करीत नसला की हमखास चेहरा अनाकर्षक होतो, चेहऱ्यावरील भाव बदलतात.

खरे तर जन्मतः जो चेहरा असतो तोच खरा चेहरा असतो. वय वाढत जाते तसा चेहराही बदलत जातो. अनेकदा परिस्थितीनुरूप चेहऱ्यावरील भाव बदलत जातात. हे बदलणारे भाव स्थायी नसतात. म्हणून चेहरा कायम तसा राहत नाही. चेहऱ्यावरील बदललेला कोणताही भाव नैसर्गिक नसतो. म्हणून दिसतो तसा चेहरा नसतो.

चेहरा कसा आहे तर तो आकर्षक आहे, गोजिरवाणा आहे, हसरा आहे तसाच तो खेळकर, खोडकर आणि बालीशही आहे. चेहरा जसा लाजरा आहे तसाच तो बुजराही आहे आणि म्हणूनच एका गाण्यात म्हटले आहे,

'एक लाजरा नं साजरा मुखडा
चंद्रावानी फुलला गं...'

लाजरा असा चेहरा, चेहऱ्यावर लज्जेची लाली पसरलेला चेहरा असा चेहरा कवीला चंद्राप्रमाणे प्रफुल्लित, आकर्षक वाटतो. 'चेहरा है या चाँद खिला है...' असा प्रश्न पडावा इतके साम्य कुणाला चंद्र आणि चेहरा यामध्ये जाणवते. अनेकांची अशी एक इच्छा असते की, चंद्राप्रमाणे असलेला चेहरा सातत्याने माझ्यासमोर असावा. ज्या दिवशी असा चेहरा समोर येणार नसेल तो दिवस उगवूच नये. एका शायरला असे वाटते की–

'फूलों सा चेहरा तेरा, कलिओं सी मुस्कान है,
रंग तेरा देख के, रूप तेरा देख के कुदरत भी हैरान है।'

किती उत्कृष्ट भाव आहेत ना हे! फुलाप्रमाणे नाजूक चेहरा असून त्यावरील मधाळ, खोडकर हसू हे एखाद्या कळीप्रमाणे आहे. तुझं हे अनोखं, हवंहवंसं रूप पाहून निसर्गही अवाक् झाला आहे, आश्चर्यचकित झाला आहे. अशाच भावना ह्या प्रत्येकाच्या असतात.

चेहरा तेजस्वी असतो. ते तेज पाहिल्याबरोबर लक्षात येते की, ही व्यक्ती ज्ञानी आहे, तपस्वी आहे. अभ्यासू व्यक्तीच्या चेहऱ्यावरील तेजही समोरील माणसाला आकर्षित करते. नतमस्तक व्हायला कारणीभूत ठरते.

पवित्र, सोज्ज्वळ चेहऱ्यावरील भाव त्या माणसाच्या सहवासात राहण्यासाठी अगतिक करतात.

प्रसन्न, उत्साही, आनंदी चेहरा दिसला की मानव त्याकडे ओढला जातो. त्याच्या सहचर्यात एक वेगळीच प्रसन्नता, समाधान मिळते. मिश्कील, विनोदी व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्तिला मित्रांची कमतरता कधीच भासत नाही. लोहचुंबकाप्रमाणे मानव त्याच्या अवतीभवती रेंगाळतो. चेहरे स्वप्नाळूही असतात. जीवनात अनेक स्वप्नं घेऊन ती जीवन जगत असतात. त्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी धडपडत असतात, अगणित कष्ट करीत असतात. अशी स्वप्नपूर्ती झालेल्यांच्या चेहऱ्यावर कृतकृत्यतेचे, समाधानाचे भाव असतात. जीवनाच्या उत्तरार्धात सुखावलेले चेहरे हे त्यांचे कष्टाचे झाड आनंदाने, सुखाने लगडलेले असते याचे द्योतक असतात.

काही व्यक्ती आपल्या व्यवसायात, आचरणात, संसारात अत्यंत प्रामाणिक असतात. त्यांची ही प्रामाणिकता त्यांच्या चेहऱ्यावर मोठ्या अभिमानाने प्रकट झालेली असते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला सतेज करणारा, खुलविणारा दागिना म्हणजे प्रामाणिकता!

आत्मविश्वास! चेहरा फुलवणारा एक पैलू! संकट कसेही असो, वेळ कशीही असो प्रत्येक वेळी ही माणसे अत्यंत आत्मविश्वासाने सामोरी जातात. धीर न सोडता, हिंमत न हारता ही नेहमी पुढे असतात.

काही चेहऱ्यावर अगतिकतेचे दर्शन घडते. काही तरी प्राप्त करण्यासाठी जी तगमग चालू असते ती चेहऱ्यावर उमटते. मानवी वृत्ती, संवेदना अगतिक होतात. कधीकधी या अगतिकतेचे चेहऱ्यावरील भाव लालुच हा गुणही दर्शवतात. पुढे जाऊन हवे ते मिळवण्यासाठी चेहऱ्यावरील बदललेल्या भावातून निर्लज्जताही पुढे येते.

प्रसंगानुरूप चेहरा अनाकर्षक भासतो. तसाच तो निस्तेजही असतो. दुःखी, रडका हे भाव चेहऱ्यावर अनेकदा पाहायला मिळतात. अप्रामाणिक, अपराधी, कंटाळलेला इत्यादी अनेकानेक भावभावनांनी नटलेला चेहरा स्वतःकडे आकृष्ट करण्यासाठी असमर्थ ठरतो.

अनेकदा असे वाटते की, समोरचा चेहरा काही तरी सांगू पाहतोय, पण त्याला शब्द सापडत नाहीत, त्यांची जुळवाजुळव करता येत नाही. किंवा असेही वाटते की, समोरचा आपल्यापासून काही तरी लपवतो आहे.

अनेक चेहरे निर्विकार असतात. वातावरण कसेही असो त्यांच्या चेहऱ्यावरील भाव बिलकुल बदलत नाहीत. कठोर चेहरेही अनेकदा बघायला मिळतात. हास्यप्रसंगातही चेहऱ्यावरील कठोर भाव कायम ठेवून त्यांची प्रतिक्रिया उमटते.

चेहरा सातत्याने भाव, रंग बदलतो. म्हणून 'सरड्याप्रमाणे रंग बदलणे' अशी एक धारणा समाजात सर्वत्र आढळते. चेहऱ्याचा रंग गोरा असतो, निमगोरा असतो, काळा असतो. गव्हाळ रंगही चेहऱ्याचे सौंदर्य वाढवत असला तरीही अनेकांना आवडतो, भावतो, पसंत पडतो तो म्हणजे गोरा रंग! अशा सौंदर्यातील गोडवा, आकर्षण तसूभरही कमी होत नाही. अशा सुंदरतेचे आकंठपान करीत असताना ओठ एक लोकप्रिय गीत गुणगुणतात...

'तेरी प्यारी प्यारी सूरत को, किसी कि नजर ना लगे
चश्म–ए–बद्दूर
मुखडे को छुपालो आंचल में, कही मेरी नजर ना लगे
चश्म–ए–बद्दूर।'

चेहरा हवाहवासा, मधाळ, मोहक असा असला की, दृष्ट लागणे हे क्रमप्राप्त! त्यामुळे कवी असे सुचवितो की, तुझ्या अत्यंत मनमोहक अशा चेहऱ्याला कुणाचीही काय, पण माझीही नजर लागू नये म्हणून हे प्रिये, तुझा हा गोरा गोरा चेहरा पदराखाली लपवून टाक.

कैफ भोपाली चेहऱ्याचे वर्णन करताना लिहितात,

'तेरा चेहरा कितना सुहाना लगता है,
तेरे आगे चाँद पुराना लगता है।'

प्रियेचा चेहरा कविला इतका आवडतो, इतका लुभावतो की त्याला प्रत्यक्षात चंद्रही त्या चेहऱ्यापुढे टवटवीत, प्रफुल्लित वाटत नाही, तर जुना वाटतो.

अजून एका गीतामध्ये चेहरा किती गोड, आकर्षक आहे, मोहित करणारा आहे हे सांगितले आहे...

'तेरे चेहरे से नजर नही हटती,
नजारे हम क्या देखे...'

अशी काय चेहऱ्याने मोहिनी घातली आहे, असे

कोणते मनमोही दृश्य विराजमान आहे की, प्रियेचा चेहरा सोडून अन्य कुठे पहावेसे वाटत नाही.

चेहरा हा मानवी मनाचा आरसा, पुस्तक आहे असे म्हणतात. मनात चाललेले विचार, मन योजित असलेल्या योजना ह्या चेहऱ्यावर दिसतात. कदाचित ते खरेही असेल, परंतु खरेच तसे असते तर आपण समोरच्या माणसाच्या मनात कोणते बरेवाईट विचार चालू आहेत हे समजून त्याप्रमाणे त्याच्याशी वागलो असतो. अनेक व्यक्ती चेहऱ्यावरुन आपल्याला ह्या प्रामाणिक वाटतात, सहृदयी भासतात, परंतु इतरांशी बोलताना, वागताना, व्यवहार करताना त्यांच्या मनात चाललेले विचार आणि चेहऱ्यावरील भाव वेगळेच असतात म्हणून अनेकदा फसवणूकही होते. एका गीतातील शब्दांनी हे विचार अधिक स्पष्ट होतात...

'दिल को देखो चेहरा न देखो
चेहरों ने लाखों को लूटा
हाँ दिल सच्चा और चेहरा झूठा...'

चेहऱ्याचे असे दुसरे रूप प्रत्येकाच्या जीवनात कधी ना कधी डोकावते, म्हणून चेहऱ्यावरील भाव पाहून फसू नका, तर त्याच्या अंतःकरणात शिरून त्याच्या भावभावनांचा अभ्यास करा, कारण चेहऱ्यावरील भावांच्या आहारी जाऊन एक नाही, दोन नाही, तर लाखो लोक लुटले गेल्याची भावना गीतकार व्यक्त करतो आणि हे गीत प्रचंड लोकप्रिय होते, कारण ह्या भावना केवळ एकट्या कवीच्या नाही आहेत, तर ह्या भावना कोट्यवधी लोकांच्या आहेत. प्रत्येकाला ह्या भावना जवळच्या वाटतात...

दुसऱ्या एका गीतकाराने अशाच भावना व्यक्त केल्या आहेत. तो लिहितो...

'जब भी जी चाहे, नई दुनिया बसा लेते है लोग।
एक चेहरे पे कई चेहरे, लगा लेते है लोग।'

समाजात वावरताना असे अनेक चेहरे आपल्याला संपर्कात येतात. प्रसंग, वेळ जशी येईल तसा चेहऱ्यावर मुखवटा घालून लोक फिरत असतात. मुखवटा तरी एक प्रकारचा असतो का, तर मुळीच नाही. नाना प्रकारचे आवरण चेहऱ्यावर ओढलेले असतात. कुणाच्या आसवावर स्वतःच्या आनंदाचे जग निर्माण करणारे लोक कमी नाहीत. कुणाला आपले आणि कुणाला परके समजावे हे ओळखता आले पाहिजे. कारण समाजातील प्रत्येक चेहरा कोणत्या ना कोणत्या आवरणाने झाकलेला असतो.

सिनेमा, मालिकेतील चेहरेही अनेक भावभावना घेऊन आपल्या समोर येतात. त्याही चेहऱ्यावर अनेकानेक मुखवटे असतात. आपण रसिक, प्रेक्षक त्या अभिनयाच्या सादरीकरणात वाहवत जातो. त्यांच्या चेहऱ्यावर जे विविध भाव येतात तसेच भाव बहुतांश रसिकांच्या चेहऱ्यावर येतात.

मुळात चेहरा आकर्षक असतो. अविश्रांत काम केलेला चेहऱ्यावरील भावही आकर्षित करतात, लक्ष खिळवून ठेवतात. नैसर्गिक चेहरा हाच खरा सौंदर्यवतींचा अलंकार असतो, पण आजकाल चेहऱ्यावरील मूळचे विलोभनीय सौन्दर्य लपवून तिथे अनैसर्गिक सौंदर्य ठसविण्याचा प्रकार चालू आहे ना, तोच कधीकधी चेहऱ्याला अत्यंत अनाकर्षक बनवतो. अनेकदा प्रसाधनांचा मारा केलेल्या चेहऱ्याकडे पाहवत नाही. असो. ज्याचे त्याचे भाव ज्याला भावत असतील, आवडत असतील तर तुम्ही आम्ही कोण त्या सौंदर्याला नावे ठेवणारे! कारण सौंदर्य प्रसाधने हाही चेहऱ्यावर ओढलेला एक पडदाच असतो...



राधा अंतरंगी जपली

दिवस जात होते, कृष्ण मथुरेचा राजा होता, राधा गोकुळात गौळण होती. कृष्णाच्या सुदर्शन चक्राच्या गतीवर दुनिया फिरत होती. राधेचा हाथ मात्र शेणाच्या गोवऱ्या थापत होते. गाई वासरांना धुत होते. तिचे डोळे नवऱ्यात कृष्ण शोधत असायचे पण पूर्ण पुरुषोत्तम असलेल्या कृष्णाचा एकही गुण अनयमध्ये तिला सापडत नसे. मग वटसावित्रीला वडाभोवती फेरे मारताना तिला इतर गौळणी चिडवयाच्या, तिने नेमकेपणाने कोणाच्या नावाचे सूत वडाला बांधले? म्हणून विचारायच्या. मात्र तिचा सावित्रीचा धर्म अनय डोळ्यासमोर आणायचा तर कानावर पडणारा बासरीचा स्वर कृष्ण दाखवायचं मग त्या विचारांच्या गर्दीत ती फक्त इतकंच म्हणायची, हे ईश्वरा हा माझा सातवा जन्म असू दे आणि मुक्त कर मला यापुढे जन्म मरणाच्या फेऱ्यातून...

किरण शिवहर डोंगरदिवे

७५८८५६५५७६

तसं त्याच नाव काहीही असल तरी फरक पडत नाही म्हणून त्याच नाव कृष्णच, आता कृष्णांची सच्ची प्रेमिका दुसरी कोणी असू शकत नाही म्हणून तिचं नाव राधाच. आता ते वाळवंटात खेळो की गोकुळात त्याच्या प्रेमात का फरक पडणार आहे? नाही ना मग आपण कशाला त्यांना ओसाड वाळवंटात न्यायचं? मग त्यांच्या लीला रंगायच्या त्या गोकुळातच, प्रेमाला जात नसते, धर्म नसतो आणि वयाचे बंधनही नसते. मग राधा कृष्णापेक्षा मोठी म्हणा की कृष्ण राधेपेक्षा, मात्र कृष्ण आर्थिकदृष्ट्या सधन होता. आणि राधा रोजीरोटीच्या भ्रांतेत. कृष्णाच्या लहानपणापासून एकमेकांची ओढ, आणि एकमेकांच्या प्रेमात आयुष्य कसे निघून गेले ते दोघांनाही कळलं नाही. राधेचा नवरा अनय जाणून होता की राधा बायको आपली आहे पण प्रेमिका कृष्णाची आहे. त्याची विशेष तक्रार नव्हती किंवा असली तरी त्यानं ती कधी व्यक्त केली नाही. त्याला पक्क ठाऊक होतं की राधेच हसणं फुलण, प्रसन्न राहणं अगदी श्वास घेणं त्या श्वासच सुगंधित होऊन वाऱ्यालाही सुगंधी करण हे फक्त कृष्णाला आणि कृष्णाला म्हणजे फक्त कृष्णालाच शक्य आहे. तो बासरी वाजवतो आणि त्या सुरांनी राधेचा श्वास चालतो. त्यामुळे त्याने कधी त्याच्या आणि तिच्या संबंधात कृष्णावरून राधेला दूषण दिलं नाही की पाप लावलं नाही. तसं म्हणावं तर

पाप लावावे तरी कसं? कारण प्रेम म्हणजे पाप असते का? नाही नक्कीच नाही.

तिचं परिस्थिती होती रुख्मिनी आणि सत्यभामेची... त्या दोघी एकमेकींचा सवतीमत्सर करत. स्वर्गातून आणलेला पारिजातक एकीच्या दारात आणि फुले दुसरीच्या अंगणात हा असा काहीसा प्रयोग करून त्यांच्या सवतीमत्सराला अगदी खेळकरपणे घेत कृष्ण त्या पारिजातकाच्या अर्ध्या सावलीत बासरी वाजवू लागला की त्या दोघींनाही आपला एकमेकांचा सवतीमत्सर करणे विनाकारण असल्याची जाणीव होत असे कारण त्या बासरीच्या सूरात ना भामा असे ना रुख्मिना.... तो प्रत्येक सूर फक्त 'राधा राधा राधा' असे आळवीत असे. एखादेवेळी त्यांच्यापैकी कोणी एखादी म्हणायची ,का नाही आणत तुम्ही राधेला आमच्या सोबत राहायला? कृष्ण हसायचा आणि आपल्या सोबत राहणाऱ्या आणि सवतीमत्सर करणाऱ्या स्त्रिया आणखी एक सवत आणायला सांगतात, किती मोठा हा विनोद...? तर त्या वेळी कृष्णनारी 'मनात निव्वळ राधा, राधा, मग काय फरक पडतो आपल्या सोबत राहिली तर? असा विचार करत.

दिवस जात होते, कृष्ण मथुरेचा राजा होता, राधा गोकुळात गौळण होती. कृष्णाच्या सुदर्शन चक्राच्या गतीवर दुनिया फिरत होती. राधेचा हाथ मात्र शेणाच्या गोवऱ्या थापत होते. गाई वासरांना धुत होते. तिचे डोळे नवऱ्यात कृष्ण शोधत असायचे पण पूर्ण पुरुषोत्तम असलेल्या कृष्णाचा एकही गुण अनयमध्ये तिला सापडत नसे. मग वटसावित्रीला वडाभोवती फेरे मारताना तिला इतर गौळणी चिडवयाच्या, तिने नेमकेपणाने कोणाच्या नावाचे सूत वडाला बांधले? म्हणून विचारायच्या. मात्र तिचा सावित्रीचा धर्म अनय डोळ्यासमोर आणायचा तर कानावर पडणारा बासरीचा स्वर कृष्ण दाखवायचं मग त्या विचारांच्या गर्दीत ती फक्त इतकंच म्हणायची, हे ईश्वरा हा माझा सातवा जन्म असू दे आणि मुक्त कर मला यापुढे जन्म मरणाच्या फेऱ्यातून...

मग एक दिवस उगवला कृष्ण त्याच्या एका बालमित्राकडे गेला, परचुंडीभर पोहे खाऊन त्या गरीब मित्राला सोन्याची नगरी बहाल केल्याची वार्ता सर्वत्र पसरली. शेणाच्या गोवऱ्या थापणाऱ्या राधेला तिच्या मैत्रीने सूदाम्या प्रमाणे तुझेही नशीब बदलणार अस म्हणून चिडवू लागल्या. काही काही बहाद्दर तर अगदी राधेच्या नवऱ्यालाही आता काय बुवा, तुझंही घर सोन्याचे होणार, सूदाम्याने पोहे दिले तुला तर त्याचीही गरज नाही, राधेन एकदा त्याच्याकडे हसून पाहिलं की झालं... हा घाव त्याच्या वर्मी बसला तो कधी नव्हे तो कृष्णाचा मत्सर आणि राधेचा दुश्वास करू लागला. राधेची सासूही तिला घालून पाडून बोलू लागली. मुलं ना बाळ, भाऊ ना बहीण, माय ना बाप तिचे सर्वस्व फक्त कृष्ण... आता त्या कृष्णावरूनच तिचा सासुरवास सुरू झाला मग तिने तरी काय करावे. जन्म भर कृष्ण वेडी , कृष्ण सखी म्हणून ती गोवऱ्या थापत होती. कष्टाचे जिणे जगत होती. तिचा सखा राजा झाला पण... पण ती राणी नव्हती, तिचा ह्या विचाराने जीव भंडावला, ती त्रागा करू लागली. कृष्णाला नाव घेऊन शिव्या देऊ लागली.आता ते रागात हो की प्रेमात राधेन त्याच नाव घेताच तो मथुरेत अस्वस्थ झाला त्याला राधेच दुःख, त्रास गरिबी सर्व समजले. त्याने सोळा सहस्त्र कैदेतील स्त्रियांना सोडवून सौभाग्यवती म्हणून मिळवण्यासाठी आणि लोक लज्जा टाळण्यासाठी स्वतःचे नाव त्यांचा नवरा म्हणून लावण्याची मुभा दिली, प्रसंगी आठ पट्टराण्या केल्या पण कुणाच्या विवाहिते सोबत लग्न करून त्याने तत्कालीन धर्माचे क्षालन केले नव्हते. किंवा कुणा पतिव्रतेला पापाचे भागीदार केले नव्हते. पण आता तो धर्मसंकटात होता. राधा रूप झालेला कृष्ण किंवा कृष्ण रूप झालेली राधा ह्यांनी एकत्र आले पाहिजे असे त्याच्यातील सामान्य माणसाचे पुरुषी मन सांगू लागले तर सतीच्या धर्माला बाधा नको असे त्याच्यातील पूर्ण पुरुषोत्तम सांगत होता. त्याची घालमेल नेमकी रुख्मिनीने ओळखली तिने त्याची प्राणप्रिय बासरी त्याच्या हातात दिली आणि सांगितले की जा, नका करू पर्वा जगाची, तुमच्या वरील प्रेमासाठी मी भावाची इतर कुणाची पर्वा न करता भर स्वयंवरातून तुमच्या रथातून तुमच्या सोबत आले होते, एक स्त्री असून मी माझ्या खऱ्या प्रेमाचे जतन करण्यासाठी सर्व पणाला लावले तर तुम्ही तुमच्या अगदी बालपणापासूनच्या प्रेमासाठी जगाचा विचार का करावा?

त्यावर कृष्ण बोलला ,पण तिच्या माझ्या नात्याला नाव देण्याची गरजच नाही आम्ही एकच आहोत मग हे नात्याला नाव देण्याचे कारण काय? आपला नवरा सर्व व्यापी असला तरी आणि सर्व ज्ञानी असला तरी तो द्विधा मनस्थितीत आहे हे तिने ओळखले आणि फक्त हवा पालट म्हणून गोकुळात यमुनेकाठी जाऊन बासरी वाजवण्याची विनंती तिने त्याला केली. अर्थात दोन्ही कामे त्याच्या आवडीची तो नाही तरी कसा म्हणणार?

मग यमुनेच्या काठावर बासरीचे सूर घुमू लागले. वारा थबकून सुगंधित होऊन प्रसन्नतेने वाहू लागला. शांत पाण्यात आपोआप तरंग उमटू लागले. झाडे प्रसन्नतेने डोलू लागली आणि पक्षी त्या सूरात सूर मिसळून गाऊ लागले. गायींनी चारा खाणे थांबविले, वासरानी दूध ओढणे थांबविले. वाघ आणि ससा एकत्र बासरीचे स्वर ऐकू लागले. साऱ्या गोकुळात बासरीचे सूर व्यापले. गौळणीच्या हंड्यातील लोणी आनंदाचे उधाण आल्यागत स्वतःहून बाहेर पडू लागले. परसात गोवऱ्या थापणाऱ्या राधेच्या बोटांचे ठसे त्या ओल्या शेणावर उमटले की त्यातून आपोआप कृष्णरूपाची आकृती तयार होऊ लागली. ती व्याकुळ झाली तिचे मन यमुनेच्या तीराकडे धाव घेऊ लागले पण तिच्या देहावर सासूचा आणि मनावर समाजच्या रीती परंपरेचा पहारा होता. ती निमूटपणे गोवऱ्या थापत राहिली. तेवढ्यात तिथे तिच्या सासूची मैत्रीण आली. राधेन थापलेल्या गोवऱ्यावर कृष्णाची छबी पाहून ती राधेच्या सासूला म्हणाली, बयो, राधेच्या ह्या गोवऱ्याला कोण मोल घेईल, अग त्यावर कृष्ण आहे, आता तो ह्या राज्याचा राजा आणि गोकुळाचा लाडका देव आहे त्याला कोण चुलीत जाळणार, फुकट गेल्या बघ ह्या गोवऱ्या...! आता राधेची सासू कावली, राधेच्या कृष्ण वेडाने आजवर बरीच बदनामी तिने सहन केली होती आता तर राधेच्या ह्या कृष्ण वेडात उपाशी मरायची वेळ येईल असे तिला वाटू लागले. राधेचाही पारा आता चढू लागला होता. पण राग गिळून ती आता लोणी काढालेले लोणी पाहायला गेली. तर लोणी गायब! आता दुष्काळात तेरावा महिना लोणी चोरीला गेले, रागाच्या भरात लोणी पळवणार एकच चोर तिच्या पुढे



उभा राहिला आणि अगदी तिच्या समोरून निघून गेलेले मांजर तिला दिसले नाही. गोवऱ्या विकल्या जाणार नाहीत आणि घरातील लोणी चोरीला गेलंय म्हणजे आता उद्याच्या डाळ दाण्याचे काय? असा प्रश्न तिच्या पुढे उभा राहिला. हाच प्रश्न तिच्या मागून येऊन उभ्या राहिलेल्या तिच्या सासूलाही पडला. आणि दाराआड उभी करून ठेवलेली काठी हातात घेऊन कसलाही विचार न करता तिने लागोपाठ तीन जोरदार वार तिच्या पाठीवर केले. जीवाच्या आकांताने ती पळाली. पण पळणार कोठे? संध्याकाळी गाई घेऊन गेलेला नवरा वापस येईल आणि त्याच्या आईला समजून सांगेल आणि मग सासूचा राग शांत होईल तोवर थांबू बाहेरच कोठेतरी असे तिने ठरविले. आणि ती पळत राहिली. पळत पळत ती एके ठिकाणी थांबली. तिने नजर वर उचलून पाहिले तर ती यमुनेच्या काठावर उभी होती आणि समोर उभा होता कृष्ण डोळे बंद करून बासरी वाजविण्यात मग्न झालेला. तिचा पारा

चढला ह्याने माझे लोणी चोरले आणि इथे येऊन बासरी वाजवतोय, लहानपणीही असच करायचा, ह्याचा मुळे माझ्या गोवऱ्या विकल्या जाणार नाहीत. ह्याच्यामुळे मी आज मार खाल्ला... मार खाल्ला? पण मग लागले कसे नाही ती स्वतःशीच विचार करू लागली. जाऊ दे सासूने मारले ते पळण्याच्या गडबडीत हुकले असेल, पण लागले असते तर? ती त्वेषाने कृष्णाच्या पुढे जाऊन उभी राहिली. त्याच्या ओठाची बासरी तिने अक्षरशः ओढून घेतली. सूर थांबले, कृष्णाने डोळे उघडले समोर राधा दिसताच तो प्रसन्न हसला.

राधे, आजही तू माझ्या बासरीच्या सूरांनी माझ्याकडे ओढली गेलीस, होय ना? त्याने मोठ्या कातर स्वरात तिला विचारले.

होय, आले मी धावत, पण तुला माहीत आहे का माझे दुःख? राधा अतिशय त्रस्त स्वरात बोलली.

काय झालं राधे? आज तिच्या बदललेल्या स्वरांनी व्याकुळ होत कृष्ण बोलला.

मी कंटाळले आहे तुझ्या ह्या प्रेमाला राधा कधी नव्हे ते बोलून गेली.

काय? काय बोलतेस तू हे अग लोक मला राधा कृष्ण म्हणतात, माझ्या आधी तुझे नाव घेतात, ह्या प्रेमाची सारी दुनिया शपथ घेते आणि तुला ह्या प्रेमाचा कंटाळा आला, हे कसे होऊ शकते? कृष्ण तिला बोलते करत म्हणाला.

होय, कंटाळा आला मला, जरी माझे प्रेम असेल तुझ्यावर आणि साऱ्या दुनियेला माहीत असेल हे प्रेम तरीही नकोय मला तुझे हे प्रेम, मला माहित आहे की माझा नवरा तुझ्या सारखा राज ऐश्वर्य देणारा नाही, तुझ्या सारखे अद्भूत गुण नाहीत त्याच्यात पण मी बांधली गेली आहे त्याच्या दावणीला, आता मी ना तुझ्याशी लग्न करू शकते, ना ही त्याला सोडू शकते. मला त्याच्याशी संसार करावा लागेल आणि मी तो करणारच आहे, जगाची तुला नसली तरी मला पर्वा आहे, आपल्यात आधीच खूप फरक होता, तू नंदघरचा श्रीमंत, पुढे तर तू राजा



झालास, मी वयाने तुझ्यापेक्षा मोठी, तू तुझ्या सोळा सहस्त्र बायकात रममाण तुला रे कशी कळणार माझ्या सारख्या गरिबांची व्यथा, तू माझ्या जीवनातून निघून जा, होय निघून जा ती खूप खूप त्वेषाने बोलली.

निघून जाऊ? खरंच निघून जाऊ? त्यानं शांतपणे विचारले.

होय निघून जा तुझ्या प्रेमाने माझे विचार बदलतात, भावना बदलतात, मी माझा संसार सोडावा का असा विचार मनात येतो, मी माझ्या नवऱ्याला सोडून आता तुझ्याशी लग्न नाही करू शकत हे मी तुला पुन्हा सांगते, आणि मी माझ्या नवऱ्याला सोडले तर तू सोडशील का तुझ्या बायकोला? नाही ना? मग? ती आज मनातील पूर्ण भडास काढत होती.

अग पण राधे मी तुझ्याशिवाय कसा....? तो बोलताना अडखळला.

ते मला माहित नाही, तू बासरी वाजवतो आणि तुझी छबी माझ्या गोवऱ्यात उमटते, मग त्या कोणी जळणासाठी विकत घेत नाही, तू माझ्या घरातील लोणी आजही चोरतोस त्यामुळे मला उद्या उपाशी राहावे लागेल बहुदा... तू जा कृष्णा, निघून जा, मला नकोय तुझं प्रेम, तुझी बासरी आणि तुझं मोरपीस... राधा बोलत राहिली.

ठीक आहे,, एवढंच बोलून तो माघारी फिरला स्वतःची प्राणप्रिय बासरी त्याने हळूच नदीच्या पात्रात सोडून दिली, मुकुटातले मोरपीस बाहेर काढले तसा लांब कुठेतरी मोर रडल्याचा व्याकुळ आवाज आला. आपले उत्तरीय वस्त्र सावरत आपली पाठ झाकत कृष्ण तिच्याकडे वळला आणि म्हणाला, जीवनात लाभलेले वरदान कुणी शाप म्हणून स्वीकारला तर त्याला इलाज नसतो, पण ह्यापुढे माझ्या कडून तुला त्रास होणार नाही असे म्हणून तो निघाला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहताना तिला त्याच्या पाठीवर रक्ताळलेले तीन ओरखडे आणि व्रण दिसले.

'विचारावं का त्याला काय लागले ते?' असा विचार करून ती जागीच थिजली, कृष्ण जीवनातून निघून जाने म्हणजे काय? तर प्रेम, चैतन्य , जीवनाचा अर्थ निघून जाणे ही तिला जाणवू लागले. त्याला हाक द्यावी असे वाटुनही तिच्या तोंडातून शब्द बाहेर आले नाहीत. तो निघून गेला. तीही घरी परतली. तरी घरी सासू आणि नवरा तिची वाट पाहत होते. पाण्याने भरायचे सर्व रांजण आपोआप लोण्यान भरले होते. गावभर लोणी विकून खूप धन मिळाले होते. कंसाचा कुणी एक नातेवाईक मत्सरापोटी कृष्णाची छवी असलेल्या गोवऱ्या जाळायला म्हणून गोवऱ्याच्या वजना भारोभार सोन्याची नाणी देऊन घेऊन गेला होता. अचानक श्रीमंती आली होती आणि हे सर्व राधेच्या मेहनतीचे फळ असे तिची सासू सांगत होती. गोड धोड स्वयंपाक करून सासूनेच राधेला जेवू घातले. रात्री तेलाची वाटी घेऊन सासू तिच्या जवळ आली आणि म्हणाली,

जळो माझे हात किती जोराने काठी घातली न बाई मी तुझ्या पाठीत तीन चारदा, बघू वळ आले असतील त्याला तेल लावून देते. असे म्हणत तिने राधेच्या पाठीवर वळ शोधले तर तिला वळ दिसेनात, वळ कुठे गेले मी काठी तर जोरात मारली तीही तीन चारदा मग वळ कसे गायब झाले? ती राधेला खोदून विचारू लागली. आणि राधे पुढे पाठमोऱ्या कृष्णाच्या पाठीवरचे तीन रक्ताळलेले ओरखडे दिसू लागले, तिच्या डोळ्यात पाणी आले पण आता हे पाणी आणि जीवनातील पोकळी मरे पर्यंत अशीच राहणार ह्याची तिला जाणीव होती.

तिकडे कृष्णाच्या पाठीवर हळद आणि तेल लावणाऱ्या रुक्मिणीकडे पाहत सत्यभामेने विचारले, पण गाई बैलाच्या पाठीवर मारावी तशी काठी तुमच्या शरीरावर कोणी आणि कशी मारली असेल म्हणते मी?

नेहमी प्रमाणे हसून कृष्ण म्हणाला, राधा अंतरंगी जपल्यावर इतक्या वेदना तर सहन कराव्याच लागतील नाही का?



श्रद्धा आणि अंधश्रद्धा

माझा एक विद्यार्थी अभ्यासात कच्चा होता. त्याला काही गोष्टी लक्षात राहत नव्हत्या. मग मी त्याला अभ्यासाची एक वेगळी पद्धत सांगितली. एकाखाली एक, एका मागून एक असे लिहून निव्वळ पाठांतर न करता, वृक्षालेखाच्या स्वरूपात किंवा साम्य आणि विरोध उभ्या स्तंभाचे तक्ते तयार करून, त्यात लिहून ठेवले तर परीक्षेच्या काळात ते व्यवस्थित आठवायची शक्यता जास्त आहे! त्याने तो प्रयोग केला आणि सहामाहीत नापास झालेल्या या विद्यार्थ्याला वार्षिक परीक्षेत चक्क अठ्याहत्तर टक्के गुण मिळाले.

प्रा. प्रतिभा सराफ
९८९२५३२७९५

'डेस्टिनेशन वेडिंग'साठी आम्ही जयपूरला गेलो होतो. तिथे एका लग्न समारंभात आम्ही सर्व महाविद्यालयीन मित्र मैत्रिणी धमाल करत होतो. आमच्या महाविद्यालयाच्या एका मैत्रिणीच्या मुलीचं लग्न होते त्या निमित्ताने आम्ही आमचे महाविद्यालयीन जीवन आणि तरुणपण आठवत आठवत होतो. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी तिथे एक विधी होता जिथे नवरीला एक लाडू भरवला जात होता म्हणजे तिने फक्त तो उष्टवायचा. धमाल गाणी गोष्टी हास्यविनोदत्त कार्यक्रम चालू होता. उष्टावून झाल्यावर त्या ताटलीतील तिचा उष्टा लाडू काहीजण बांधून घरी घेऊन जात होते. मला त्या विधीची थोडी गंमत वाटत होती आणि मग तो विधी संपल्यावर आम्ही झोपाळ्यावर काही फोटो काढू या, ठरवत चालू लागलो. एकमेकांसोबत पुढे जात असताना आमची एक मैत्रीण थोडी मागे थबकली. माझ्या लक्षात आले. मी तिला विचारले की, का थांबली आहेस? तर ती म्हणाली की मला त्या लाडूचा थोडासा तुकडा हवा आहे. आम्ही एका महाविद्यालयात शिकलो म्हणून मित्रमैत्रिणी तसे त्यांच्या नातेवाईकांपेक्षा दूरचेच...

त्यामुळे त्या नवरीमुलीच्या आजूबाजूला त्यांचे जवळचे नातेवाईक गर्दी करून होते. मी तिला तो लाडू कशाला हवा?, असे विचारल्यावर ती म्हणाली नवरीने उष्टावलेला लाडू जर लग्न न ठरत नसलेल्या तरुण मुलीने खाल्ला तर त्या मुलीचे लवकर लग्न ठरते.

मी तिथल्या तिथे थबकले. माझ्या लक्षात आले की हिच्या दोन्ही मुलींनी वयाची तिशी ओलांडलेली आहे. अजूनही त्या दोघांची लग्न झालेली नाही. त्या दोघींनाही लग्नाची प्रचंड इच्छा आहे. लग्न जुळवण्याचे प्रयत्न चार-पाच वर्षांपासून चालू आहेत पण लग्न जुळतच नाही. मग मीच गर्दीतून वाट काढत गेले आणि त्या थाळीतला लाडूचा तुकडा आणून तिला दिला. तिने मनोभावे तो पेपर टिशूमध्ये गुंडाळून पर्समध्ये ठेवून दिला. या घटनेचा मला विसरही पडला. साधारण चार महिन्यानंतरची गोष्ट. मला अचानक फोन आला आणि माझी मैत्रीण मला म्हणाली



अगं माझ्याकडे गुड न्यूज आहे. मी तिला विचारताच म्हणाली, माझ्या मुलीचे लग्न ठरले आहे.

मला खूप आनंद झाला आणि खरंतर त्या क्षणी, मला त्या लाडूची आठवण झाली. गंमत म्हणजे साधारण आणखी चार महिन्याचा काळ गेला आणि दुसऱ्याही मुलीचे लग्न झाले. म्हणजे तिने तो लाडू आपल्या दोन्ही मुलींना खाऊ घातला होताआणि त्यानंतर आठ महिन्यात त्यांची लग्न झालीही!

खरंतर या घटनेकडे आपण कसे पाहू शकतो, असा मी विचार केला. आता जर हीच घटना या लेखात लिहून मी माझ्या या लेखाच्या वाचकांपर्यंत पोहोचवत आहे किंवा माझ्या मैत्रिणीने आणखी नातेवाईकांना, मित्र-मैत्रिणींना सांगितली असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. ही घटना वास्तवात घडली असल्यामुळे, प्रत्यक्षदर्शी म्हणून जो अनुभवतो तो आणखी लोकांपर्यंत पोहोचवतोच!

थोडा बारकाईने विचार केला तर या मुलींच्या चोवीस-पंचवीसाव्या वयापासून जी आई, मुलींच्या लग्नासाठी प्रयत्न करत होती ते लग्न जुळायला खरंच लाडू कारणीभूत झाला का की आणखी काही?

हे एक अगदी अलीकडेच घडलेले असल्यामुळे उदाहरण म्हणून मी दिले. अशाच तऱ्हेने जेव्हा आपल्या बाबतीत आपल्या जवळच्यांच्या बाबतीत एखादी घटना घडते तेव्हा ती घटना आपल्याला अंधश्रद्धा न वाटता श्रद्धा वाटू शकते! पूर्वापार चालत आलेल्या काही गोष्टी खऱ्याच असल्याचा भास किंवा वास्तव प्रत्यक्षात दिसतेही. मग याच गोष्टींचा प्रचार आणि प्रसार होत राहतो.

यासाठी आपण काय करू शकतो तर अशी वरील घटना मी तुमच्या निदर्शनास आणून दिली हे कदाचित माझे चुकत आहे. अश्या घटनेकडे मी संपूर्णतः दुर्लक्ष करायला हवे. कमीत कमी जेव्हा माझ्या लक्षात आले की ही घटना अंधश्रद्धेचा प्रचार करत आहे तेव्हा मी तिथेच थांबायला हवे आहे. म्हणजे त्याविषयी बोलणे किंवा लिहायला टाळायला हवे.

माझ्या सांगण्याचा ठळक उद्देश लक्षात घ्या. आपल्या

प्रत्येकाच्या बाबतीत असे काहीतरी घडत असते, जे आपल्याला मनापासून पटतही असते तर थोडासा संयम ठेवून कोणत्याही गोष्टीचा प्रचार करणे आपण थाबबले पाहिजे! हे सांगण्यासाठीचा हा लेखप्रपंच.

याउलट ज्या गोष्टी वास्तववादी आहेत आणि ज्याचा फायदा अनेकांना निश्चितपणे होणार आहे अशा गोष्टींचा मात्र प्रचार करण्याची आवश्यकता आहे.

त्याचेही इथे एकच छोटेसे उदाहरण देते.–

माझा एक विद्यार्थी अभ्यासात कच्चा होता. त्याला काही गोष्टी लक्षात राहत नव्हत्या. मग मी त्याला अभ्यासाची एक वेगळी पद्धत सांगितली. एकाखाली एक, एका मागून एक असे लिहून निव्वळ पाठांतर न करता, वृक्षालेखाच्या स्वरूपात किंवा साम्य आणि विरोध उभ्या स्तंभाचे तक्ते तयार करून, त्यात लिहून ठेवले तर परीक्षेच्या काळात ते व्यवस्थित आठवायची शक्यता जास्त आहे! त्याने तो प्रयोग केला आणि सहामाहीत नापास झालेल्या या विद्यार्थ्याला वार्षिक परीक्षेत चक्क अठ्याहत्तर टक्के गुण मिळाले. मग हा प्रयोग मी अनेक विद्यार्थ्यांना करायला सांगितला आणि त्याचा त्यांना खूप फायदा झाला, असे त्यांनी मला येऊन सांगितले! मी महाविद्यालयात 'भौतिकशास्त्र' हा विशष शिकवला आणि त्यात अशा प्रकारचे तक्ते उपयोगी होतात असे लक्षात आले. हे केवळ मी माझ्या 'भौतिकशास्त्र' या विषयाचे उदाहरण दिलेले आहेत. असेच काही वेगवेगळे प्रयोग करून जर आपण काही चांगल्या गोष्टी करत असू आणि त्याचा प्रचार आपण व्यवस्थित केला तर त्याचा अनेकांना फायदाही होऊ शकतो!

असो.

जाता जाता एकच सांगायचं आहे, जे अतिशय महत्त्वाचे आहे––

सुखदु:खाच्या काळात मानसिक आधार शोधण्यासाठी माणूस सहसा श्रद्धा किंवा अंधश्रद्धेकडे वळतो. परंतु, या दोन्हींमध्ये एक अतिशय सूक्ष्म, पण अत्यंत महत्त्वाची तरल अशी रेषा आहे. श्रद्धा ही विचारांवर आधारीत असते, तर अंधश्रद्धा ही अविवेकी असते!





संतांची दिवाळी

समग्र विश्वाला प्रकाशमान करणाऱ्या महात्म्यांचा शांतता, सर्वात्मभाव, सत्य, अहिंसा आणि करुणा यांचा मूलमंत्र पुन्हा एकदा आचरणात आणावा लागेल. विविध धर्मसंप्रदायांनी आणि त्यांच्या प्रेषितांनी मानवी कल्याणाची चिंता वाहिली आहे. 'अप्प दीपो भव' असे सांगून बुद्धांनी निर्वाणाच्या वेळी आपल्या अंतःकरणातील रत्नदीप प्रज्वलित करण्याचा प्रेमळ संदेश दिला. त्याशिवाय सत्याचा, ज्ञानाचा आणि प्रकाशाचा दीप कसा प्रदीप्त होणार? अंतरीचा दिवा विझलेला असेल, तर बाहेर लक्षावधी दीपमाळा लावून उपयोग काय? म्हणूनच खरी गरज आहे-विवेकनिष्ठ विचारांच्या तेजोमय दीपावलीची!

डॉ. अशोक लिंबेकर

९८२२१०४८७३

दीपावली हा भारतीय संस्कृतीतील सर्वांत मोठा सण! आनंद, उत्साह, चैतन्य, स्नेह आणि समाधानाचे प्रतीक म्हणजे दिवाळी. आपली संस्कृती पुराणकाळापासून तेजोनिधी अशा प्रकाशाचे पूजन करणारी संस्कृती आहे. प्रकाश म्हणजे सत्याचे आणि ज्ञानाचे प्रतीक! विश्वनिर्मितीचा आरंभ आणि चिरंतन सत्य म्हणजे प्रकाश. प्रकाशाच्या अस्तित्वाशिवाय चैतन्य नाही. अनंत अवकाशाचा संपूर्ण परीघ या प्रकाशरूपी तत्त्वाने व्यापलेला आहे. प्रकाशाच्या अनुपस्थितीत अवघी जीवसृष्टी मंदावते; नव्हे, थांबते. या कारणानेच विश्वातील सर्व प्राणी आणि माणूस सदैव प्रकाशाच्या शोधात असतात. मात्र, सर्व प्राणिमात्रांमध्ये माणसानेच या तत्त्वातून ज्ञानाचा शोध घेतला.

प्रकाशाच्या उगमाने सर्व प्रकारच्या अंधाराचा नायनाट होऊन सृष्टीतील दिनक्रम सुरू होतो. मग तो प्रकाश तेजोरूपी सूर्याचा असो किंवा त्या तत्त्वातील धाकट्या पणतीचा! 'जैसी दीपकळिका धाकुटी। परी बहु तेजाने प्रकटी।' तेजाचे प्रकटीकरण हा प्रकाशाचा स्थायीभावच असतो. समर्थ रामदास म्हणतात, 'याकारणे सूर्यापुढे । दुसरी साम्या न घडे । जयाच्या प्रकाशे उजडे। प्राणिमात्रांसी।' ज्याप्रमाणे सूर्य उगवला की अंधाराचे घनदाट जाळे विरून आकाश मोकळे होते, त्याचप्रमाणे

आपल्या जीवनातील आणि अंतर्मनातील प्रकाशाच्या आगमनानेही सर्व प्रकारच्या तिमिराचा लोप होतो.

आपल्या स्वरूपाचे ज्ञान झाले की मी-तूचे भेदही मावळतात आणि खऱ्या अर्थाने सत्याचे ज्ञान होते. अहंतेचा अंधकार दूर झाला की व्यक्ती 'सोऽहम्'मध्ये विसर्जित होते. मीपणाच्या अज्ञानरूपी अंधारातून बाहेर पडल्यावर माणसाचा समष्टीकडे प्रवास सुरू होतो. नव्हे, 'ही समष्टी म्हणजेच मी' अशी विश्वात्मक व्यापक जाणीव निर्माण होते. ही जाणीव संत ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव आणि तुकोबा यांच्या अंतःकरणात निर्माण झाली. अशी जाणीव कोणत्याही संवेदनाक्षम व्यक्तीला स्वस्थ बसू देत नाही. आजूबाजूचा व्यापक अंधार तिला अस्वस्थ करतो.

या अंधाराचे साम्राज्य किती व्यापक आहे! अज्ञान, दारिद्र्य, विषमता, जातीय अहंकार, वर्ण-वर्ग व्यवस्था, स्त्री-पुरुषभेद, व्यसनाधीनता, विकारवशता, शोषण, अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, मिथ्या अभिमान, दांभिकता, अंधश्रद्धा, कुपोषण, बेरोजगारी, चंगळवाद, आभासी जगाचे आकर्षण आणि बेगडी प्रेम-अशा वैचारिक, शारीरिक, सांस्कृतिक, आर्थिक व मानसिक अंधाराचा सामना आपल्याला दैनंदिन जीवनात करावा लागतो. समाजजीवनातील हा काळोख मिटल्याशिवाय ज्ञानाची, विवेकाची आणि समतेची दिवाळी साजरी होईल का? हा खरा प्रश्न आहे.

संत ज्ञानदेव म्हणतात, 'तिमिरावरुद्ध जैसे । दृष्टीचे तेज भ्रंशे । मग पासीच असता न दिसे । वस्तुजात ।' विकार, लालसा, स्वार्थ, जात-पात आणि धर्मभेदाच्या अहंकाराने ग्रासलेले, भ्रांत झालेले मानवी मन सदसद्विवेक हरवून बसते. अशा अविवेकी मनाला विवेकाचा लगाम घालण्याचे आणि पुन्हा विवेकरूपी प्रकाशाच्या मार्गावर आणण्याचे कार्य मराठी संतांनी तेराव्या शतकापासून केले आहे. 'नाचू कीर्तनाच्या रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।' असे म्हणत ज्ञानरूपी दिव्यांचा प्रकाश निर्माण करून दाही दिशांना प्रकाशमान करण्याचे तेजस्वी कार्य या महात्म्यांनी केले. 'अप्प दीपो भव' असा संदेश देणारे भगवान गौतम बुद्धही समाजमनातील भीषण अंधाराविषयीची संवेदना व्यक्त करून तो भेदण्याचा मार्ग दाखवतात. ज्ञानदेव म्हणतात,

'अविवेकाची काजळी। फेडूनी विवेकदीप उजळी।' लोकमानसातील जात-पात, श्रेष्ठ-कनिष्ठता आणि भेदभाव यांची अविवेकरूपी काजळी फेडून मानवतेचा विवेकदीप उजळल्याशिवाय खरी दिवाळी कशी साजरी होणार? ज्ञानदेवांच्या प्रतिभेने पाहिलेली विवेकाची ही दिवाळी आता तरी उगवण्याची नितांत गरज आहे.

ज्या दिवशी आपण दिवाळी साजरी करून आनंद लुटतो आणि विद्युत रोषणाईने परिसर चंदेरी झगमगाटात उजळून टाकतो, त्याच वेळी कित्येकांच्या घरात साधी पणतीही प्रकाशित झालेली नसते. त्यांचे काय? तुकोबांच्या भाषेत सांगायचे, तर समाजातील रंजलेले, गांजलेले आणि कष्टलेले लोक यांच्याप्रती आपल्या मनात संवेदनेची धाकटी ज्योत तरी पेटायला नको का? अशा वंचित लोकांच्या जीवनात ज्ञानाचा, सहानुभूतीचा आणि माणुसकीचा थोडा तरी प्रकाश पेरला जाईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने समतेची दिवाळी साजरी होईल.

अंधश्रद्धा, कर्मकांड आणि घोर अज्ञान यांच्या गुहेतून समाजातील सामान्य जनांना विवेकाच्या प्रकाशवाटेवर आणण्याचे काम मराठी संतांनी केले. 'ज्ञानराज माझी योग्यांची माऊली । जेणें निगमवल्ली प्रगट केली । गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगट केली । अध्यात्मविद्येचे दाविलेसे रूप । चैतन्याचा दीप उजळिला । नामा म्हणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ।' संत ज्ञानदेवांनी महाराष्ट्रातील कष्टकरी, श्रमिक आणि दीनदलित लोकांच्या जीवनात अध्यात्माची, विठ्ठलभक्तीची दिवाळी आणि भावभक्तीची मंजुळ पहाट उगवण्याचे कार्य केले. संतांच्या अक्षर-अभंगांतील चिरंतन सत्याने आणि शाश्वत मूल्यांच्या लावण्यदीपांनी अवघे मानवी जीवन उजळून गेले.

त्यामुळे विवेकनिष्ठ विचारांच्या अधिष्ठानावर तेवणारा संतसाहित्याचा नंदादीप हा मराठी संस्कृतीचाच नव्हे, तर भारतीय संस्कृतीतील अमूल्य ठेवा ठरतो. ज्ञानदेवांचे पसायदान असो, नामदेवांचे कीर्तन, एकनाथांचे भारूड किंवा तुकोबांचे अक्षर-अभंग-या संतांच्या विचारदीपांनी



अवघे विश्व प्रकाशमान झाले. या विचारांना स्थळ, काळ आणि प्रदेश यांच्या सीमारेषा कधीच आड आल्या नाहीत. त्या भेदून हा ज्ञानप्रकाश विश्वव्यापक बनला. विश्वाच्या कल्याणकारी विचारांना, ज्ञानाला आणि त्याच्या निर्मात्याला कोणतीही मर्यादा बाधत नाही. ज्ञान आणि ते देणारा ज्ञाता हा कोणत्याही एका धर्माचा किंवा राष्ट्राचा नसतो; तो वैश्विक सत्य मांडत असतो, म्हणूनच तो संपूर्ण विश्वाचा असतो.

प्रकाशामध्ये भेद असतो का? अंधाराचे हरण करणे हाच त्याचा मूळ गुणधर्म असतो. संत-महात्म्यांचे जीवनही असेच असते. संत तुकारामांनी याचे समर्पक उदाहरण दिले आहे. ते म्हणतात, 'दीप न देखे अंधार। आता हेचि करा जतन।' दिव्याचा हा गुणधर्म असल्यामुळे प्रकाशाचे पूजन का करायचे, या प्रश्नाचे उत्तर तुकोबांनी येथे दिले आहे. परंतु दिवे लावूनही समाजजीवनात विविध प्रकारचा अंधार कायम राहत असेल, तर हा सण केवळ प्रतीकात्मक ठरतो. त्यामुळे प्रकाशाचे प्रतीकात्मक पूजन करतानाच आपल्या आजूबाजूच्या सर्व प्रकारच्या अंधाराचा नायनाट करण्याचा संकल्प आपण केला, तरच आपल्या परंपरेतील या सणांना विकासाचे नवे परिमाण

लाभेल.

संतांची दिवाळी कशी होती? हा सण प्राचीन काळापासून साजरा केला जातो. त्यामागे काही पौराणिक संदर्भही आहेत. संतसाहित्यातही दिवाळसणाचे संदर्भ आढळतात. सण 'दिवाळीचा आला । नामा राऊळाशी गेला।' या अभंगातून संत जनाबाईंनी दिवाळसणाचे मनोहारी वर्णन केले आहे. विठ्ठलभक्ती, सामान्य माणसाची सेवा आणि त्याच्याप्रती जिव्हाळा यांना संतांनी विशेष प्राधान्य दिले. विठ्ठलभक्ती आणि त्या भक्तीत रमलेले साधुसंत, त्यांच्या भेटी व त्यांचे दर्शन–हीच त्यांची दसरा–दिवाळी होती. मानवतेच्या मूल्यांनी प्रेरित झालेल्या भक्तिमार्गावरील सर्व पाईकांना ते पांडुरंगासमान मानत.

तुकाराम म्हणतात, 'दसरा दिवाळी तोचि माझा सण । सखे हरिजन भेटतील । अमूप जोडल्या पुण्याचिया राशी । पार त्या सुखाशी नाही लेखा । धन्य दिवस आजी झाला सोनियाचा । पिकली ही वाचा रामनामे ।' संतसंगती आणि सज्जनांचा सहवास हीच आपल्यासाठी दिवाळी, असे तुकोबा सांगतात. 'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।' अशी त्यांची देव आणि भक्ती यांविषयीची धारणा होती. 'साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी–दसरा' हीच धारणा पुढे समाजमनातही रुजली; पण तोचि साधू ओळखावा हा तुकोबांचा भाव आपण समजू शकलो नाही. त्यामुळे बाह्य वेष धारण करणाऱ्यांनी समाजात भक्तीचे अवडंबर माजवले आणि वेगवेगळ्या मार्गांनी शोषणही केले.

अशा सर्व प्रकारच्या आणि सर्व क्षेत्रांतील बेगडीपणापासून सावध राहून, सदसद्विवेकबुद्धीच्या कसोटीवर वर्तमानाची नोंद घेऊ, तेव्हाच ज्ञानाची दिवाळी उजाडू शकेल. अन्यथा, शतकानुशतके चालत आलेला घोर अंधार संपलेला नाही; उलट तो अधिक तीव्र आणि व्यापक होत आहे की काय, अशी संवेदनशील व मानवतावादी विचार करणाऱ्यांना भीती वाटू लागली आहे. आजचा समाज ज्या सामाजिक आणि वैचारिक कोंडीतून जात आहे, ती फोडायची असेल तर सुसंस्कृत विवेकाची पेरणी करावी लागेल. मानवतेच्या दीपावलीसाठी भारतीय परंपरेतील दीपस्तंभांकडे पाहून त्यांच्या विचारांच्या प्रकाशात पुढील वाटचाल करावी लागेल.

समग्र विश्वाला प्रकाशमान करणाऱ्या महात्म्यांचा शांतता, सर्वात्मभाव, सत्य, अहिंसा आणि करुणा यांचा मूलमंत्र पुन्हा एकदा आचरणात आणावा लागेल. विविध धर्मसंप्रदायांनी आणि त्यांच्या प्रेषितांनी मानवी कल्याणाची चिंता वाहिली आहे. 'अप्प दीपो भव' असे सांगून बुद्धांनी निर्वाणाच्या वेळी आपल्या अंतःकरणातील रत्नदीप प्रज्वलित करण्याचा प्रेमळ संदेश दिला. त्याशिवाय सत्याचा, ज्ञानाचा आणि प्रकाशाचा दीप कसा प्रदीप्त होणार? अंतरीचा दिवा विझलेला असेल, तर बाहेर लक्षावधी दीपमाळा लावून उपयोग काय? म्हणूनच खरी गरज आहे–विवेकनिष्ठ विचारांच्या तेजोमय दीपावलीची!





'आणि ती...'

गृहिणी असणाऱ्या स्त्रीच्या अष्टभुजा स्वरूपाचे मार्मिक चित्रण करणारी 'चक्र' कविता, आयुष्याच्या प्रवासात एकामागोमाग एक घडणाऱ्या गोष्टी आणि त्यांच्याकडून शेवटी थकलेल्या मनाची उदासीनता व्यक्त करणारी 'एकामागाहून एक' ही कविता, पावसाच्या आगमनाने व दूरदेशीच्या आठवणींनी मनात दाटून आलेल्या कोमल भावना, धुसर स्वप्ने आणि गुंतलेल्या आठवणींचे सुंदर चित्रण 'गुंतवळ', स्वीकार-नकाराच्या सीमा ओलांडून शब्दांशिवाय फुलणारे अतुट नाते सांगणारी 'नात' ही कविता, शिवाय 'तिला हवं होतं अगदी तस्सं...' या कवितेमध्ये स्त्रीच्या स्वतःच्या मनःशांतीचा आणि आत्मपरीक्षणाचा अत्यंत सुंदर प्रवास रेखाटला आहे.

ओंकार दिलीप बागल

९३२१४०९८९०

उंबरठ्याच्या आत आणि बाहेरच्या दुनियेत स्वतःचा शोध घेणाऱ्या स्त्रीच्या मनाचा ठाव घेणे, हे नेहमीच अवघड असते. आरशातल्या स्वतःच्याच प्रतिमेकडे कित्येक सेकंद शून्य नजरेने बघत राहणं आणि मग 'ही मीच आहे का?' असा स्वतःलाच प्रश्न विचारणं... हा प्रवास असतो एका स्त्रीचा, जिला घराच्या प्रत्येक कोपऱ्यात तिचं अस्तित्व सापडतं, पण स्वतःचा पत्ता मात्र हरवलेला असतो. घराचं 'घरपण' टिकवून ठेवताना घराच्याच या चार भिंतींमध्ये स्वतःचा आवाज कुठेतरी मूक करून टाकणाऱ्या स्त्रीची गोष्ट, जिच्या डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंची भाषा फक्त स्वयंपाकघर आणि उंबरठाच समजू शकतो.

कुटुंबाच्या सुखासाठी स्वतःच्या आवडीनिवडींचे आणि महत्त्वाकांक्षांचे धागे एकेक करून कापून टाकणारी ती बाई, जेव्हा रात्रीच्या निवांत प्रहरी स्वतःच्याच स्वप्नांचे अवशेष शोधायला निघते, तेव्हा मनाचा कुठलासा कोपरा गहिवरून येतो. स्त्रीच्या अंतरंगाचा शोध घेणाऱ्या, तिच्या वेदना, संघर्ष आणि जगण्यातील वास्तवाला शब्दांत मांडणाऱ्या कवितांची परंपरा आपल्याकडे समृद्ध आहे. स्त्री मनाच्या ह्या आत्मशोधाला शब्दांचे रूप देणारा कवयित्री अर्चना कुडतरकर यांचा 'आणि ती' हा काव्यसंग्रह मराठी काव्यविश्वात एक अत्यंत संवेदनशील अनुभव देतो.

जगण्याचा भार सांभाळताना, दिवसभराच्या कामांच्या रहाटगाड्यात आणि जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली अडकलेल्या एका स्त्रीच्या प्रवासाचे वास्तववादी चित्रण या संग्रहात पाहायला मिळते. घरातल्यांची फारशी साथ नसताना, अशा परिस्थितीतही न डगमगता अखंडपणे चालत राहणाऱ्या स्त्रीच्या मनातील हुरहूर लेखिकेने ह्या कवितांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडली आहे. एक संसारी स्त्री आपल्या वाट्याला आलेले आयुष्य कशा प्रकारे जगत असते, तिच्या जगण्यामागचा संघर्ष आणि सोशिकतेमागची अस्वस्थता नेमकी काय असते, याचे अर्क म्हणजेच कवयित्री अर्चना कुडतरकर ह्यांच्या 'आणि ती' संग्रहातील कविता.

या काव्यसंग्रहातून स्त्रियांच्या जगण्याचे वास्तव अत्यंत प्रभावीपणे आणि थेट मनाला भिडणाऱ्या शब्दांत मांडले गेले आहे. 'आणि ती' हे शीर्षकच एका स्त्रीच्या उपेक्षित किंवा संघर्षमय अस्तित्वाकडे लक्ष वेधून घेणारे आणि उत्सुकता निर्माण करणारे आहे. '...की फिरून तिथेच आले असतील, स्वतःला समजून आत आत आत...' ह्या ओळी वाचून एखाद्या प्रवाशाची आपल्या मूळ स्वरूपाकडे किंवा आत्म्याकडे चाललेली अनाकलनीय वाट आठवते. तर आयुष्यात एकट्याने अतिमहत्त्वाकांक्षांच्या मागे धावून थकण्यापेक्षा, जमिनीवर पाय ठेवून संथपणे आणि आपापल्या माणसांच्या सोबतीने (थव्याने) केलेला प्रवासच खऱ्या अर्थाने सुखाचा होतो, असे सांगणारी 'थव्याथव्याने' ही कविता अतिशय अंतर्मुख करते.

गृहिणी असणाऱ्या स्त्रीच्या अष्टभुजा स्वरूपाचे मार्मिक चित्रण करणारी 'चक्र' कविता, आयुष्याच्या प्रवासात एकामागोमाग एक घडणाऱ्या गोष्टी आणि त्यांच्याकडून शेवटी थकलेल्या मनाची उदासीनता व्यक्त करणारी 'एकामागाहून एक' ही कविता, पावसाच्या आगमनाने व दूरदेशीच्या आठवणींनी मनात दाटून आलेल्या कोमल भावना, धुसर स्वप्ने आणि गुंतलेल्या आठवणींचे सुंदर चित्रण 'गुंतवळ', स्वीकार-नकाराच्या सीमा ओलांडून शब्दांशिवाय फुलणारे अतुट नाते सांगणारी 'नात' ही कविता, शिवाय 'तिला हवं होतं अगदी तस्सं...' या कवितेमध्ये स्त्रीच्या स्वतःच्या मनःशांतीचा आणि

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन

लेखक : पद्मश्री रमेश पतंगे

मूल्य : रु. 250/-
सवलत मूल्य : रु. 225/-

आपली प्रत आजच नोंदवा

विवेक पुस्तक प्रकाशन



- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधाननिर्मितीमागील सखोल चिंतन जाणून घेण्यासाठी
- दुभंगलेल्या समाजाला एकत्र आणण्यासाठी संवैधानिक कायद्याचा मार्ग कसा आखून दिला हे जाणण्यासाठी.
- कार्यकर्त्यांना अभ्यास करण्यासाठी आजच्या युवा पिढीने वाचलेच पाहिजे असे पुस्तक...



UPI पेमेंट गेटवे साठी QR कोड स्कॅन करा.
कृपया QR Code स्कॅन झाल्यानंतर मेसेज बॉक्समध्ये आपले नाव, ठिकाण व संपर्क क्रमांक नमूद करणे
संपर्क : 7506732905, 9594961858

प्रस्तावना
श्री. देवेंद्रजी फडणवीस
मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

आत्मपरीक्षणाचा अत्यंत सुंदर प्रवास रेखाटला आहे.

आणि खूप मोठी पोकळी... निर्वात की काय ती...काळीज फोडणारा.. आतला आवाज आणि कानठळ्या बसवणारे ..आतले हुंदके आणि शून्यात गुंतलेले अंतर्मन... ह्या ओळी, एकाकीपणामुळे मनामध्ये निर्माण झालेला अथांग रिकामपणा, वेदनेमुळे आतून सुन्न करून टाकणारे हुंदके आणि शून्यात हरवून गेलेल्या मनाची अस्वस्थ मनःस्थिती यांचे अत्यंत प्रभावी चित्रण ही कविता करते. 'क्लोन' या कवितेत एका स्त्रीने स्वयंपाकघरात आपल्यासारखेच काम करणारे दुसरे हात (क्लोन) पाहिल्यावर होणाऱ्या आनंदाचे आणि नंतर अचानक झालेल्या आत्मशोधाचे अत्यंत सुंदर चित्रण केले आहे. आधुनिक युगात स्वतःचे अस्तित्व टिकवताना स्त्रीला कराव्या लागणाऱ्या मानसिक व भावनिक संघर्षाचे अचूक चित्रण ह्या कवितांमधून वाचायला मिळते.



ह्या संग्रहातून विविध आशयाच्या कविता वाचायला मिळतात. जसे की, नाती आणि जिव्हाळ्याचे बंध व्यक्त करणाऱ्या 'ती', 'आणि..', 'नजर', ' पावली', स्त्रीच्या मनाचा आत्मशोध आणि अंतरंग व्यक्त करणाऱ्या 'अंतर्मुख', 'स्वत्व', 'उमाळे', तसेच मानवी मनातील अस्वस्थता, एकाकीपणा आणि निसर्ग–सांजवेळेच्या भावमुद्रा टिपणाऱ्या 'शून्यात गुंतलेले अंतर्मन', 'अशा सांजवेळी...', तर 'ओंजळ' व 'संथ' यांसारख्या कविता माणसाच्या अंतरंगातील सूक्ष्म वेदना, आनंद, धावपळ आणि जिव्हाळ्याचे अतिशय सुंदर दर्शन घडवतात. जीवनप्रवाह आणि गूढ अनुभव व्यक्त करणाऱ्या 'गूढ' आणि 'एकरूप' ह्या कविता खूप सुंदर आहेत.

बकुळाच्या फुलांच्या माध्यमातून मनातील कोमल भावना, प्रेम आणि आठवणींचे सुंदर व अतुट नाते या 'बकुळ' कवितेत व्यक्त झाले आहे. या संग्रहातील कवितांचा स्थायीभाव हा केवळ रडगाणे गाणे नसून, स्वतःला शोधताना वाट्याला येणाऱ्या वेदनेचा चिरदाह व्यक्त करणे हा आहे. कवयित्री अर्चना यांची कविता वाचताना जणू काही 'तळहातावर निखारा घेऊन चालण्याची' प्रचिती येते, जी वाचकांच्या मनाला खोलवर स्पर्श करते. केवळ दुःख मांडण्यापेक्षा त्यातून होणाऱ्या आत्मशोधाचे आणि चिंतनाचे दर्शन होते. प्रत्येक स्त्रीच्या जगण्यातील न सांगता आलेले कोलाहल शब्दांतून प्रभावीपणे मांडणारा दस्तावेज आहे.

क्लिष्ट किंवा अवघड शब्दांचा वापर टाळून, वाचकांच्या थेट मनाचा ठाव घेईल अशी सोपी, साधी आणि प्रवाही भाषाशैली वापरली आहे. वाचक वाचताना सुन्न होईल आणि अंतर्मुख होईल अशी प्रखर भावनिक मांडणी आहे. वाचकांशी थेट संवाद साधणारी आणि मनाचा ठाव घेणारी निर्भीड शब्दकळा त्यांच्या कवितांत जाणवते. संसारातील रखरखीत वास्तवाचा आणि स्त्रीच्या सोशिकतेचा अचूक वेद घेणारी शैली आहे. स्त्रीमन जवळून समजून घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक वाचकाने आवर्जून वाचावा असा महत्त्वाचा संग्रह आहे. कुटुंबासाठी आयुष्य वेचणाऱ्या स्त्रीच्या प्रत्येक मौन त्यागाला शब्दांतून दिलेली हक्काची दाद आहे.

वाचकांच्या मनावर कायमची छाप पाडणारी आणि विचार करायला प्रवृत्त करणारी ही कलाकृती आहे. ज्या वेदना कधीच शब्दांत व्यक्त होत नाहीत, त्यांना कवितेच्या माध्यमातून बाहेर काढून वाचकांसमोर उलगडणारे हे पुस्तक आहे. ह्या संग्रहातील कविता वाचकाला अंतर्मुख करून, स्त्रीच्या भावविश्वाशी जोडणारा एक अत्यंत संवेदनशील आणि जवळचा अनुभव देतात. त्यामुळे वास्तववादी मांडणी आणि साध्या, पण प्रभावी भाषेतील कविता आवडणाऱ्या वाचकांनी हा 'आणि ती' कवितासंग्रह नक्की वाचण्यासारखा आहे.



'माणूस घडविण्याचा प्रवास...'

काही पुस्तके माहिती देतात, काही विचार देतात; पण काही पुस्तके वाचताना त्यांच्या पानांआडून माणसे आपल्याशी बोलू लागतात. 'आठवण व्यक्तींची, साठवण प्रसंगांची' हे याच तिसऱ्या प्रकारातील पुस्तक आहे. यात केवळ संघकार्याची माहिती लिहीलेली नाही, तर संघकार्याची ही यात्रा ज्या सामान्य स्वयंसेवकांच्या जगण्यातुन, व्यवहारातुन, संघसंस्कारीत घरांमधुन प्रवाहीत होत राहीली आहे, अशा सर्वांच्या उदाहरणाद्वारे संघकार्याला अगदी सहजपणे उलगडले आहे, आणी म्हणुन वाचणा-याला ते भावतात अन् प्रत्येकाला ती गोष्ट आपली वाटते.

प्रा. रविंद्र यशवंतराव भुसारी
९५९४७५३४४४

आठवणींना एक विलक्षण स्वभाव असतो. त्या काळाच्या कप्प्यात नुसत्या पडून राहत नाहीत; योग्य क्षणी त्या अलगद जाग्या होतात आणि सोबत माणसे, प्रसंग, स्थळे, संवाद, संस्कार आणि त्या काळाचा गंधही घेऊन येतात. म्हणूनच आठवणींचे लेखन हे केवळ भूतकाळाचे स्मरण नसते, ते एका जगलेल्या काळाचे वर्तमानाशी साधलेले भावपूर्ण हितगूज असते.

'आठवण व्यक्तींची, साठवण प्रसंगांची' हे पुस्तक अशाच अनुभवसंपन्न जीवनप्रवासातून जन्माला आलेले स्मृतिसंचित आहे. जवळपास पाच दशकांच्या प्रचारकी वाटचालीत श्री. उदयजी उपाख्य तात्या जोगळेकर यांना असंख्य माणसे भेटली, अनेकविध परिस्थितींना सामोरे जावे लागले, समाजजीवनाची असंख्य रूपे जवळून अनुभवता आली. त्या प्रदीर्घ प्रवासातील निवडक व्यक्ती आणि प्रसंग येथे शब्दरूपाने भेटतात, परंतु या लेखनाचे वैशिष्ट्य एवढ्यावरच थांबत नाही. प्रत्येक आठवणीच्या अंतरंगात माणूस घडण्याची आणि माणसामधून कार्य उभे राहण्याची संघाने विकसीत केलेल्या कार्यपध्दतीचे वाचकांना दर्शन होते. हे अनुभव प्रत्यक्ष, अगदी जीवंत असल्याने ते हृदयात उतरतात.

संघ समजून घेण्यासाठी केवळ त्याची रचना, कार्यक्रम किंवा इतिहास जाणून घेणे पुरेसे नसते. त्याच्या कार्याच्या

केंद्रस्थानी असलेला 'माणूस' समजून घ्यावा लागतो. सामान्य माणसातील असामान्यत्व जागविणे, 'मी'च्या परिघाला विस्तार देत त्याला 'आपण' पर्यंत घेऊन जाणे, व्यक्तिगत सुखापेक्षा समाजहिताचा विचार करण्याची वृत्ती निर्माण करणे आणि कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता कार्यरत राहण्याची प्रेरणा देणे ही संस्कारप्रक्रिया पुस्तकातील आठवणींच्या पानोपानी सहजपणे उलगडत जाते.



विशेष म्हणजे येथे आठवणींना आत्मगौरवाचे स्वरूप आलेले नाही. आदरणीय तात्यांनी भेटलेल्या माणसांकडे, त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांकडे, छोट्या-छोट्या कृतींकडे आणि जीवनाला दिशा देणाऱ्या प्रसंगांना प्रेरणेच्या रूपात वाचकांच्या अंतरंगात उतरविले आहे. त्यामुळे हे पुस्तक एका संघ प्रचारकाच्या प्रवासाची नोंद न राहता अनेक ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांच्या समर्पणाचे सामूहिक स्मृतिचित्र बनले आहे.

काही पुस्तके माहिती देतात, काही विचार देतात; पण काही पुस्तके वाचताना त्यांच्या पानांआडून माणसे आपल्याशी बोलू लागतात. 'आठवण व्यक्तींची, साठवण प्रसंगांची' हे याच तिसऱ्या प्रकारातील पुस्तक आहे. यात केवळ संघकार्याची माहिती लिहीलेली नाही, तर संघकार्याची ही यात्रा ज्या सामान्य स्वयंसेवकांच्या जगण्यातुन, व्यवहारातुन, संघसंस्कारीत घरांमधुन प्रवाहीत होत राहीली आहे, अशा सर्वांच्या उदाहरणाद्वारे संघकार्याला अगदी सहजपणे उलगडले आहे, आणी म्हणुन वाचणा-याला ते भावतात अन् प्रत्येकाला ती गोष्ट आपली वाटते. पन्नास वर्षांच्या प्रचारक जीवनातील पन्नास अनुभव आणी त्यापूर्वीचे काही अनुभव असे ६१ अध्याय या पुस्तकात आहेत. प्रत्येक अध्याय दोन-तीन पानांमध्येच असल्याने वाचन करणे अगदी सहजसुलभ झालेले आहे. या पुस्तकात केवळ तत्त्वज्ञानाचा अभिनिवेश नाही तर जगण्यातून सिद्ध झालेल्या मूल्यांचा सुगंध आहे. उपदेशाचा आविर्भाव नाही; पण अनुभवातून नकळत होणारे संस्कार आहेत. श्री तात्यांच्या अनुभवांना श्री. सुधीरराव जोगळेकर यांनी आवश्यक तेथे संपादित करून अधिक उर्जादायी केलं आहे. त्यामुळे यातील सर्व गोष्टींना मायेचा ओलावा निर्माण झाला असल्याची जाणीव वाचतांना होते.

म्हणूनच हे पुस्तक केवळ आठवणींची साठवण नाही; ती एका प्रदीर्घ कार्यजीवनातून पुढच्या पिढीकडे सुपूर्द होणारी संस्कारांची शिदोरी आहे. कालच्या व्यक्ती आणि प्रसंगांना आजच्या वाचकाच्या मनाशी जोडणारा हा स्मृतिसेतू नव्या पिढीला सेवाभाव, समर्पण, आत्मीयता आणि राष्ट्रनिष्ठेच्या वाटेवर कार्य करण्यास अधिक प्रेरणा देईल, हे नक्की.

आदरणीय तात्यांना मन:पूर्वक प्रणाम, श्री. सुधीररावांच्या संपादनसाधनेला नमस्कार. मा. श्री. अतुलजींची प्रस्तावना लाभल्यामुळे या स्मृतिसंचिताचे अमृतकलशात रूपांतर झाले आहे. मुखपृष्ठ, अक्षरजुळणी, मुद्रक यांच्या कलाकुसरीने या पुस्तकाला अधिक भावपूर्ण केलं आहे. संघकार्याचे मूळ अधिक स्पष्टतेने समजण्यास या आठवणींची साठवण प्रेरक ठरेल, हे नक्की.

संघ कार्यालय, महाल, नागपूर.



आठवण व्यक्तींची, साठवण प्रसंगांची

आपला भाव जसा असतो तसा देव असतो, तसा देव दिसतो असे सांगणारी आपली संस्कृती आहे. असे मूल्य बिंबवणारे आपले संस्कार आहेत. आपले कार्यक्षेत्र आपले मंदिर माना असा आपला विश्वास आहे. निदान असावा असे आपण मानतो. त्याचे प्रत्यंतर म्हणजे हे पुस्तक आहे. देवासमोर आपण ज्या मोकळेपणाने आपल्या चुका कबूल करतो... मनातले सारे स्पष्ट बोलतो तशा स्वतःच्या भल्या-बुऱ्या भावनांचे हे प्रकटीकरण आहे.

चन्द्रशेखर टिळक

९८२०२९३३७६

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे १९७५ पासून पूर्णवेळ प्रचारक असणारे, संघाचे ज्येष्ठ प्रचारक माननीय श्री. उदय (तात्या) जोगळेकर यांच्या आठवण व्यक्तींची साठवण प्रसंगांची या पुस्तकाचे आज एका देखण्या समारंभात प्रकाशन झाले. प्रकाशित होणारे हे त्यांचे तिसरे पुस्तक.

परतीच्या प्रवासात हे १६० पानी पुस्तक मी पूर्णपणे वाचून काढले... अगदी शब्द न् शब्द!

एकतर उदय तात्या हे माझे संघाचे पहिले शिक्षक. मला वाचनाची आवड लावणाऱ्या सुरुवातीच्या मार्गदर्शकातले एक महत्त्वाचे नाव म्हणजे उदय तात्या जोगळेकर!

त्यांचे थोरले बंधू, ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर (जे या पुस्तकाचे प्रकाशक आहेत) यांनी मला लिहिते केले आणि त्याच्या कितीतरी आधी उदय तात्यांनी मला वाचते केले.

तसाही टिळक-जोगळेकर कुटुंबाचे स्नेहबंध गेल्या ६ दशकांचे आहेत.

पण हे पुस्तक सलग एका बैठकीत वाचण्याचे हे एकमेव कारण नव्हते आणि नाही. या पुस्तकाचा विषय, या पुस्तकाची मांडणी इतकी मोहक आहे की एकदा

पुस्तक हातात आले की कोणताही समंजस वाचक हे पुस्तक पूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेवूच शकणार नाही.



हे पुस्तक वाचून पूर्ण होताना एक सर्वसामान्य वाचक म्हणून सहज मनात आले की–

हे पुस्तक भाविक आहे.

हे पुस्तक भावूक आहे.

हे पुस्तक भावनिक आहे.

वारकरी मंडळी जशी एकमेकांना उराउरी भेटतात, एकमेकांच्या पाया पडतात, एकमेकांच्यामधे आपला विठ्ठल पाहतात... त्यात वयाचा संबंध नसतो तर वृत्ती–प्रवृत्तीचा भावबंध असतो. तसे संघ, संघकार्य, संघ स्वयंसेवक, संघ प्रचारक यांची मांडणी करणारे हे पुस्तक आहे.

हे पुस्तक भाव तोच देव हे सांगणारे आहे.

हे पुस्तक भाव तिथेच देव हे सांगणारे आहे.

हे पुस्तक भाव म्हणजेच देव हे सांगणारे आहे.

आपला भाव (स्वभाव या अर्थाने; दर या अर्थाने नव्हे) जसा असतो तसा देव असतो, तसा देव दिसतो असे सांगणारी आपली संस्कृती आहे. असे मूल्य बिंबवणारे आपले संस्कार आहेत. आपले कार्यक्षेत्र आपले मंदिर माना असा आपला विश्वास आहे. निदान असावा असे आपण मानतो. त्याचे प्रत्यंतर म्हणजे हे पुस्तक आहे.

देवासमोर आपण ज्या मोकळेपणाने आपल्या चुका कबूल करतो... मनातले सारे स्पष्ट बोलतो तशा स्वतःच्या भल्या–बुऱ्या भावनांचे हे प्रकटीकरण आहे.

हे पुस्तक सात्त्विक आहे.

हे पुस्तक तात्त्विक आहे.

हे पुस्तक तार्किक आहे.

भक्तीसुद्धा डोळस असावी लागते, हा आपला समाजविचार आहे. त्यासाठी आधी आपण स्वतः डोळस असावे लागते. त्याची प्रचिती म्हणजे हे पुस्तक आहे.

हे पुस्तक तर्कसंगत आहे; पण तर्ककर्कश नाही.

हे पुस्तक आग्रही आहे; पण आक्रस्ताळी नाही.

हे पुस्तक शब्दप्रधान आहे; पण शब्दबंबाळ नाही.

कारण ज्याने हे पुस्तक लिहिले आहे ती व्यक्ती स्वतः तशी आहे... पारदर्शी प्रामाणिक... स्वतःचे स्वयंसेवकत्व जपलेली... ते कधीही, कोणत्याही रूपात व प्रमाणात Encash न केलेली प्रेमळ व्यक्ती!!

हे पुस्तक वाचताना मला वारंवार वाटत राहिले...

व्यक्तीची असते ती आठवण...

प्रसंगांची असते ती साठवण...

असे आणि इतके खरंच सारे ढोबळ असते?

कारण...

प्रसंगातून व्यक्ती घडते

प्रसंगातून व्यक्ती कळते

त्यामुळे

व्यक्ती प्रसंग घडवतात

असे असेल तर व्यक्ती आणि प्रसंग यातले कारण कोण आणि परिणाम कोण?

आणि–

दरवेळी अशी cause - effect relationship शोधायची नसेल तर...

असे साऱ्या छटांचे, रंगांचे, तीव्रतेचे, संवेदनेचे क्षण हेरणारे आणि पेरणारेही क्षण टिपणारे असे हे पुस्तक आहे.

आठवणीना अनुक्रमणिका नसते.

त्यातून अनुभवांचा लंबक भूगोल, इतिहास ओलांडत पुस्तकभर फिरत राहतो. १६० पानांत ५१ वर्षे सावरायची तारेवरची कसरत करताना वाचकाचा विचार करत राहण्यातून त्याला पर्याय उरत नाही. संपूर्ण पुस्तकभर शब्दांना समर्पक चित्रांनी दिलेली साथ हा प्रवास जास्त बोलका करतो.

या चित्रात उदय तात्यांची विविध भावमुद्रा दाखवणारी अर्कचित्रे जास्त बोलकी आहेत... आपण लिहिता लिहिता मधेच थांबावे–थबकावे; स्वतःलाच काहीतरी शंका यावी, स्वतःशीच बोलत काहीतरी स्वतःशी स्पष्ट करावे, नक्की करावे अशी असणारी ही अर्कचित्रे या पुस्तकातील निवेदनाचा मूड अचूक पकडतात.

त्यातून उदय तात्या या पुस्तकातून लिहिण्यापेक्षा वाचकांशी थेट संवाद साधत आहेत असा माहोल या पुस्तकाच्या प्रत्येक पानावर निर्माण होतो.

कथा, कहाणी सांगायची असते हो...

तोच प्रकार या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा...

मुखपृष्ठावर पिंपळाची पाने आहेत...

सात पाने...

काही स्पष्ट; काही अस्पष्ट...

हिरवी, पिवळी, नारिंगी पिंपळपाने...

अनुभव ते अनुभूती असे संपूर्ण इंद्रधनुष्य दाखवणारे...

हे इंद्रधनुष्य पाहून मला हे पुस्तक उघडण्याच्या आधीपासून ते हे पुस्तक वाचल्यानंतर सुद्धा पु. भा. भावे यांचा 'पिंपळपान' हा लघुनिबंध आठवत होता... त्यातले ते शेवटचे वाक्य... 'भर उन्हात डौलाने पिंपळपान डोलत होते.'

त्यात ऊन हे व्यक्ती असते; आणि डोलणे हा प्रसंग...

आठवण व्यक्तींची साठवण प्रसंगांची...

हे ऊन साजरे करण्याची ऊर्जा कार्यातून मिळते.

कार्यासाठी माणसे उभी करावी लागतात.

माणसे उभी राहण्यासाठी उपक्रम लागतात.

उपक्रमात सातत्य असण्यासाठी संस्था लागतात.

संस्था असण्यासाठी संवेदनशीलता लागते.

संवेदनशीलता सक्रिय असण्यासाठी धैर्य लागते.

धैर्य पेलण्यासाठी बुद्धी आणि सामर्थ्य लागते

यासाठी सकारात्मकता लागते.

याचे संस्थात्मीकीकरण म्हणजे उदय तात्या यांच्यासारखे प्रचारक...

अशा सकारात्मकतेचं शब्दांकन म्हणजे हे पुस्तक...

हे पुस्तक शेवटी थोडे अस्वस्थ करते...

विशेषतः या पुस्तकाचे शेवटचे वाक्य...

या जुन्या कौशिक आश्रम वास्तूने आजपर्यंत जी सेवा दिली त्या प्रीत्यर्थ तिला नमस्कार...! तिला निरोप देताना मनात उमटलेले हे काहीं स्मृतितरंग.

कारण...

संघ प्रचारक म्हणून सुरुवात होणाऱ्या दिवसाचे वर्णन करताना उदय तात्या लिहितात... माझा नवीन जन्म झाला.

हे वाक्य या पुस्तकाचा उपोद्घात असेल तर तिला निरोप देताना... हे वाक्य या पुस्तकाचा उपसंहार आहे का?

आणि

हा उपसंहार असल्यास तो नेमके काय सांगतो...

हुरहूर? हळहळ?

नाही.

मी माझ्या अगदी अलीकडे प्रकाशित झालेल्या 'ग्रंथ स्पंदन' या पुस्तकातील एका लेखात म्हटले आहे तसे आहे हे...

इमारत फक्त एक वस्तू असते. तिला आठवणी लगडल्या की ती वास्तू होते.

स्वतःच्या, संस्थेच्या, संपर्क व्यक्तींच्या आठवणींनी लगडलेली अशी समृद्ध, संयत, संस्कारी वास्तू म्हणजे उदय तात्या जोगळेकर!

त्यांचे आज प्रकाशित झालेले पुस्तक...

आठवण व्यक्तींची साठवण प्रसंगांची...



‘वाट माझिया घराची’: आश्वासक कविता

‘वाट माझिया घराची’ या संग्रहात साठहून अधिक कविता असून त्या सहा विभागांत विभागलेल्या आहेत. विभागवार मांडणीमुळे वाचकाला कवितेतील प्रवासाची सुसूत्रता अनुभवायला मिळते. या कवितांतून कवयित्रीने घराच्या ओढीपासून ते निसर्गाच्या संवादापर्यंत, स्त्री-मनाच्या गुंतागुंतींपासून ते समाजाच्या वास्तवापर्यंत अनेक स्तरांना स्पर्श केला आहे. साधेपणातली गहनता, शब्दांवरील प्रभुत्व आणि भावविश्वाची समृद्धी ही या कवितांची खरी ताकद आहे.

प्रा. शिवाजी सरगर

९८६९०२८०५६

मराठी कवितेच्या समकालीन प्रवाहात स्त्री-अनुभव, निसर्गसंवेदना, घराची ओढ आणि आधुनिक जीवनातील भावनिक गुंतागुंत यांचे प्रभावी चित्रण करणाऱ्या कवयित्रींमध्ये शिवानी गोखले यांचे नाव विशेष उल्लेखाने घ्यावे लागेल. त्यांच्या ‘वाट माझिया घराची’ या काव्यसंग्रहात मानवी जीवनातील सूक्ष्म भाव-भावना अत्यंत साध्या, पण प्रभावी शब्दांत व्यक्त झालेल्या दिसतात. घर, नातेसंबंध, स्त्रीमन, निसर्ग आणि सामाजिक वास्तव यांचा त्यांनी केलेला वेध वाचकाला अंतर्मुख करतो. त्यांच्या कवितेत परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आढळतो. त्यामुळे हा संग्रह समकालीन मराठी कवितेतील एक आश्वासक आणि संवेदनशील अभिव्यक्ती म्हणून लक्ष वेधून घेतो.

मराठी कवितेची परंपरा ही वैविध्यपूर्ण आणि समृद्ध आहे. संतसाहित्य, प्रबोधन काळातील काव्य, आधुनिक चळवळी आणि उत्तर-आधुनिक प्रवाह यांमधून कवितेने सतत नवनव्या दिशा शोधलेल्या आहेत. या अफाट काव्य सागरामध्ये स्त्री-कवयित्रींनी आपले एक स्वतंत्र असे स्थान निर्माण करून साहित्याला एक नवे भावविश्व दिले आहे. स्त्रीचे दैनंदिन जीवन, तिचे संघर्ष, स्वप्ने,

नातेसंबंध आणि निसर्गाशी असलेले नाते या सर्वांना शब्दरूप देताना बहिणाबाई चौधरी, इंदिरा संत, शांता शेळके, प्रज्ञा दया पवार अशा अनेक कवयित्रींनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. याच प्रवाहात शिवानी गोखले यांचे नावही घेता येईल. अलीकडेच त्यांचा बहुचर्चित काव्यसंग्रह 'वाट माझिया घराची' वाचनात आला आणि त्याद्वारे गोखले यांचे एक नितांत सुंदर आणि वाचकांच्या मनाला भिडणारे, त्यांना विचारशील बनविणारे आणि त्यांच्या हृदयाला स्पर्शणारे असे व्यक्तित्व समोर आले.

'वाट माझिया घराची' या संग्रहात साठहून अधिक कविता असून त्या सहा विभागांत विभागलेल्या आहेत. विभागवार मांडणीमुळे वाचकाला कवितेतील प्रवासाची सुसूत्रता अनुभवायला मिळते. या कवितांतून कवयित्रीने घराच्या ओढीपासून ते निसर्गाच्या संवादापर्यंत, स्त्री-मनाच्या गुंतागुंतींपासून ते समाजाच्या वास्तवापर्यंत अनेक स्तरांना स्पर्श केला आहे. साधेपणातली गहनता, शब्दांवरील प्रभुत्व आणि भावविश्वाची समृद्धी ही या कवितांची खरी ताकद आहे.

घर : भावविश्वाचे केंद्र : संग्रहाच्या नावातच 'घर' हा भावप्रतिनिधी शब्द आला आहे. घर म्हणजे केवळ वास्तू नाही; ते आपुलकीचे, ममतेचे आणि स्मृतींचे केंद्रस्थान आहे. त्यांच्या कविता वाचत असताना घराशी संबंधित अशा अनेक प्रतिमा वाचकांच्या मनःचक्षुसमोर जिवंत होऊन आल्याशिवाय राहात नाहीत. या प्रतिमा वाचकाच्या स्मरणातल्या घराशी सहज जुळतात. असे जाणवते की, गोखले यांच्या कवितेत 'घर' हे आईच्या मायेचे रूप आहे, मुलांच्या खेळांचे अंगण आहे, अनेक पिढ्यांचे स्मरण आहे. आणि त्यामुळेच त्यांचा 'घराचा' विषय हा केवळ व्यक्तिगत न राहता सामूहिक भावनांचा प्रतिनिधी ठरतो. त्यांचे 'घर' आणि त्यांची 'कविता' यामध्ये एक अतूट नाते आहे, हे पदोपदी जाणवत राहते. कारण त्यांचे घरच त्यांची कविता असते आणि म्हणूनच एका ठिकाणी त्या लिहितात :

माझ्या शब्दातून पुन्हा
पुन्हा तिथे डोकावेन
जरी दिसत नसेल
तरी तिथेच असेन

घरी जाताना किमान
पहा माघारी वळून
वाट माझिया घराची
जाते कवितांवरून

स्त्री-मनाचे सूक्ष्म चित्रण : शिवानी गोखले यांची कविता स्त्रीच्या अनुभवांना अत्यंत जिव्हाळ्याने शब्दरूप देते. त्यांच्या कवितेतील स्त्री ही केवळ घराची जबाबदारी उचलणारी नसून ती कोणत्याही बाबीचा सर्वांगीण विचार करणारी, जाणणारी आणि स्वप्ने पाहणारी अशी एक संवेदनशील व्यक्ती आहे. काही कवितांत स्त्रीच्या ममतेची ऊब आहे, तर काही ठिकाणी अपूर्णतेची वेदना आहे. त्यांच्या कवितांतून स्त्री ही पत्नी, आई, मुलगी आणि स्वतंत्र व्यक्ती अशा वेगवेगळ्या भूमिकेतून वाचकाला भेटत राहते. आधुनिक स्त्रीला भेडसावणारे द्वंद्व जसे की कुटुंबाची जबाबदारी पेलताना स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याची स्त्रीची ओढ गोखले यांच्या कवितेत स्पष्ट दिसते. या जाणिवांमुळे त्यांचे काव्य समकालीन स्त्री-लेखनाशी सुसंगत ठरते. आधुनिक काळातल्या शिक्षित आणि मुंबईसारख्या महानगरात राहून विविध जबाबदाऱ्या लीलया पेलणाऱ्या स्त्रियांचे चित्रण करत असताना असेही जाणवते की, या प्रचंड धकाधकीच्या आणि गुंतागुंतीच्या जीवनात गोखले यांची स्त्री स्वतःचे स्त्रीपण हरवलेली नाही. अशा स्त्रियांच्या नाजूक भाव-भावनाही अगदी चपखलपणे शब्दांत गुंफण्याचा प्रयत्न अत्यंत यशस्वीपणे त्यांनी त्यांच्या 'देह फुलला अवेळी' या कवितेत केलेला आहे. त्या लिहितात :

देह फुलला अवेळी
सख्या पल्याड गेलेला
ठिणगीची तडतड
माझ्या राहिली जोडीला

ऊर भणाणून आलं
वारं सोसंना मोकाट
तुझ्या माझ्यातलं गुज

रानी मुकाट मुकाट



निसर्गाशी संवाद, तरीही गोखले यांचं वेगळंपण : निसर्ग हा गोखले यांच्या कवितेतील आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. पावसाच्या सरी, वाऱ्याच्या झुळका, झाडांची पानगळ, चांदण्यांचा उजेड, वारा, दऱ्या-खोरी आणि त्यातील थंडीच्या लाटा, चंद्र आणि त्याचे खुणेचे हसणे यांसारख्या अनेक निसर्ग प्रतिमा या केवळ अलंकारिक सजावटीसाठी नसून कवयित्रीच्या अंतर्मनाचे जिवंत प्रतिबिंब असल्याचे सहज जाणवून जाते. निसर्गाशी संवाद साधताना कवयित्री स्वतःच्या भावनांना नवे परिमाण देते. ज्याप्रमाणे काही व्यक्तींच्या मध्ये पाऊस कधी विरहाची वेदना जागवतो, तर कधी आनंदाचे गाणे गातो, त्याप्रमाणे गोखले यांच्या कवितेतील निसर्गही वाचकांच्या मनामध्ये विविध भाव-छटा निर्माण करतो. अशा निसर्गप्रतिमांमुळे त्यांच्या कवितेला गेयता आणि तात्त्विकता लाभते.

गोखले यांच्या कवितेत अवती-भवतीचे कान, डोळे, गंध व स्पर्शाने जाणवणारे भौतिक निसर्ग-रूप तर आहेच आहे, परंतु त्याही पेक्षा निसर्ग-भाव, निसर्ग-मन अन् निसर्ग-देह या रूपात भेटणारा निसर्ग हा त्या भौतिक रूपातील निसर्गापेक्षाही अधिक गडद, अधिक व्यापक आणि दीर्घ काळ वाचकांच्या मनात रुंजी घालताना दिसतो, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. जशा की एके ठिकाणी त्या लिहितात :

उभा काठ वेडावला
खडा कुणी गं मारिला!
शांत शांत तलावाला
कसा तरंग भोवला

कुणी फेकली गं माती
लाल सूर्याच्या डोळ्यांत!
का ग अंधारून आले
उजेडाच्या वावरात
बावडीच्या वावड्यांनी
तोल सुटला केळीचा
जडवून झुकताना
कानी आवेग हाळीचा

दिले मग उधळून
नाही घातला आवर
राघू टपलाच होता
तरारल्या पिकावर

या संपूर्ण कवितेत कवयित्रीने भौतिक निसर्गतील प्रतिमांचा जशा की काठ, तलाव, सूर्य, वावर, बावडी, केळी, राघू, इत्यादींचा अत्यंत चपखल वापर करून मन, शरीर आणि मस्तिष्क यांतील उचंबळून येणाऱ्या भाव-भावनांचा निचरा करण्याचा प्रयत्न केला आहे असे वाटत राहते.

आधुनिक जीवनातील ताणतणाव : आजच्या समाजातील वेगवान धावपळ, स्पर्धा आणि ताणतणाव यामुळे माणूस स्वतःपासूनच दुरावतो. गोखले यांच्या कवितेत ही वास्तवता स्पष्ट दिसते. नातेसंबंधातील दुरावा, आत्मिक पोकळी आणि स्वप्नांच्या मागे धावताना हरवलेली शांतता ह्या सर्व भाव-भावना वाचकांच्या हृदयाला केवळ सादच घालत नाहीत, तर त्यांना अंतर्मुखही करतात. आणि त्यामुळेच त्यांची कविता केवळ सौंदर्यदृष्टीवर थांबत नाही, तर जीवनाच्या कटू वास्तवालाही भिडते आणि नकळतच कवयित्री विचारते :

सगळी कोडी सुटली ऐसे होते कधी?
निरांजनाच्या आधी येते ज्योत कधी?

प्रश्नांमागून जंत्री येते प्रश्नांची,
तहान वाढत जाते कायम तृष्णांची,
आयुष्याचे वस्त्र बदलते पोत कधी!

शैली व शब्दांवरील प्रभुत्व : शिवानी गोखले यांच्या कवितेची शैली साधी, पण परिणामकारक आहे. त्या

शब्दांचा अवडंबर करत नाहीत, परंतु साध्या शब्दांतून गहन अर्थ व्यक्त करतात. त्यांच्या कवितेत लय आहे, गेयता आहे, आणि संक्षिप्ततेतूनही गूढ अर्थ उलगडतो. एखाद्या छोट्याशा कवितेतही त्या मोठा आशय गुंफतात. शब्दांची पुनरावृत्ती करून भावनांना तीव्रता देणे, विरामचिन्हांचा कुशल वापर करून कवितेला थांबा आणि ओघ देणे ही त्यांच्या शैलीची ताकद आहे.

भावविश्वाची समृद्धी : गोखले यांच्या कवितेचे भावविश्व बहुरंगी आहे. त्यात ममतेची ऊब आहे, अंतर्मुख चिंतन आहे, अपूर्णतेची वेदना आहे, आनंद–दुःखाचे मिश्रण आहे आणि समाजाविषयीची सजग संवेदनशीलताही आहे. या बहुरंगी भावविश्वामुळे कविता वाचकाला केवळ वाचनाचा आनंद देत नाही, तर त्याला अंतर्मुखही करते. वाचक आपल्या अनुभवाशी कवितांचा संबंध जोडतो आणि त्यामुळे त्या दीर्घकाळ स्मरणात राहतात.

परंपरा व आधुनिकतेचा संगम : शिवानी गोखले यांच्या कवितांत परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम दिसतो. त्यामुळेच त्यांच्या कविता वाचत असताना त्यामध्ये संतसाहित्याची साधी भाषा, बहिणाबाईंची आत्मीयता, कुसुमाग्रजांची भावस्पर्शी शैली आणि ग्रेस यांची प्रतिमा या सर्वांचे चपखल मिश्रण झालेलं दिसते. पण त्याच वेळी स्त्रीवादी दृष्टिकोन, आधुनिक जीवनातील संघर्ष आणि समकालीन वास्तव यामुळे त्यांचे काव्य पूर्णपणे आजच्या काळाशी जोडलेले राहते. त्यामुळे त्या परंपरेला नवे रूप देतात आणि आधुनिकतेला संवेदनशीलता प्राप्त करून देतात.



साहित्यिक मूल्य : 'वाट माझिया घराची' या संग्रहाचे साहित्यिक मूल्य महत्त्वाचे आहे. हा संग्रह वाचकाला भावनिक ऊब देतो, विचारांना चालना देतो, निसर्गाशी नवे नाते जोडतो आणि मानवी जीवनातील वास्तवाकडेही पाहायला लावतो. त्यामुळे हा संग्रह केवळ स्त्रीच्या अनुभवांचा आरसा नाही, तर मानवी जीवनाचा जिवंत दस्तऐवज ठरतो.

निष्कर्ष : शिवानी गोखले या समकालीन मराठी कवितेतील आश्वासक कवयित्री आहेत. 'वाट माझिया घराची' या संग्रहातून त्यांनी जीवनाच्या विविध पैलूंना शब्दबद्ध केले आहे. घर, निसर्ग, स्त्री–मन, आणि आधुनिक जीवन यांचे त्यांनी केलेले चित्रण हे साधेपणातल्या गहनतेचे उदाहरण आहे. त्यांच्या कवितांची ताकद म्हणजे शब्दांवरील प्रभुत्व, भावविश्वाची समृद्धी आणि सामाजिक जाणीव. त्यामुळे त्यांच्या कविता मराठी साहित्याला अधिक संपन्न करणार आहेत, यात शंका नाही. भविष्यातील मराठी कवितेच्या अभ्यासात शिवानी गोखले यांचे स्थान निश्चितच लक्षणीय राहील.



सॅल्युट!

'हे बघा बाबा... हे आज सकाळीच गावात आलंय. हे आल्यापास्नं माझी छाती फाटतीये... मला जाऊ द्या ओ बाबा!' म्हातारी ओक्साबोक्शी रडत होती. कदम यांनी रागाने तो कागद उघडला. तो एक 'टेलिग्राम' होता. त्यावर इंग्रजीत काहीतरी टाईप केले होते. कदम यांनी तो मेसेज वाचायला सुरुवात केली आणि पुढच्याच सेकंदाला त्यांच्या पायाखालची जमीन सरकली! दादर स्टेशनचा तो प्रचंड कोलाहल, गाड्यांचे भोंगे, माणसांची गर्दी... कदम यांच्यासाठी एका क्षणात सर्व काही शांत झाले.

स्मिता सुशांत कवडे
९८९२०९०४९४

मुंबईची लोकल म्हणजे कधीही न थांबणारं एक धडधडणारं शहर. दुपारची वेळ होती. कल्याणहून सुटलेली एक फास्ट लोकल दादरच्या दिशेने धावत होती. फर्स्ट क्लासच्या डब्यात नेहमीप्रमाणे गर्दी कमी होती आणि पंख्यांच्या वाऱ्यात प्रवासी शांतपणे डुलक्या घेत होते. याच डब्यात कदम ड्युटीवर होते. कदम म्हणजे रेल्वे खात्यातले एक अत्यंत कडक शिस्तीचे आणि निर्दयी टीसी (Ticket Checker). वय साधारण ४० वर्षे. विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशाला कदम यांनी आजवर कधीच सोडले नव्हते, मग तो कुणीही असो.

तिकीट चेक करत करत कदम डब्याच्या एका कोपऱ्यात आले आणि त्यांच्या कपाळावर आठ्या पडल्या. तिथे एका सीटच्या खाली, जमिनीवर एक ६५ वर्षांची म्हातारी आक्रसून बसली होती. तिच्या अंगावर एक अत्यंत जुने, विटलेले आणि दोन-तीन ठिकाणी फाटलेले गावरान लुगडे होते. पायात चप्पल नव्हती. तिचे केस विस्कटलेले होते आणि ती दोन्ही गुडघ्यांत डोके खुपसून मूकपणे रडत होती. तिचे खांदे हुंदक्यांनी वर-खाली होत होते. फर्स्ट क्लासच्या त्या पॉश डब्यात ही भिकारी वाटणारी म्हातारी कशी काय चढली, याचाच कदम यांना राग आला.

'ए आजी... तिकीट दाखव! हा फर्स्ट क्लासचा डबा

आहे, इथे खाली काय बसलीस?' कदम यांनी आपल्या नेहमीच्या कठोर आवाजात विचारले.

त्या म्हातारीने-रखुमाईने-घाबरून वर पाहिले. तिचे डोळे रडून रडून सुजले होते. चेहऱ्यावर सुरकुत्यांचे जाळे होते. तिने थरथरत्या हातांनी कदम यांना हात जोडले आणि ती रडक्या आवाजात म्हणाली, 'माझ्याकडं तिकीट न्हायी बाबा...'

'तिकीट नाही? मग फर्स्ट क्लासमध्ये कशाला चढलीस? चल, दोनशे साठ रुपये दंड काढ.' कदम यांनी पावती पुस्तक काढत फणकाऱ्याने सांगितले.

'माझ्याकडं एकबी रुपया न्हायी बाबा... मी गावातून अशीच घाईघाईत निघाले. मला जाऊ दे बाबा, माझी वाट बघतायत,' रखुमाई गयावया करत म्हणाली.

कदम यांचा पारा आता चढला. त्यांना वाटले ही नेहमीचीच नाटकं आहेत. 'पैसे नाहीत तर गाडीत चढायचं कशाला? रोजचं नाटक झालंय तुमचं. फुकट प्रवास करायची सवय लागलीये. चल, पुढच्या स्टेशनवर खाली उतर. तुला पोलिसांच्याच ताब्यात देतो आता,' कदम ओरडले. आजूबाजूचे प्रवासीही आता त्यांच्याकडे पाहू लागले होते.

तेवढ्यात लोकल दादर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर धडधडत उभी राहिली. कदम यांनी रखुमाईच्या हाताला धरले आणि तिला अक्षरशः ओढतच प्लॅटफॉर्मवर उतरवले. दादर स्टेशनवर प्रचंड गर्दी होती.

'साहेब, ए साहेब! मला पोलिसांत देऊ नगा ओ. माह्या पाया पडाया लावता का? मला लवकरात लवकर एअरपोर्टला पोचायचंय... माझा पोरगा येणार आहे आज. तो वाट बघंल माझी.' रखुमाई स्टेशनच्या फरशीवर कदम यांचे पाय धरून रडत होती.

'एअरपोर्ट? खिशात दाण्याला पैसे नाहीत आणि म्हातारी एअरपोर्टला चाललीये? आणि पोरगा येणार आहे तर त्याने तुला तिकीट काढून द्यायचं ना? काय भिकाऱ्यासारखी फिरतेस?' कदम यांनी अत्यंत बोचऱ्या शब्दांत तिचा अपमान केला आणि समोरून येणाऱ्या रेल्वे



पोलिसाला (RPF) हात दाखवून बोलावू लागले.

पोलिसाला येताना पाहून रखुमाई प्रचंड घाबरली. ती वेड्यासारखी स्वतःच्या कापडी पिशवीत काहीतरी शोधू लागली. तिने थरथरत्या हाताने पिशवीतून एक पिवळट रंगाचा, चुरगळलेला कागद बाहेर काढला आणि तो कदम यांच्या हातात कोंबला.

'हे बघा बाबा... हे आज सकाळीच गावात आलंय. हे आल्यापास्नं माझी छाती फाटतीये... मला जाऊ द्या ओ बाबा!' म्हातारी ओक्साबोक्शी रडत होती.

कदम यांनी रागाने तो कागद उघडला. तो एक 'टेलिग्राम' (तार) होता. त्यावर इंग्रजीत काहीतरी टाईप केले होते. कदम यांनी तो मेसेज वाचायला सुरुवात केली आणि पुढच्याच सेकंदाला त्यांच्या पायाखालची जमीन सरकली! दादर स्टेशनचा तो प्रचंड कोलाहल, गाड्यांचे भोंगे, माणसांची गर्दी... कदम यांच्यासाठी एका क्षणात सर्व काही शांत झाले.

त्या टेलिग्रामवर लिहिले होते:

"ARMY HEADQUARTERS, NEW DELHI. WE DEEPLY REGRET TO INFORM YOU THAT YOUR SON, NAIK TUKARAM, HAS BEEN MARTYRED IN ACTION AT THE LOC. HIS MORTAL REMAINS ARE BEING FLOWN TO MUMBAI AIRPORT. EXPECTED ARRIVAL: 16:00 HRS."

(आर्मी हेडक्वार्टर, नवी दिल्ली. आम्हाला अत्यंत दुःखाने कळवावे लागत आहे की, तुमचा मुलगा, नाईक तुकाराम, सीमेवर लढताना शहीद झाला आहे. त्याचे पार्थिव आज संध्याकाळी ४ वाजता मुंबई एअरपोर्टवर आणण्यात येत आहे.)

कदम थिजून गेले. त्यांच्या हातातला तो टेलिग्राम थरथरायला लागला. श्वास छातीतच अडकला. त्यांनी खाली बसलेल्या रखुमाईकडे पाहिले. जिच्या अंगावर धड कपडे नाहीत, जिच्या पायात चप्पल नाही... त्या गरिबीत खितपत पडलेल्या एका गावरान म्हातारीने आपला एकुलता एक तरुण पोरगा या देशासाठी कुर्बान केला होता! सकाळी गावात ही बातमी समजताच, लेकाचं शेवटचं तोंड पाहण्यासाठी या म्हातारीने सुधबुध हरपून घर सोडलं होतं. तिकीट काढायचं भानही तिला राहिलं नव्हतं आणि ज्या समाजाने तिला कायम दुय्यम वागणूक दिली, त्याच समाजासाठी तिच्या पोराने स्वतःच्या रक्ताचा सडा घातला होता.

कदम यांच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. जो माणूस आजवर कोणाच्याही रडण्याला भुलला नव्हता, तो आज एका म्हातारीसमोर ढसाढसा रडत होता. समोरून येणाऱ्या पोलिसाला कदम यांनी हातानेच 'थांब' असा इशारा केला.

ते स्वतः खाली वाकले आणि त्यांनी रखुमाईला अत्यंत आदराने उभे केले. स्वतःच्या रुमालाने त्यांनी म्हातारीचे अश्रू पुसले. कदम यांनी स्वतःचा खिसा तपासला, त्यांच्या पाकिटात जेवढे पैसे होते ते सगळे त्यांनी काढले. ते म्हातारीला स्टेशनच्या बाहेर घेऊन आले. त्यांनी एक टॅक्सी थांबवली. टॅक्सीवाल्याला एअरपोर्टचा पत्ता सांगितला आणि सगळे पैसे त्याच्या हातात टेकवले.

त्यानंतर कदम यांनी डबडबलेल्या डोळ्यांनी दोन पावले मागे घेतली. त्यांनी रखुमाईला कडक सॅल्युट ठोकला. त्यांचा आवाज जड झाला होता, गळा दाटून आला होता.

'माफी मागतो माई... मला माफ करा,' कदम हुंदका आवरत म्हणाले, 'तुमच्या मुलाने या देशाचं तिकीट आधीच काढलंय... आता या देशात तुम्हाला कुठल्याच तिकिटाची गरज नाही!'

टॅक्सी पुढे निघून गेली, आणि दादर स्टेशनच्या त्या गर्दीत कदम खूप वेळ त्या टॅक्सीकडे पाहत सॅल्युटच्याच स्थितीत उभे होते. एका शहीद जवानाच्या आईला त्यांनी दिलेली ती सर्वात मोठी मानवंदना होती.



पोतराज - कडक लक्ष्मी

ऐतिहासिक आणि लोकपरंपरेनुसार, पोतराज हा मरीआई (मरीमाता), अंबाबाई किंवा यल्लमा देवीचा परमभक्त आणि सेवक मानला जातो. जुन्या काळात जेव्हा ग्रामीण भागात कॉलरा, प्लेग, देवी यांसारख्या जीवघेण्या साथीच्या आजारांचे थैमान असायचे, तेव्हा वैद्यकीय सुविधांच्या अभावी लोक 'मरीआई' कोपली आहे असे मानत. या महामारीपासून गावचे रक्षण करण्यासाठी, देवीचा कोप शांत करण्यासाठी मातंग समाजातील एका व्यक्तीला देवीचा दूत किंवा सेवक म्हणून नियुक्त केले जाई, त्यालाच 'पोतराज' म्हटले गेले.

विजयकुमार कलवले

७९७७५८६४०५

महाराष्ट्राची लोकसंस्कृती ही अत्यंत समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि गतिमान आहे. या लोकसंस्कृतीला घडवण्यात, तिचे जतन करण्यात आणि ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात समाजातील वंचित व उपेक्षित घटकांचे योगदान मोलाचे राहिले आहे. यामध्ये 'मातंग समाज' (मांग समाज) हा कला, संगीत, शौर्य आणि लोकपरंपरांचा एक मुख्य पाईक आहे. क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्यासारखे राष्ट्रभक्त, परखड विचार मांडणारी पहिली मातंग समाजाची विद्यार्थिनी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यासारखे साहित्यरत्न या समाजाने देशाला दिले. याच मातंग समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचा, श्रद्धेचा आणि लोककलेचा एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजेच 'पोतराज' (कडकलक्ष्मी) परंपरा होय.

पोतराज ही केवळ एक धार्मिक प्रथा नसून तो मातंग समाजाच्या सांस्कृतिक संघर्षाचा, भक्तीचा आणि लोकजीवनाचा एक जिवंत इतिहास आहे. एकविसाव्या शतकाच्या गतिमान युगात, जिथे माणूस स्वतःभोवती केंद्रित होत चालला आहे, तिथे मानवाच्या कल्याणासाठी, गावगाड्याच्या सुखासाठी आणि लोककल्याणासाठी स्वतः आत्मक्लेश करणारी पोतराज ही एक आगळीवेगळी



परंपरा आहे. पोतराजांनी गावकी लक्षात घेऊन गावाची दुःखे आपल्या अंगावर घेतली आणि गावाच्या समृद्धीसाठी मरीआई, कोचेमाय, पोचेमाय, यल्लमा या मातृदेवतांना साकडे घातले. स्वतः दुःख सोसून दुसऱ्यांच्या आनंदासाठी गाऱ्हाणे मांडण्याचा हा एक अलौकिक आदिम प्रवास आहे.

ऐतिहासिक आणि लोकपरंपरेनुसार, पोतराज हा मरीआई (मरीमाता), अंबाबाई किंवा यल्लमा देवीचा परमभक्त आणि सेवक मानला जातो. जुन्या काळात जेव्हा ग्रामीण भागात कॉलरा, प्लेग, देवी यांसारख्या जीवघेण्या साथीच्या आजारांचे थैमान असायचे, तेव्हा वैद्यकीय सुविधांच्या अभावी लोक 'मरीआई' कोपली आहे असे मानत. या महामारीपासून गावचे रक्षण करण्यासाठी, देवीचा कोप शांत करण्यासाठी मातंग समाजातील एका व्यक्तीला देवीचा दूत किंवा सेवक म्हणून नियुक्त केले जाई, त्यालाच 'पोतराज' म्हटले गेले.

लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक पंडित डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी 'मरिआईचे गाडे' या पुस्तकामध्ये वंचित घटकांच्या दैवतांच्या आणि त्यांच्या उपासकांच्या मुळाशी असलेल्या आदिम संस्कृतीचा सखोल शोध घेतला आहे. डॉ. ढेरे यांच्या मते, मरीआई, यल्लम्मा, रेणुका या मुळच्या आदिम किंवा कृषी संस्कृतीशी जोडलेल्या मातृदेवता (Mother Goddesses) आहेत. पोतराज हा या मातृदेवतेचा अनन्यसाधारण सेवक आणि रक्षक आहे. पोतराज पुरुषाने स्त्रीवेष (परकर, मोकळे केस, कपाळाला कुंकू) का धारण करावा? यावर प्रकाश टाकताना डॉ. ढेरे स्पष्ट करतात की, आदिम काळात जेव्हा केवळ 'मातृसत्ताक पद्धती' अस्तित्वात होती, तेव्हा देवतेची पूजा करण्याचा अधिकार फक्त स्त्रियांनाच होता. पुरुषाला या पूजेत सहभागी व्हायचे असल्यास स्वतःचे पुरुषत्व विसरून 'स्त्री-भाव' स्वीकारावा लागत असे. पोतराज हे याच आदिम परंपरेचे आजही टिकून राहिलेले अवशेष आहेत. आजही मातंग समाजामध्ये कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना महत्त्वाचे स्थान आहे हे याचेच द्योतक आहे.

महाराष्ट्राची लोकसंस्कृती व लोकधाराचे अभ्यासक डॉ. स. अं. डांगे यांनी त्यांच्या 'पुराकथांचा अर्थ' या ग्रंथात दक्षिण भारतातील मरिअम्मा, यल्लम्मा आणि महाराष्ट्रातील रेणुका यांच्या उपासनेचा अभ्यास मांडला आहे. त्यांच्या मते, पोतराज हा केवळ भिक्षाटन करणारा किंवा लोककलाकार नाही, तर तो संकटसमयी (उदा. दुष्काळ किंवा महामारी, पटकी, कॉलरा) गावाचे रक्षण

करणारा आणि शांतता प्रस्थापित करणारा देवाचा दूत मानला गेला आहे. देवीच्या कोपापासून गावाला वाचवण्यासाठी अंगावर चाबकाचे (आसुडाचे) फटके मारून स्वतःच्या रक्ताने देवीला शांत करणे, हा यातील मूळ आदिम धार्मिक विधी (Ritual) होता.

पोतराजचे रूप अत्यंत लक्षवेधी आणि रौद्र असते. कपाळावर मोठे कुंकू आणि भंडारा, गळ्यात कवड्यांच्या माळा, हातात कडे, पायात घुंगरू आणि कमरेला विविध रंगांच्या कापडांच्या चिंध्या एकत्र करून बनवलेला फडका (घागरा) असा त्यांचा पेहराव असतो. हा जो त्याचा घागरा असतो, तो अनेक घरांमधून मागून आणलेल्या चिंध्यांपासून बनवलेला असतो. जणू प्रत्येक घरातले दुःख गोळा करून त्याने ते कमरेला बांधलेले असते आणि तो या दुःखाला सोसत लोककलेचा ताल धरत असतो. त्याचे वाढवलेले लांब केस हे त्याच्या वैराग्याचे आणि देवतेप्रती असलेल्या समर्पणाचे लक्षण मानले जाते.

पोतराज जेव्हा मंगळवारी किंवा शुक्रवारी गावात येतो, तेव्हा डफडे, हलगी व क्वचित ढोलके वाजवत गावात मरीआईचा फेरा आल्याची घोषणा करतो. अंगाला डावी-उजवीकडे डोल देत तो नाचतो, तेव्हा त्याची पत्नीही त्याच्यासोबत नृत्यात सहभागी होते. तो जेव्हा मरीआईसमोर उभा राहून आर्त सुरात गाऱ्हाणे मांडतो, तेव्हा लोकजीवनातील श्रद्धा भाव भावना शब्दबद्ध होतात ते खालीलप्रमाणे होतात.

आई मरिमाता,
एकाचे एकवीस,
पाचाचे पन्नास,
येल मांडवाला जाऊ दे,
ताक आमरुतानं डेरं घुमू दे,
कपाळाचं कुंकू, हाताचा चुडा, पायातलं जोडवं,
यसवंत राक लकसीमी...

पोतराज 'आलीया मरीबाई', 'बया! दार उघड' अशी आर्त लोकगीते गातो. ओवी छंदातील या गीतांतून प्रामुख्याने मरीआई, लक्ष्मीआई आणि कोल्हापूर इत्यादींचे महात्म्य गायलेले असते. संत साहित्यातही या लोककलेची पाळेमुळे रुजलेली दिसतात; संत एकनाथांचे 'बया! दार उघड' हे जगप्रसिद्ध भारूड मूळचे पोतराजाच्याच भूमिकेतून लिहिलेले आहे.

अतिशय प्रगल्भ लोकसंचित असलेल्या पोतराजांच्या सादरीकरणात दोन मुख्य गोष्टी असतात– 'हलगीचा कडकडाट' आणि 'आसुडाचे फटके.' जेव्हा पोतराजचा जोडीदार हलगी वाजवतो, तेव्हा त्या तालावर पोतराज गोल फिरून नृत्याविष्कार करू लागतो. नाचता नाचता तो आपल्या हातातील 'आसुड' (चाबूक) स्वतःच्याच पाठीवर आणि अंगावर जोरात मारून घेतो. वरवर मनोरंजनात्मक वाटणारा हा ऐतिहासिक आत्मक्लेश लोकांच्या कल्याणासाठी आणि भक्तीची पराकाष्ठा सिद्ध करण्यासाठी असतो. सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहिले तर पोतराज परंपरेने महाराष्ट्रातील संगीत आणि नृत्याला समृद्ध केले आहे. पोतराज जेव्हा मरीआईची गाणी किंवा लोकगीते गातो, तेव्हा त्यात एक विशिष्ट प्रकारचा सूर, लय आणि आर्तता असते. मौखिक परंपरेच्या माध्यमातून या समाजाने अनेक पिढ्यांपासून ही लोककला, गाणी आणि इतिहास जिवंत ठेवला आहे. पोतराजच्या नृत्यातील ऊर्जा आणि हलगीचा नाद हा महाराष्ट्राच्या मातीशी जोडलेला आहे.

प्रसिद्ध लोकसंस्कृतीचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांनी त्यांच्या 'लोकरंगभूमी' या पुस्तकात पोतराजाच्या सादरीकरणातील कलात्मक बाजू आणि लोकजागर यावर प्रकाश टाकला आहे. डॉ. देखणे यांच्या मते, पोतराज जेव्हा पायात घुंगरू बांधून, हातात आसुड घेऊन कडक लक्ष्मीच्या मूर्तीसमोर किंवा चौकात नाचतो, तेव्हा तिथे 'लोकरंगभूमीचा' (Folk Theatre) जन्म होतो. त्याच्या तोंडून निघणारी गाणी (मरीआईची गाणी) ही मौखिक साहित्याचा उत्तम नमुना आहेत. प्रत्यक्ष लोकव्यवहारात पोतराजालाच बऱ्याचदा कडक लक्ष्मी म्हटले जाते. पण कडक लक्ष्मी हे देवतेचे नाव असून, पोतराज हा तिचा 'वाहन' किंवा 'उपासक' आहे. कडक (म्हणजे उग्र/रागीट) रूप धारण करून संकटांचे निवारण करणारी ती 'कडकलक्ष्मी' असे तिच्या रूपाचे वर्णन डॉ. देखणे यांच्या पुस्तकात आढळते.

बदलत्या काळासोबत, शिक्षणाच्या प्रचारामुळे आणि

विज्ञानाच्या प्रसारामुळे आज साथीच्या आजारांवर आधुनिक वैद्यकीय उपचार उपलब्ध आहेत. त्यामुळे जुनी धार्मिक भीती आता कमी झाली असून पोतराज या प्रथेकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोनही बदलला आहे. स्वतःच्या शरीराला जखमा करून घेणे किंवा अंधश्रद्धेपोटी भिक्षेवर जगणे या गोष्टी मागे टाकत, नव्या पिढीतील मातंग समाजाने शिक्षणाची आणि तंत्रज्ञानाची कास धरली आहे. सामाजिक सुधारणा आणि प्रबोधनामुळे आता या प्रथेचे स्वरूप बदलत असून, अनेक पोतराज व त्यांची मुले मुख्य प्रवाहात येत आहेत. पारंपरिक 'अंधश्रद्धा' गळून पडत असून, तिचे रूपांतर आता 'लोककलेच्या संवर्धनात' होत आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'ने (अंनिस) पोतराज प्रथेला प्रखर विरोध केला होता. अंनिसची भूमिका ही पोतराजांच्या विरोधात नसून, त्यांच्या शोषणाच्या विरोधात होती. अमानुष प्रथा आणि मानवाधिकारांचे उल्लंघन: स्वतःला चाबकाने मारून घेणे आणि देहदंड देणे हे मानवाधिकारांच्या विरुद्ध आहे. देवीच्या नावाने स्वतः ला इजा करून घेणे ही भक्ती नसून अंधश्रद्धा आहे आणि यातून समाजाचे मागासलेपणा अधोरेखित होते, अशी ठाम भूमिका अंनिसने घेतली होती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आकाशवाणीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले होते, आपला आपण करावा विचार तरावया पार भवसिंधु. या विचारांना स्मरून, समाजाने आता केवळ भाबड्या अशांवर अवलंबून न राहता स्वावलंबन आणि सक्षमीकरणाचा मार्ग निवडला आहे.

मातंग समाजाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक–सामाजिक विकासासाठी मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या सक्षम आणि दूरगामी नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासन विविध योजनांच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वपूर्ण पावले उचलत आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे मातंग समाजाच्या आणि पोतराज कुटुंबांच्या आर्थिक उन्नतीसाठी कटिबद्ध आहे. पारंपरिक व्यवसायातून बाहेर पडून तरुणांना व महिलांना स्वयंरोजगारासाठी (लघुउद्योग, दुकाने, वाहन खरेदी इत्यादी) थेट कर्ज, बीजभांडवल आणि अनुदान योजनांचा लाभ दिला जातो, ज्यामुळे कुटुंबांना आर्थिक स्थैर्य लाभत आहे.

यासोबतच, शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत वृद्ध आणि गरजू लोककलावंतांना आर्थिक बळ देण्यासाठी मासिक मानधन दिले जाते. राज्यभरात आयोजित केल्या जाणाऱ्या 'लोकरंग' आणि विविध 'लोककला महोत्सवां'च्या माध्यमातून या कलाकारांना हक्काचे व्यासपीठ आणि मानधन मिळवून देऊन त्यांच्या कलेचा गौरव केला जातो. पोतराज व मातंग समाजातील नव्या पिढीने उच्च शिक्षण घेऊन प्रगती करावी, यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध शिष्यवृत्ती, शासकीय वसतिगृहे आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' राबविली जाते. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि शैक्षणिक साहित्यासाठी थेट आर्थिक मदत दिली जाते, ज्यामुळे शिक्षणाची गती वाढली आहे.

परिवर्तनाच्या प्रवासात जुनी अंधश्रद्धा मागे पडत असली, तरी पोतराजांच्या तोंडी असलेली पारंपरिक गाणी आणि गाऱ्हाणे हा मौखिक साहित्याचा ठेवा जतन करणे गरजेचे आहे. तसेच, बदलत्या काळात या परंपरेतील वृद्ध कलावंतांना सन्मानाने जगण्यासाठी हक्काचे अर्थसाहाय्य मिळवून देणे आणि नव्या पिढीला सक्तीच्या शिक्षणासोबतच सन्मानाचा रोजगार देणे हेच खऱ्या अर्थाने या सामाजिक परिवर्तनाचे फलित असेल.

याचाच भाग म्हणून सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून मातंग समाजाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अलीकडेच अत्यंत ऐतिहासिक आणि दूरगामी पावले उचलली आहेत. मातंग समाजाचा सर्वांगीण अभ्यास, संशोधन आणि तरुणांच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीला गती देण्यासाठी शासनाने 'साहित्यारत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था' (ARTTI) स्थापन केली असून, या संस्थेच्या सक्षमीकरणासाठी भरीव निधीची तरतूद केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून समाजातील संशोधक,

विद्यार्थी आणि युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण व उच्च शिक्षणासाठी फेलोशिप उपलब्ध करून दिली जात आहे. यासोबतच, सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयाला अनुसरून, मातंग समाजाचे अनेक वर्षांचे मागसलेपण दूर करण्यासाठी आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात राज्यघटनेने दिलेली समान संधी मिळवून देण्यासाठी अनुसूचित जातींमध्ये (SC) वर्गीकरण (Sub-categorization) करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने अत्यंत सकारात्मक पावले उचलली आहेत. मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सकस नेतृत्वाखाली शासनाचे हे क्रांतिकारी निर्णय मातंग समाजाला सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी मैलाचा दगड ठरत आहेत.

मातंग समाजाचा सांस्कृतिक इतिहास हा त्याग, कला आणि संघर्षाचा इतिहास आहे. प्रसिद्ध अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांच्या मते, 'पोतराज ही केवळ एक व्यक्ती नसून ती ग्रामीण लोकसंस्कृतीमधील एक महत्त्वाची सांस्कृतिक संस्था आहे.' आजच्या आधुनिक आणि विज्ञाननिष्ठ युगात स्वतःला इजा करून घेण्याच्या किंवा भिक्षेच्या जुन्या प्रथा जरी मागे पडत असल्या, तरी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा एक अविभाज्य भाग म्हणून पोतराज परंपरेचे कलात्मक मूल्य नेहमीच स्मरणात राहील. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेत आणि शिक्षणाचे बळ पाठीशी ठेवत हा समाज आता आत्मसन्मानाने प्रगतीची नवी शिखरे सर करत आहे, आणि मातंग समाजाच्या उत्थानासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. हेच या लोकसंस्कृतीच्या परिवर्तनाचे सुखद चित्र आहे.

(लेखक शासनाच्या वित्त विभागाचे वरिष्ठ अधिकारी असून इतिहासाचे अभ्यासक आहेत. दलित महिलांच्या प्रश्नावर त्यांचे संशोधन सुरू असून मुंबई विद्यापीठातील अण्णाभाऊ साठे अध्यासनाचे ते सदस्य आहेत.)

सहाय्यक संचालक,
होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संघ शताब्दीनिमित्ताने

समिधा

१०१ प्रचारकांच्या जीवनगाथा
प्रचारक म्हणून जगताना भारतमातेच्या चरणी
स्व अर्पण करणाऱ्या असामान्य माणसांच्या गोष्टी.

किंमत ५००/- रु.
सवलत मूल्य
४००/-



नोंदणीसाठी संपर्क :
- दयानंद शिवशिवकर : ९५९४९६१८४८
- प्रदीप निकम : ९५९४९६१८५२ ● धनाजी जाधव : ९५९४०९३८३४
- राजेश गावडे : ७०४५७८१६८७ ● संजय शिवगण : ९५९४९५१८४५
- कार्यालय : ७७३८८४३५३२/ ९५९४९६२३०२



बंदिशाळा

'मोठं काम कोणतं आणि छोटं काम कोणतं, हे कसं ठरवणार? देशासाठी उपयोगी असेल, तर हातगाडी ढकलणंही तितकंच मोठं काम आहे. स्वातंत्र्य फक्त रणांगणावर मिळत नाही. देशात नोकरी-धंदे नसतील तर स्वातंत्र्य मिळवून तरी काय करणार आहोत आपण? लक्षात ठेव, आपण काय विकत घेतो, कुणाच्या हाताला काम देतो आणि कुणाला बळ देतो, यावरही देशाचं भविष्य ठरतं.'

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

९९६७७९६२५४

सावरकरांसोबत सहभोजनादी उपक्रमात सहभाग घेतल्याने अनेकांना यातना सोसाव्या लागल्या होत्या. सहभोजनाच्या कार्यक्रमातून एखादा तरुण आला की त्याचे घरचे लोक त्याला आंघोळ घालत आणि शुद्ध करून घेत. आंघोळ केल्याशिवाय घरात घेत नसत. सततचे टोमणे तर सुरूच राही. सावरकरांच्या सुधारणावादी चळवळीतील कुणी माणूस आजारी पडला तर देवाचा कोप झाला म्हणून लोक हिणवत. मात्र अनेक सुधारणावादी मंडळी सावरकरांच्या कार्याने आश्चर्यचकित होत होती. ज्यांना कोकणचे गांधी म्हटलं जायचं, ते गांधीवादी अप्पासाहेब पटवर्धन 'सत्यशोधक'च्या (३० मे १९२५) अंकात लिहितात, 'काही वर्षांपूर्वी रत्नागिरीत अस्पृश्यता निर्मूलन हा विषय केवळ बुद्धिवाद्यांचा चर्चेपुरता आणि त्याविरुद्ध लेख लिहिण्याइतकाच मर्यादित होता, पण रत्नागिरीत येताच सावरकरांनी शिवाजी जयंतीच्या प्रसंगी याविरुद्ध प्रकटपणे बोलायचे धाडस तर केलेच; पण आपल्या बोलण्याप्रमाणे ते वागलेदेखील. त्यांनी मला या अस्पृश्यता निर्मूलन कार्यात झोकून देण्यास सांगितले. ही कल्पना संघटितरीत्या प्रत्यक्षात उतरविण्याचे श्रेय केवळ सावरकरांचे आहे.

सावरकर हर प्रकारे समाज एकसंध ठेवण्याचा प्रयत्न करत होते. त्याचबरोबर त्यांनी स्वदेशी चळवळीला केवळ



पाठिंबाच दिला नाही, तर नेहमीप्रमाणे कृतीही करत होते. त्या दिवशी सकाळपासूनच रस्त्यावर नेहमीपेक्षा अधिक वर्दळ होती. उन्ह अजून फार चढले नव्हते; रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या घरांच्या ओट्यांवर स्त्रिया कामे उरकत बसल्या होत्या. काही पुरुष वर्तमानपत्रातील बातम्यांवर चर्चा करत होते. मुलांचा एक घोळका धुळीत खेळत होता. तेवढ्यात रस्त्याच्या वळणावरून एक हातगाडी हळूहळू पुढे येताना दिसली. गाडीच्या चाकांचा आवाज होत होता. गाडीवर नीट घडी केलेली स्वदेशी कापडाची पोती, देशी साबणांच्या वड्या, साखरेच्या पुड्या– आणि घरगुती वापराच्या काही वस्तू मांडलेल्या होत्या. हातगाडी ढकलणारा माणूस साध्या वेशात होता. त्याची चाल मात्र विलक्षण होती. सुरुवातीला कुणाचेही त्याच्याकडे विशेष लक्ष गेले नाही. पण गाडी जवळ येताच एका वृद्धाला ओळखीचा चेहरा दिसला. त्याने डोळे बारीक करून पुन्हा पाहिले. अरेरे, असा शब्द त्याच्या तोंडून आपोआप बाहेर पडला. त्याची हजामत करणाऱ्या न्हाव्याने त्या दिशेने पाहिले आणि भूत पाहिल्याप्रमाणे त्याचे डोळे विस्फारले.

'ते ते तात्याराव आहेत का?' न्हाव्याने विचारले.

'होय, तात्यारावच आहेत.'

'पण हातगाडी...?'

ओट्यांवर बसलेले लोकही अवाक् होऊन पाहू लागले. घरांच्या दारातून डोकी बाहेर आली. रस्त्याने जाणारे काही जण मध्येच थांबले. कोणी भुवया उंचावून पाहत होते, कोणी हाताने तोंड झाकून कुजबुजत होते.

'हे खरंच सावरकर आहेत का?'

'होय रे, तात्यारावच आहेत.'

'पण ते अशी हातगाडी का ढकलतायत?'

'अंदमानच्या तुरुंगात म्हणे भल्याभल्यांना वेड लागतं..'

कुजबुज हळूहळू वाढत गेली. काहींच्या चेहऱ्यावर आश्चर्य होते, तर काहींच्या नजरेत उपहास. सावरकरांच्या कानावर ते शब्द स्पष्टपणे पडत होते. त्यांना हेही जाणवत होते की अनेकांच्या मनात प्रश्न होते. 'हा तोच माणूस का, ज्याच्या नावाने इंग्रज सरकार हादरले होते? हा तोच क्रांतिकारक का, ज्याने काळ्या पाण्याच्या यातना सहन केल्या? आणि आज तो रस्त्यावर हातगाडी का फिरवत आहे?' गाडीवरील वस्तूंकडे पाहून एका तरुणाने हसत मित्राला विचारले, तात्याराव आता व्यापारी झाले वाटतं!

सावरकरांनी तेही ऐकले. त्यांच्या चेहऱ्यावर मात्र मंद स्मित उमटले. ते थांबले. त्यांनी हातगाडी रस्त्याच्या कडेला उभी केली.

क्षणात कुजबुज थांबली.

'या! स्वदेशी वस्तू घ्या! आपल्या देशातील कारागिरांनी बनवलेल्या वस्तू वापरा! परकीय मालावर खर्च केलेला प्रत्येक पैसा आपल्या देशाच्या श्रमाला दुर्बल करतो. आणि स्वदेशी वस्तू घेतलेला प्रत्येक पैसा आपल्या माणसांच्या हाताला बळ देतो!'

पुन्हा लोकांची कुजबुज सुरू झाली. काही जणांनी एकमेकांकडे पाहिलं. आत्तापर्यंत तमाशा पाहणारे डोळे आता गाडीवरील वस्तूंकडे वळले.

सावरकरांनी एका कापडाची घडी उचलली. ते कापड साधे होते, पण मजबूत आणि स्वच्छ होते. त्यांनी ते दोन्ही हातांनी ताणून दाखवले.

‘हे कापड आपल्या देशातील विणकराने विणले आहे. त्याच्या घरात चूल पेटावी, त्याच्या मुलांच्या अंगावर कपडे यावेत, यासाठी आपण हे घ्यायचे. परदेशी कारखान्यांत तयार झालेले कापड स्वस्त वाटेल; पण त्याची किंमत आपल्या देशातील शेतकऱ्याला आणि कारागिराला सोसावी लागते.’

गर्दीत उभ्या असलेल्या एका स्त्रीने संकोचाने पुढे पाऊल टाकले.

‘कितीला दिलंत?’ तिने विचारले.

‘किंमत विचारताना एक गोष्ट लक्षात ठेवा, तुम्ही एका भारतीय कुटुंबाचा संसार उभा करत आहात.’

त्या स्त्रीने कापड हातात घेतले. तिने ते निरखून पाहिले आणि मग आपल्या पदरातून पैसे काढले आणि तात्यारावांना दिले.

पाहता पाहता. गाडीभोवती गर्दी जमू लागली. सावरकरांना मदत करायला अप्पा पटवर्धन, वामन चव्हाण इत्यादि स्वयंसेवकही आले. मगाशी आश्चर्यचकित झालेला न्हावी पुढे आला. ‘तुम्ही एवढी मोठी कामं केलेली. मग ही हातगाडी?’

सावरकरांनी त्याच्याकडे शांतपणे पाहिले.

‘मोठं काम कोणतं आणि छोटं काम कोणतं, हे कसं ठरवणार? देशासाठी उपयोगी असेल, तर हातगाडी ढकलणंही तितकंच मोठं काम आहे. स्वातंत्र्य फक्त रणांगणावर मिळत नाही. देशात नोकरी-धंदे नसतील तर स्वातंत्र्य मिळवून तरी काय करणार आहोत आपण? लक्षात ठेव, आपण काय विकत घेतो, कुणाच्या हाताला काम देतो आणि कुणाला बळ देतो, यावरही देशाचं भविष्य ठरतं.’

तेवढ्यात रस्त्याच्या दुसऱ्या टोकावर खेळणारी काही मुले धावत आली. त्यांना गाडीवर ठेवलेल्या रंगीबेरंगी वस्तूंचे अधिक आकर्षण वाटत होते.

‘काका, आम्ही गाडी ढकलू का?’

एका मुलाने उत्साहाने विचारले.

‘ढकलाल? पण एक अट आहे.’

‘काय?’

‘गाडी ढकलताना मोठ्याने म्हणायचं- ‘स्वदेशी वस्तू घ्या!’

मुलांनी एकमुखाने मान डोलावली. ‘स्वदेशी वस्तू घ्या!’ ‘स्वदेशी वस्तू घ्या!’

मुलांचा एकच जल्लोष सुरू होता. मात्र लोकांच्या त्या गर्दीत कुणीतरी सर्व घटना आपल्या नजरेने सावकाश टिपत होतं. कोण होती ती व्यक्ती?

क्रमशः





पक्षी

आकाशभर विहार करून
पक्षी अलगद उतरतात,
डोहाच्या काठावर

त्याप्रमाणेच उतरतात शब्द
एकामागून एक
अलगद मनाच्या डोहाकाठी,
विसावतात वहीच्या पानांवर

मग खगमाला बनतात
ओळी कवितेच्या!
ठेवून जातात पाऊलखुणा
डोहाकाठी...!

मनाच्या काठावरही
शब्द अशाच खुणा ठेवून जातात...!

माझ्या पश्चात
कधीतरी वेळ काढून,
तू जा, माझ्या खोलीत,
उघड वही माझ्या कवितांची,
तुला दिसतील काठावर उतरलेल्या पाखरांच्या पाऊलखुणा
अजूनही!
ऐकूही येईल पक्षीरव
कदाचित...!

पडलेली असतील-
त्यातल्याच पाखरांची काही पिसे..
इतस्ततः विखुरलेली,
तू त्यांना अलगद फिरव
तुझ्या गालांवरून..!
नेऊ नकोस पण त्यांना
तुझ्या पापण्यांपाशी,
चुकून जाणवलीच त्यांना तिथं जराशी ओल
तर बिथरतील ते

नको.. नकोच नेऊस..!
हो, एकच कर मात्र, परतताना-
पुन्हा अलगद ठेवून दे
माझी वही माझ्या बंदिस्त कपाटात..!

अगदी शेवटचं...,
बोटं फिरवता आली तर
पहा माझ्या शब्दांवरून..!
त्यांची..
शेवटची घर घर जाणवेल
तुझ्या त्याच नाजूक बोटांना

जमलंच तर कर एवढं
माझ्या पश्चात जा माझ्या खोलीत...!

-पद्माकर भावे

अहिंसेला दिला आहेस तू होकार आयुष्या
कशाला पाहिजे दुसरे.. पुन्हा हत्यार आयुष्या

अपेक्षा फार केली तर.. तुझी फाटायची झोळी
मिळाले तेवढे कायम हसत स्वीकार आयुष्या

चहूबाजूस शत्रू, युद्धही घनघोर आहे हे
दिला ना हारण्याचा मी, मला अधिकार आयुष्या

चुका केल्या, गुन्हा नाही.. नको आरोप माझ्यावर
मला ऐकायची नाही तुझी तक्रार आयुष्या

कितीदा भंगल्या इच्छा, कितीदा मोडली स्वप्ने
स्वत:चाही सतत केलास जीर्णोद्धार आयुष्या

- सौ. दीपाली कुलकर्णी

बाया

बाया पानोठ्याला जाती
बाया गुपित बोलती
बाया पदर लिम्पती
देहावरी...

बाया पानोठ्याला जाती
बाया यागर भरती
भार विश्वाचा पेलती
डोईवरी...

बाया पानोठ्याला जाती
दु:ख उरी लपवती
कानगोष्टीत उरती
पसाभर...

बाया पानोठ्याला जाती
एकमेका धीर देती
जशा नद्या की भेटती
तिरावर...

- मानसी चिटणीस

मार्जार पंचपदी...

१.
मिटुनी डोळियांसी, मांजर ती दूध पिते
कुणि मज न पाहिले, राहे गोड या भ्रमातें;
अचपळ मन माऊचे, चपळ होऊनी पळते
'मैं आऊं?' विचारण्या मिसे, तोंड उस्कटते..!

२.
कोण बांधतो मांजरीच्या, घंटा गळ्यात ठरवून
तोचि धीट ओळखावा, जय तेथेचि जाणावा;
नका मारू मांजरीला, फुका कराल काशी वारी
जीव होईल निर्जीव, उगा कलंक लागावा...!

३.
येते दबक्या पाऊली, सूर मारते नेटका
होते पळता थोडी भुई, मूषक मामांनाही;
नको पिंजरा घरात, पाळावे मांजरीला
याबरती पाली तिला, चिकटती सऱ्यांनाही...!

४.
कुणी निघे प्रवासाला, येता मांजर आडवी
बदलती रस्ता अपुला, वा फिरून वापरती;
काय म्हणू बुभुक्षिता, कुण्या काळात राहती
पदोपदी सुशिक्षित, अपशकुना याबरती...!

५.
पाळा खंडीभर मांजरी, खेळूद्या अंगाखांद्यांवरी
रंग तांबूस केशरी, शुभ्र, काळा वा चितकाबरी;
अंति याची संसाराचे, त्या भूत असती भवती
परस्परा जडो मैत्र-माया, ठेवू मनात अंतरी...!

- अशोक सोनावणे

ती जागी झाली

वृत्त -यशोदा

उमलत्या फुलाने साद दिली गगनाला
उन्मुक्त नव्या जगताला
सांगितले नाते सुर्याशीही त्याने
पानाला फुटले गाणे

संसर्ग सुखाचा सुप्त मनाला झाला
पंखांस विहरणे कळले
राहिली न सीमा कुठलीही प्रतलाला
आवाज यशाचा घुमला

घमघमला वारा गंधित गोंधळ झाला
कर्तृत्व सोहळा सजला
हे कळीत लपले गुपित तिलाही कळले
अप्रूप तिने हे टिपले

उमटला कवडसा सोनेरी कार्याचा
पसरला सुखाने ओचा
अंधार युगाचा दूर लोटला जेव्हा
ती जागी झाली तेव्हा

सौ.अर्चना मुरुगकर
तळेगाव दाभाडे

एकतेचे गाऊ गीत....

सामाजिक कार्य
आहे अनिवार्य
कर्तव्यभाव जपूया...
असावे निर्भय
घ्यावे योग्य निर्णय
भले व्हावे सर्वांचे...
समस्या सोडविण्या
दोन्ही हात जोडूनिया
करावी प्रार्थना मनोभावे...
आपसातील हेवे दावे
अंतिम न व्हावे
बंधुभाव परस्पर जपूया...
नसावा द्वेष, गर्व
आरंभूया नवे पर्व
कोपरा हळवा माणुसकीचा...
सर्वप्रथम देश हित
एकतेचे गाऊ गीत
येऊनिया वसा विकासाचा...

- अशोक जयराम कांबळे

भेटत रहा अधूनमधून

मला वेळ नसतो तरी मी दवडत राहतो इथेतिथे
मी घाईत असलो की मला ऐकू येत नाहीत हाका
महत्त्वाचं बोलताना नेमके शब्द सुचत नाहीत मला
लिहिण्याचा सराव सुटल्यानं वळत नाहीत हात
समोरचं दृश्य स्पष्ट असूनही वेगळंच बघतात डोळे
हे मी तुम्हाला सांगतोय, पण मी मान्य करत नाही
माझं वय झाल्याचं मात्र कुणालाच अमान्य नाही
तुम्हालाही असंच होतं का? विचारायचंय तुम्हाला
पण मला खात्री आहे...
भेटीत हे सारं ऐकूनही तुम्ही हसून मला विचाराल-
हल्ली काय चाललंय? भेटत रहा अधूनमधून...
बरं असतं तब्येतीला!

- सुनील शिनखेडे



नवकवी कार्यशाळेतून कवितेच्या विविध अंगांचा उलगडा

कवितेतील वृत्त आणि रस यांचाही जवळचा संबंध असतो. वीररसासाठी ओजस्वी आणि गतिमान लय, करुणरसासाठी संथ आणि भावपूर्ण लय, तर शृंगाररसासाठी मधुर आणि नादमय लय उपयुक्त ठरू शकते. केशवसुतांची 'तुतारी' ही कविता आवाहनात्मक भाषा, जोशपूर्ण लय आणि परिवर्तनवादी विचार यांच्या एकात्मतेतून वाचकाला प्रेरणा देते. अभंग, ओवी, आर्या, श्लोक अशा विविध काव्यप्रकारांतून छंद आणि लय यांचे महत्त्व स्पष्ट होते. मुक्तछंदाने कवितेला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले असले, तरी त्यातही अंतर्गत लय महत्त्वाची असते. शब्दांची पुनरावृत्ती, वाक्यरचना, विराम आणि भावनेचा चढ-उतार यांमधून ही लय निर्माण होते.

रमा गर्गे

९९२२९०२५५२

समरसता साहित्य परिषद आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचा संयुक्त उपक्रम

सोलापूर, दि. ४ ऑक्टोबर २०२६ : अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त समरसता साहित्य परिषद आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथे नवकवी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. नवोदित कवींना कवितेची विविध अंगे समजावून देणे, त्यांच्या सर्जनशील प्रतिभेला योग्य दिशा देणे आणि सामाजिक जाणिवेतून काव्यनिर्मिती करण्यास प्रोत्साहित करणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत तज्ज्ञ वक्त्यांनी कवितेची शब्दकळा, प्रतिमासृष्टी, भावना-विचारांची काव्याभिव्यक्ती आणि छंद-वृत्तांचे महत्त्व या विषयांवर मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे, सामाजिक विषयांवर प्रत्यक्ष कविता लिहिण्याचा उपक्रमही या वेळी घेण्यात आला.

साहित्याच्या माध्यमातून समाजात वैचारिक गोंधळ निर्माण करणाऱ्या प्रवृत्ती दिसून येत असताना, या कार्यशाळेत सहभागी झालेल्या तरुणांचा सकारात्मक दृष्टिकोन विशेष उल्लेखनीय होता. साहित्याकडे केवळ



अभिव्यक्तीचे साधन म्हणून न पाहता, सामाजिक जाणीव आणि समरसतेचे माध्यम म्हणून पाहण्याची भूमिका या उपक्रमातून अधोरेखित झाली. 'सरस ते साहित्य, समरस तो साहित्यिक' या समरसता साहित्य परिषदेच्या ब्रीदवाक्याचे सार या कार्यशाळेतून प्रत्ययास आले.

समरसतेची साहित्य परंपरा

कार्यशाळेच्या प्रारंभी डॉ. गजानन होडे यांनी समरसता साहित्य परिषदेची पार्श्वभूमी, वाटचाल आणि कार्य यांविषयी माहिती दिली. जळगाव साहित्य संमेलनापासून नांदेड साहित्य संमेलनापर्यंतच्या साहित्यिक प्रवासाचा आढावा घेत त्यांनी संमेलनाध्यक्षांच्या संदर्भातून साहित्यविश्वातील विविध प्रवाहांचा परिचय करून दिला. सामाजिक समरसता मंचाची स्थापना आणि त्यातून १९९८ मध्ये निर्माण झालेली समरसता साहित्य परिषद यांविषयीही त्यांनी विवेचन केले.

'सरस ते साहित्य, समरस तो साहित्यिक' हे ब्रीदवाक्य घेऊन समरसता साहित्य परिषद साहित्याच्या माध्यमातून समाजात समता, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.

महाराष्ट्रातील विविध भागांत साहित्य संमेलने, कविसंमेलने, परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन परिषदेच्या वतीने केले जाते. प्रस्थापित साहित्यिकांसोबतच नवोदित लेखक, कवी आणि विद्यार्थ्यांना आपल्या प्रतिभेच्या आविष्कारासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम परिषद करीत आहे.

भारतीय संतपरंपरेने अध्यात्माबरोबरच सामाजिक समता, मानवता आणि बंधुभाव यांची शिकवण दिली. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत सावता माळी आणि संत गोरा कुंभार अशा अनेक संतांनी आपल्या अभंग, भारुड आणि विचारांतून जातिभेद, विषमता आणि उच्च-नीचतेच्या भावनेला विरोध केला.

संत एकनाथांनी सर्व माणसांमध्ये समानतेची भावना रुजवण्याचा प्रयत्न केला, तर संत तुकारामांनी 'जे का रंजले गांजले' या विचारातून दुःखी आणि वंचित माणसांप्रती सहवेदना व्यक्त केली. संत चोखामेळा आणि संत जनाबाई यांच्या साहित्याने सामाजिक विषमतेचे



वास्तव मांडतानाच मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न उपस्थित केला. या संतपरंपरेने साहित्याला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. समरसता साहित्य परिषदेच्या कार्यामागेही याच मानवतावादी परंपरेची प्रेरणा असल्याचे या विवेचनातून स्पष्ट झाले.

कवितेच्या विविध अंगांचा अभ्यास

कार्यशाळेच्या पुढील सत्रात चार तज्ज्ञ वक्त्यांनी कवितेच्या विविध अंगांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. विजय राठोड यांनी 'कवितेची शब्दकळा', डॉ. रमा गर्गे यांनी 'काव्यातील प्रतिमासृष्टी', कवयित्री मृणाल देशपांडे यांनी 'भावना-विचारांची काव्याभिव्यक्ती', तर डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी 'कवितेतील छंद-वृत्तांचे महत्त्व' या विषयांवर मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ. विजय राठोड : कवितेची शब्दकळा

प्रा. डॉ. विजय राठोड यांनी कवितेतील शब्दांच्या कलात्मक वापराचे महत्त्व स्पष्ट केले. कविता म्हणजे केवळ विचार किंवा भावना व्यक्त करणे नव्हे, तर निवडक शब्द, त्यांचा नाद, लय, अर्थछटा आणि प्रतिमा यांच्या साहाय्याने वाचकाच्या मनात अनुभव निर्माण करणे होय, असे त्यांनी सांगितले.

कवितेची शब्दकळा समजून घेताना शब्दांची नेमकी निवड, शब्दांचा नाद, अर्थछटा, प्रतिमानिर्मिती, लय-ताल, अलंकारिकता, भावनांची तीव्रता आणि सांकेतिकता या बाबी महत्त्वाच्या ठरतात. योग्य शब्दांच्या वापरामुळे साधी भावना अधिक व्यापक आणि परिणामकारक होऊ शकते.

उदाहरणार्थ, 'आई' हा एक साधा शब्द असला, तरी 'आईच्या पदराची सावली' या शब्दप्रयोगातून माया, सुरक्षितता, आधार आणि वात्सल्य अशा अनेक भावना एकाच वेळी व्यक्त होतात. शब्दांचा असा कलात्मक वापर कवितेला अर्थपूर्ण आणि भावस्पर्शी बनवतो. शब्दांना केवळ अर्थ नसतो, तर त्यांना नाद, भाव आणि अनेक अर्थछटाही असतात. या सर्वांचा कलात्मक मिलाफ म्हणजे कवितेची शब्दकळा, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कवयित्री मृणाल देशपांडे : भावना-विचारांची काव्याभिव्यक्ती

छत्रपती संभाजीनगर येथील कवयित्री मृणाल देशपांडे यांनी भावना आणि विचार यांच्या एकात्मतेतून काव्यनिर्मिती कशी घडते, याविषयी विवेचन केले.

मनात निर्माण झालेली भावना, त्या भावनेवर केलेले चिंतन, त्यातून आकाराला आलेले मत किंवा भूमिका आणि मनात निर्माण होणारे विविध प्रश्न यांना शब्दरूप देण्याची प्रक्रिया म्हणजे विचारांची अभिव्यक्ती होय. ही अभिव्यक्ती गेय, लयबद्ध किंवा मुक्तछंदातील असू

शकते.

कवी किंवा लेखक जन्मतःच घडलेला नसतो. वाचन, लेखन, निरीक्षण, चिंतन आणि कल्पनाशक्ती यांच्या माध्यमातून त्याची साहित्यिक जडणघडण होत असते. एखादा प्रसंग प्रत्यक्ष घडलेला असो वा नसो, तो आपल्या शब्दसामर्थ्याने आणि शैलीने वाचकांच्या मनासमोर उभा करण्याची क्षमता लेखकामध्ये असावी लागते. भावना आणि विचार यांचे एकरूप होणे, त्यातून प्रभावी अभिव्यक्ती निर्माण होणे आणि अखेरीस वाचकाला अनुभूती मिळणे, हा समृद्ध साहित्यप्रवास आहे, असे त्यांनी सांगितले.

या विवेचनाच्या अनुषंगाने त्यांनी सादर केलेली आईविषयीची कविता विशेष भावस्पर्शी ठरली.

आईच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेली पोकळी, घरातील बदललेले वातावरण, मनातील घालमेल आणि आईने मागे ठेवलेले संस्कार यांचे चित्रण या कवितेतून व्यक्त होते. आई बोलत नसली, तिचा स्पर्श अनुभवता येत नसला, तरी तिच्या आठवणी आणि तिने उमटवलेले संस्कारांचे ठसे मनात कायम राहतात, ही भावना कवितेतून प्रभावीपणे व्यक्त झाली.

डॉ. राजेंद्र नाईकवाडे : कवितेतील छंद-वृत्तांचे महत्त्व

डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी छंद आणि वृत्त यांचे कवितेतील स्थान स्पष्ट केले. छंदामुळे कवितेतील शब्दांना ताल, लय आणि नाद यांची शिस्त प्राप्त होते. वृत्ताच्या रचनेत अक्षरसंख्या, लघु-गुरू क्रम आणि यती यांना महत्त्व असते. या रचनेमुळे कविता श्रवणीय, गेय आणि स्मरणात राहण्यास सुलभ होते.

छंद हा केवळ रचनेचा नियम नसून भावनांच्या अभिव्यक्तीचेही प्रभावी माध्यम आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'सागरा प्राण तळमळला' ही अक्रूर मात्रावृत्तातील कविता विरह, व्याकुळता आणि उत्कट भावनांची प्रभावी अभिव्यक्ती करते. त्यांचे 'जयोस्तुते श्रीमहन्मंगले' हे गीत शब्दांची निवड, लयबद्धता आणि आवेशपूर्ण अभिव्यक्ती यांच्या साहाय्याने देशभक्तीची भावना जागृत करते.

कवितेतील वृत्त आणि रस यांचाही जवळचा संबंध असतो. वीररसासाठी ओजस्वी आणि गतिमान लय, करुणरसासाठी संथ आणि भावपूर्ण लय, तर शृंगाररसासाठी मधुर आणि नादमय लय उपयुक्त ठरू शकते. केशवसुतांची 'तुतारी' ही कविता आवाहनात्मक भाषा, जोशपूर्ण लय आणि परिवर्तनवादी विचार यांच्या एकात्मतेतून वाचकाला प्रेरणा देते.

अभंग, ओवी, आर्या, श्लोक अशा विविध काव्यप्रकारांतून छंद आणि लय यांचे महत्त्व स्पष्ट होते. मुक्तछंदाने कवितेला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले असले, तरी त्यातही अंतर्गत लय महत्त्वाची असते. शब्दांची पुनरावृत्ती, वाक्यरचना, विराम



आणि भावनेचा चढ–उतार यांमधून ही लय निर्माण होते. त्यामुळे छंदोबद्ध कविता असो किंवा मुक्तछंद, आशय, भावना, भाषा आणि लय यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

डॉ. रमा गर्गे : काव्यातील प्रतिमासृष्टी

डॉ. रमा गर्गे यांनी मराठी काव्यातील प्रतिमासृष्टीचे महत्त्व विशद केले. कवीच्या मनातील अमूर्त आणि नाजूक भावनेला मूर्त, दृश्यरूप देणारे साधन म्हणजे प्रतिमा होय. प्रतिमांमुळे कविता केवळ वाचली जात नाही, तर ती वाचकाच्या डोळ्यांसमोर उभी राहते आणि त्याच्या मनात जिवंत अनुभव निर्माण करते.

मराठी कवितेत निसर्ग हा प्रतिमांचा समृद्ध स्रोत राहिला आहे. संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील विश्वकल्याणाची व्यापक दृष्टी, केशवसुतांच्या कवितांतील स्वातंत्र्याची ओढ, कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेतील मातीच्या प्रतिमेतून व्यक्त होणारे प्रेम, बा. सी. मर्ढेकरांच्या कवितांतील यंत्र, धूर आणि सिग्नल यांसारख्या आधुनिक जीवनाशी संबंधित प्रतिमा, तसेच बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांतील शेत, पीक आणि चूल यांसारख्या ग्रामीण जीवनातील प्रतिमा यांचा त्यांनी संदर्भ दिला.

प्रतिमा ही केवळ कवितेची सजावट नसते, तर ती कवितेच्या आशयाला खोली आणि व्यापकता देते. एका समर्थ प्रतिमेतून अनेक भावना आणि अर्थ व्यक्त होऊ शकतात. प्रतिमासृष्टीमुळे काव्यानुभव अधिक जिवंत होतो. म्हणूनच समृद्ध प्रतिमासृष्टी हे मराठी कवितेच्या सौंदर्याचे आणि सामर्थ्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

समरसता साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. प्रसन्न पाटील यांनी समारोप करताना, साहित्यिकांनी समाज जोडावा, तोडू नये, असे आवाहन केले. आपल्या भाषणात त्यांनी पुढील महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले.

साहित्यिक हा समाजाचा आरसा आणि दीपस्तंभ असतो, त्याच्या लेखणीतून समाज घडतो. समाजात कुप्रथा होत्या, उच्चनीचता होती. आजही मनांत आहेच, त्यातच आधुनिक काळात श्रीमंत–गरीब, शहर–गाव अशी विषमताही वाढली आहे. याचा वापर करून काही साहित्यिक जाणीवपूर्वक द्वेष पसरवतात, इतिहासाचा विपर्यास करून समाजात फूट पाडतात. खरा साहित्यिक विषमतेवर बोट ठेवतो, पण तिच्यावर उपाय म्हणून प्रेम आणि समतेचा मार्ग दाखवतो.

साहित्याने पीडित, वंचित, शेतकरी, कष्टकरी यांचे दुःख मांडावे, पण सूड नव्हे तर न्याय मागावा. पुढे भाषणात डॉ. प्रसन्न पाटील यांनी समतेचे महत्त्व सांगताना म्हटले की, लेखणीने भिंती बांधू नयेत, तर भिंती पाडून माणसाला माणसाशी जोडणारे पूल बांधावेत.

जेव्हा साहित्यिक समाज तोडतो, तेव्हा समाज दुबळा होतो, विषमता दाखवा, पण तोडू नका, जोडा आणि समतेचा समाज घडवा.

सामाजिक जाणिवेतून काव्यनिर्मिती

या कार्यशाळेचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ सैद्धान्तिक मार्गदर्शनापुरता तिचा आवाका मर्यादित राहिला नाही. सामाजिक विषयांवर प्रत्यक्ष कविता लिहिण्याचा उपक्रमही घेण्यात आला. त्यामुळे नवोदित कवींना आपल्या अनुभवांना, निरीक्षणांना आणि सामाजिक जाणिवांना काव्यरूप देण्याची संधी मिळाली.

कवितेची शब्दकळा, प्रतिमासृष्टी, भावना–विचारांची अभिव्यक्ती आणि छंद–वृत्तांचे महत्त्व या चारही विषयांचा परस्परसंबंध या कार्यशाळेतून उलगडला. कविता ही केवळ भावनांचा आविष्कार नसून ती जीवनानुभव, चिंतन, कल्पनाशक्ती आणि सामाजिक जाणीव यांची कलात्मक अभिव्यक्ती असते, याची जाणीव नवकवींना झाली.

समाजातील समता, बंधुता, मानवता आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारखी मूल्ये साहित्याच्या माध्यमातून अधिक व्यापकपणे पोहोचवता येतात. नवोदित साहित्यिकांना योग्य मार्गदर्शन देऊन त्यांच्या प्रतिभेला दिशा देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून झाला. साहित्याचे सौंदर्य आणि सामाजिक बांधिलकी यांची सांगड घालणारी ही नवकवी कार्यशाळा मराठी साहित्यविश्वातील नव्या प्रतिभांना प्रोत्साहन देणारा उपक्रम ठरली.

नवोदित विज्ञान लेखकांसाठी परिसंवाद



सृष्टिज्ञान मासिक, विज्ञान भारती (कोकण प्रांत), साठ्ये महाविद्यालय, विलेपार्ले व भारतीय भाषा समिती शिक्षण मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने साठ्ये महाविद्यालयात परिसंवाद आणि रुजवात कार्यशाळा शुक्रवार, दि. १६ व शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६, असे दोन दिवस संपन्न झाली.

बीजभाषण प्रसिद्ध विज्ञान लेखक डॉ. बाळ फोंडके यांनी केले. तर विज्ञान भारतीची भूमिका विज्ञान भारतीचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. नरेश चापेकर यांनी विशद केली. विज्ञान लेखनासाठीचे विषय, त्यासाठी घ्यावे लागणारे परिश्रम, निरीक्षण, सोपी भाषा, लेखन शैली या बाबींवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

प्राचार्य माधव राजवाडे यांनी विज्ञान भारती आणि भारतीय भाषा समिती यांची अशी कार्यशाळा आयोजित करण्यामागील भूमिका स्पष्ट केली.

सृष्टिज्ञान मासिकाचे संपादक डॉ. जयंत जोशी यांनी 'सृष्टिज्ञान' मासिकाचा ९९ वर्षांचा प्रवास थोडक्यात सांगितला.

त्यानंतर झालेल्या 'विज्ञान लेखनातील आव्हाने' या चर्चासत्रात डॉ. बाळ फोंडके, श्री. हेमंत लागवणकर, श्री. शशिकांत धारणे व डॉ. मेधा लिमये यांनी सहभाग नोंदवला. दर्जेदार लेखन असल्यास त्याला वाचक, प्रकाशक हमखास मिळतो, असे सर्वांनी स्वानुभावातून सांगितले. सूत्रसंचालन श्रीमती रश्मी वारंग यांनी केले.

त्यानंतर विज्ञान लेखनासाठी विषय कसे निवडावे, संदर्भ कसे निवडावे, पारिभाषिक व तांत्रिक शब्दांचा वापर संयमाने कसा करावा, लेखनातील आटोपशीरपणा, विज्ञान कथा लेखन, छापील माध्यमांव्यतिरिक्त इतर माध्यमांसाठी संहिता लेखन या विषयांवर सहभागींना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. विषयांची आटोपशीर मांडणी करण्याचे मार्गदर्शन प्रा. सुधीर पानसे यांनी केले. विज्ञाना कथा लेखनासंदर्भातील मार्गदर्शन श्रीमती स्मिता पोतनीस यांनी केले, तर इतर माध्यमांसाठीच्या संहिता लेखनासंदर्भातील मार्गदर्शन श्री. अभिजीत मुळ्ये यांनी केले, त्यानंतर प्रत्यक्ष लेखन कसे करायचे; याचे प्रात्यक्षिक सहभागींकडून करून घेण्यात आले.

विज्ञानाच्या सात वेगवेगळ्या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या युवा संशोधकांनी त्यांचे संशोधन मराठीमध्ये प्रत्येकी २५ मिनिटे सादर केले. हा एक वेगळा प्रयोग होता. तो अतिशय यशस्वी झाला. क्लिष्ट व जटील विज्ञान संशोधनदेखील जनसामान्यांपर्यंत सुबोध मराठीतून पोहोचवता येऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण होते.

महाराष्ट्राच्या विविध भागातून विद्यार्थी शिक्षक व विज्ञान लेखनात रुची असलेल्या १७० व्यक्ती या कार्यक्रमात पूर्णवेळ उपस्थित होत्या.

समारोप समारंभाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख (सेवानिवृत्त) व प्रसिद्ध विज्ञान कथा लेखक डॉ. संजय ढोले, विज्ञान भारतीचे अखिल भारतीय सह संघटन सचिव श्री. प्रवीण रामदास व क्षेत्रीय प्रचारक श्री. श्रीप्रसाद, केंद्रीय कार्यकारणी सदस्या डॉ. मानसी माणगावकर उपस्थित होते. ही कार्यशाळा लेखन प्रवास सुरू करण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल, अशी भावना सहभागींनी व्यक्त केली.



